रायगड, नवी मुंबई, ठाणे, रत्नागिरी, सिंधुदुर्ग ▌ आर. एन. आय. रजि. क्र. ४९९६३/७७ MH/MR/RGD/RNP-16/2018-21 (31-12-2022) ॥ वर्ष ८५ ॥ अंक २४६ ॥ पृष्ठे ८ www.krushival.in

अलिबागकरांनी अर्पण केली स्व. लतादीदींना गीतांजली




पान ३ वर

# कृषीवल

रायगड ॥ शनिवार, दिनांक १२ फेब्रुवारी २०२२

किंमत ४ ₹




पान ६ वर

## म ह त्त्वा चे

### बच्चू कडूंना कारावास

**मुंबई :** राज्याचे शिक्षण राज्यमंत्री बच्चू कडू यांना दोन महिन्यांच्या सश्रम कारावासाची शिक्षा ठोठावण्यात आली आहे. २०१४ च्या विधानसभा निवडणुकीत प्रतिज्ञापत्र सादर करताना बच्चू कडू यांनी मुंबईतील फ्लॅटची माहिती लपवल्याचा त्यांच्यावर ठपका ठेवण्यात आला. चांदूरबाजार प्रथमवर्ग न्यायालयाने हा निर्णय दिला. न्यायालयाने बच्चू कडू यांना २५ हजार रुपयांचा दंड ठोठवला. तसेच दोन महिने सक्षम कारावासाची शिक्षा दिली. भाजपचे नगरसेवक गोपाल तिरमारे यांनी याबाबत तक्रार दाखल केली होती.

### एन चंद्रशेखरन यांची फेरनिवड

**मुंबई :** एन चंद्रशेखरन यांची पुन्हा एकदा टाटा सन्सच्या एक्झिक्युटिव्ह चेअरमनपदी निवड करण्यात आली आहे. ही निवड पुढील पाच वर्षांसाठी असल्याचं कंपनीच्या कार्यकारी बोर्डने स्पष्ट केलं आहे. टाटा सन्सच्या कार्यकारी बोर्डाची शुक्रवारी बैठक झाली. त्यामध्ये एन चंद्रशेखरन यांच्या गेल्या पाच वर्षांच्या कार्यकाळाचा आढावा घेऊन त्यांना पुन्हा एकदा मुदतवाढ देण्यात आली आहे.

### ‘मास्क लावायचाच’

**मुंबई :** महाराष्ट्रात कोरोनाचे रुग्ण दिवसेंदिवस कमी होत



चालले आहेत. अशात महाराष्ट्र मास्कमुक्त होणार का असा सवाल उपस्थित केला जात आहे. याबाबत उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी सांगितले की, जोपर्यंत कोरोना आपल्यातून जात नाही, तोपर्यंत मास्क लावायचाच, ज्या दिवशी मास्क काढण्याबाबत ठरेल आम्ही अगदी पत्रकार परिषद घेऊन सांगू. मंत्रिमंडळाच्या बैठकीत मास्कमुक्तीसंदर्भात कोणताही निर्णय झालेला नाही, ना बोलणे झालेय, असेही ते म्हणाले.

### रायगड जिल्ह्यात मनसेचे कार्यालय

**अलिबाग :** महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे युवा नेते अमित राज ठाकरे यांच्या हस्ते शुक्रवारी पेण येथील ‘पेण गड अलिबाग गड’ अशा नावाचे संपर्क कार्यालयाचे उद्घाटन करण्यात आले. अमित ठाकरे यांच्या रायगड दौऱ्याने महाराष्ट्र नवनिर्माण सेनेच्या सैनिकांमध्ये नवे चैतन्य निर्माण झाले होते. आगामी स्थानिक स्वराज्य संस्था निवडणुकीच्या अनुषंगाने अमित ठाकरे हे रायगडात येत असल्याने मनसेची निवडणुकीची पुढची रणनीतीही केली जाणार असल्याचे बोलले जात आहे. महाराष्ट्र नवनिर्माण सेनेच्या पनवेल, पेण व अलिबाग गड जनसंपर्क कार्यालयाचे उद्घाटन अमित ठाकरे व आमदार राजू पाटील यांच्या हस्ते करण्यात आले.

# डोलवी एमआयडीसी प्रकल्प रद्द करा

## आ. जयंत पाटील यांचा इशारा

*। गडब । वार्ताहर ।*

*पेण तालुक्यातील प्रस्तावित डोलवी औद्योगिक विकास प्रकल्पासाठी महाराष्ट्र राज्य औद्योगिक विकास महामंडळामार्फत भूसंपादन होणार आहे. जेएसडब्ल्यू कंपनीसाठी हे भूसंपादन होत असून, या भूसंपादनाला शेतकऱ्यांचा विरोध आहे. सरकारने शेतकऱ्यांना विश्वासात न घेता अधिसूचना काढली. हा प्रकल्प शेतकऱ्यांना मान्य नसून, डोलवी एमआयडीसी प्रकल्प रद्द करावा, अन्यथा जेएसडब्ल्यू कंपनीचे दरवाजे बंद करण्याचा आक्रमक इशारा शेकापचे सरचिटणीस आ. जयंत पाटील यांनी दिला. गडब येथे गुरुवारी (दि.१०) आयोजित करण्यात आलेल्या शेतकऱ्यांच्या सभेत ते बोलत होते.*




यावेळी माजी आ. धैर्यशील पाटील, आ. रवी पाटील, जिल्हा परिषद सदस्य प्रभाकर म्हात्रे, पंचायत समिती सदस्य प्रदीप म्हात्रे, सामाजिक कार्यकर्ते अरुण शिवकर, वैशाली पाटील, प्रसाद भोईर, पेणचे शेकाप तालुका चिटणीस संजय डंगर, सरपंच अपर्णा कोठेकर, उपसरपंच दर्शना पाटील आदींसह शेतकरी उपस्थित होते.

यापुढे मार्गदर्शन करताना आ. जयंत पाटील यांनी सांगितले की, राजकारणातील मतभेद बाजूला ठेवून एकत्र येत ही लढाई लढायची आहे. पान २ वर

**भूसंपादनातील समाविष्ट गावे पेण तालुक्यातील डोलवी औद्योगिक विकास क्षेत्रासाठी काराव-गडब, डोलवी, वडखळ, बोरी ग्रामपंचायत परिसरातील बेणेघाट, कोलवे, वावे, खारकारावी, काराव, खारमांचेळा, खारघाट, खारचिर्बी, खारजांभेळा, खारढोंबी या गावातील २१०० एकर जमीन संपादित करण्यात येणार आहे.**

“ आपल्या जमिनी भलत्याच कोणाला आवडल्या म्हणून देणार नाही. सरकारने शेतकऱ्यांना विश्वासात न घेता अधिसूचना काढली आहे. सरकारला मायेचा पाझर फोडल्याशिवाय राहणार नाही. नोटीसी रद्द होईपर्यंत येथील शेतकरी थांबणार नाही.

– माजी आ. धैर्यशील पाटील

“ पेण तालुक्यातील प्रस्तावित डोलवी एमआयडीसी प्रकल्पाला शेतकऱ्यांनी विरोध दर्शविला असून, शेतकऱ्यांच्या या मागणीला आ. जयंत पाटील, माजी आ. धैर्यशील पाटील, आ. रवी पाटील यांनी पाठिंबा दिला आहे. राज्याचे उद्योगमंत्री सुभाष देसाई, उद्योग राज्यमंत्री तथा रायगडच्या पालकमंत्री आदिती तटकरे रायगड जिल्ह्याच्याच आहेत. त्यामुळे दोन्ही मंत्री महोदयांनी संयुक्त बैठक घेऊन एमआयडीसी प्रकल्प रद्द करण्याबाबत सकारात्मक निर्णय घेऊन शेतकऱ्यांना दिलासा द्यावा.

– के.जी. म्हात्रे, संयोजक, शेतकरी संघर्ष समिती

# नियुक्तीविना अधिपरिचारिकांची उपासमार

## जिल्हाधिकारी कार्यालयासमोर करणार हल्लाबोल

**। अलिबाग । विशेष प्रतिनिधी ।**

प्रशिक्षण सुरु असतानाही कोरोना काळात रुग्णसेवा करणाऱ्या १५ अधिपरिचारिकांना प्रशिक्षण पूर्ण होऊन १२ हून अधिक महिन्यांचा कालावधी झाला आहे. त्यांना अजूनही १८ महिन्यांची नियुक्ती मिळाली नसल्याने त्यांच्यावर उपासमारीची वेळ ओढवली आहे. नियमाप्रमाणे त्यांना १८ महिन्यांचे नियुक्तीचे आदेश देण्याची मागणी करत हल्लाबोल धरणे आंदोलन करण्याचा इशारा त्यांनी दिला आहे.



संग्रहित छायाचित्र

याबाबत शासनाला देण्यात आलेल्या निवेदनात म्हटले आहे की, अलिबाग येथील जिल्हा रुग्णालयात ऑगस्ट २०१७ पासून जीएनएम प्रशिक्षणास १५ विद्यार्थ्यांनी सुरुवात करुन २०१९-२० मध्ये आपले प्रशिक्षण यशस्वीपणे पूर्ण केले. त्यानंतर उत्तीर्ण झालेल्या बंधपात्र अधिपरिचारिकांना संबंधित आरोग्य अधिकारी व कार्यालय येथे वारंवार भेट देऊन अर्ज-विनंत्या करुनसुद्धा नियमाप्रमाणे १८ महिन्यांचे नियुक्ती आदेश मिळत नाहीत. जिल्ह्याच्या मेरिटलिस्टमध्ये येऊन सदर प्रशिक्षणासाठी आमची निवड झाली आहे. परंतु, आज आम्ही बेरोजगार आहोत. प्रशिक्षण चालू असतानासुद्धा कोरोना महामारीच्या आपत्तीतदेखील आम्ही रुग्णसेवेचे काम केले आहे. मात्र, आता नियुक्ती मिळत नसल्याने आम्ही आर्थिक व मानसिक तणावात आहोत. त्यामुळे नाईलाजाने जिल्हाधिकारी कार्यालयासमोर १५ फेब्रुवारीपासून हल्लाबोल आंदोलन करण्याची वेळ ओढवली आहे. त्यामुळे आमच्या मागण्या शासनाने त्वरित पूर्ण करुन सदर आंदोलनाची वेळ आणू नये, असे आवाहन या परिचारिकांनी केले आहे.

# भाजी मार्केट गाळेधारकांसाठी रस्त्यावर उतरणार; शेकापचा इशारा

**। पेण । वार्ताहर ।**

पेण नगरपालिकेकडून भाजी मार्केटच्या मूळगाळेधारकांना चुकीच्या पद्धतीने बाहेर काढण्याचा प्रयत्न सुरू असून, वारंवार धमकीवजा नोटीस देऊन गाळेधारकांना त्रास दिला जात आहे. नगरपालिका प्रशासन कुणाच्या सांगण्यावरुन जर गाळेधारकांना जागा खाली करण्यास भाग पाडत असतील, तर शेकाप ते कधीच मान्य करणार नाही. माजी आ. धैर्यशील पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली रस्त्यावर उतरुन लढाई लढू, असा इशारा शेकाप नगरसेवक शोमेर पेणकर यांनी दिला आहे.



महत्त्वाची बाब म्हणजे, १० नोव्हेंबर २०२१ च्या जनरल सभेमध्ये भाजी मार्केटच्या गाळेधारकांचा विषय चर्चेत आला होता. त्यावेळी नगरसेवक शोमेर पेणकर यांनी सभागृहाचे लक्ष केंद्रित केले होते, की गाळेधारकांना नवीन इमारतीसमोरील पत्र्याचे गाळे मोडून आठ दिवसांच्या आत जागा खाली करून द्यायची आहे. त्यावेळी सभागृहात पूर्ण चर्चेनशी एकमताने असे ठरवण्यात आले, पान २ वर

# देशात सक्रीय रुग्णसंख्येत मोठी घट

## कोरोनामुक्त होण्याचे प्रमाण वाढले

**। नवी दिल्ली । वृत्तसंस्था ।**

देशात कोरोना रुग्णांची संख्या झपाट्याने कमी होत चालली आहे. आरोग्य मंत्रालयाने दिलेल्या माहितीनुसार, देशात गेल्या २४ तासात ५८ हजार ७७ नवे कोरोना रुग्ण आढळून आले आहेत. तर, १ लाख ५० हजार ४०७ जणांनी कोरोनावर मात केली आहे.



तीन दिवसांनंतर देशात एका दिवसात मृत्यू झालेल्यांची संख्या एक हजारहून कमी झाली आहे. दैनंदिन पॉझिटिव्हीटी रेट हा ३.९८ टक्के इतका खाली आला आहे. सध्या देशात नव्या रुग्णसंख्येच्या तुलनेत कोरोनामुक्त होणाऱ्यांचे प्रमाण अधिक आहे.

# एसटी संपाचा तिढा सुटेना

**। मुंबई । वृत्तसंस्था ।**

एसटी विलिनीकरणासंदर्भात त्रिसदस्यीय समितीचा अहवाल सादर करण्याची १२ आठवड्यांची मुदत संपल्याने वेळ वाढवून देण्यासाठी गुरुवारी राज्य सरकारतर्फे मुंबई हायकोर्टात अर्ज केला होता. शुक्रवारी या प्रकरणावर मुंबई हायकोर्टात सुनावणी झाली. यावेळी सरकारी वकील एस नायडू यांनी पुन्हा १८ फेब्रुवारीपर्यंत वेळ मागितली आहे. यावर न्यायालयाने २२ फेब्रुवारीपर्यंत वेळ दिला आहे.




विलिनीकरणाचा अहवाल अंतिम टप्यात असल्याचे समितीकडून सांगण्यात आले आहे. पुढील सुनावणी २२ फेब्रुवारी रोजी होणार असून, १८ फेब्रुवारीपर्यंत अहवाल सिल बंद पाकिटात सादर करण्याचे आदेश न्यायालयाने दिले आहेत. समितीचा शिफारशींचा अहवाल आणि त्यावरील मुख्यमंत्र्यांचा अभिप्राय असलेला अहवाल राज्य सरकारने १८ फेब्रुवारीपर्यंत हायकोर्टाच्या रजिस्ट्रार जनरल यांच्याकडे द्यावा. २२ फेब्रुवारी रोजी सुनावणीच्या वेळी तो आमच्यासमोर ठेवावा, असे निर्देश मुख्य न्यायमूर्ती दीपांकर दत्ता व न्यायमूर्ती मकरंद कर्णिक यांच्या खंडपीठाने दिले.

तब्बल दोन महिन्यांपेक्षा अधिक काळ उलटूनही एसटी कर्मचाऱ्यांचा संप सुरु आहे.

# पनवेलचे माजी उपमहापौर जगदीश गायकवाड तडीपार

**। पनवेल । प्रतिनिधी ।**

पनवेल महानगरपालिकेचे माजी उपमहापौर तथा भाजपचे नगरसेवक जगदीश गायकवाड यांच्यावर तडीपारीची कारवाई करण्यात आली आहे. गायकवाड यांना रायगड, ठाणे व नवी मुंबई हद्दीतून दोन वर्षांसाठी तडीपार करण्यात आले आहे. त्यांना पोलिसांनी रायगड जिल्ह्याच्या बाहेर लोणावळा येथे नेऊन सोडले आहे.



लोकनेते दि.बा. पाटील यांचे नाव नवी मुंबई विमानतळाला देण्यासाठी वेळोवेळी केल्या जात असलेल्या आंदोलनात सक्रीय सहभाग घेऊन चिथावणीखोर भाषणे करणे, आदी विविध प्रकरणांत गायकवाड यांच्यावर आतापर्यंत ३० ते ४० गुन्ह्यांची नोंद आहे. महापालिकेच्या अधिकाऱ्यांना शिवीगाळ केल्याची क्लिप व्हायरला झाली होती. त्यामुळे गायकवाड यांना परिमंडळ २ चे पोलीस आयुक्त शिवराज पाटील यांनी तडीपार केले आहे.

# एलआयसीचे सी विकास राव आज अलिबागेत

## शाखा अधिकारी यांना करणार मार्गदर्शन

**। अलिबाग । विशेष प्रतिनिधी ।**

भारतीय आयुर्विमा महामंडळ पश्चिम क्षेत्राचे क्षेत्रीय व्यवस्थापक सी विकास राव हे शनिवार १२ फेब्रुवारी रोजी अलिबाग येथे येत आहेत. सी विकास राव हे वित्तीय क्षेत्रातील तीन महत्त्वाचे राज्य म्हणजे महाराष्ट्र, गुजरात आणि गोवा यांचे प्रमुख आहेत.



अलिबाग येथील एलआयसी कार्यालयाला ते भेट देणार असून, ठाणे, पालघर, रायगड जिल्ह्यातील शाखा अधिकारी यांना मार्गदर्शन करणार आहेत, अशी माहिती ठाणे विभागाचे वरिष्ठ विभागीय व्यवस्थापक सुजय दत्ता यांनी दिली आहे.

सी विकास राव यांनी भारतीय आयुर्विमा क्षेत्रातील पॉलिसीधारकांसाठी आणि विमा प्रचाराकरिता पश्चिम क्षेत्रात अनेक योजना राबवल्या. त्यापैकी ‘हमारा परिवार, एलआईसी बीमा परिवार’ तसेच विमा दाव्यावर भर देऊन पश्चिम क्षेत्राला एक नवीन दिशा दिली आहे. रायगडसह ठाणे, पालघर जिल्ह्यातील शाखा अधिकारी यांना सी विकास राव यांचे मोलाचे मार्गदर्शन लाभणार असल्याचे यावेळी सांगण्यात आले.

# दहशतवादी हल्ल्यात जवान शहीद

**। नवी दिल्ली । वृत्तसंस्था ।**

जम्मू आणि काश्मीरमधील बांदीपोर येथे सुरक्षा दलाच्या संयुक्त पथकावर दहशतवाद्यांनी शुक्रवारी ग्रेनेडने हल्ला केला. या हल्ल्यामध्ये एक पोलीस शहीद झाला असून, चार जण जखमी झाले आहेत. जखमींमध्ये सीआरपीएफच्या दोन जवानांचा समावेश आहे. हल्ल्यानंतर या भागात लष्कराकडून शोधमोहीम हाती घेण्यात आली असल्याची माहिती जम्मू पोलिसांकडून देण्यात आली.

## राष्ट्रपतींच्या हस्ते राजभवनातील

# दरबार हॉलचे उद्घाटन

**। मुंबई । प्रतिनिधी ।**

लोकशाही प्रणालीमध्ये राजभवन हे जनसामान्यांच्या आकांक्षांचे प्रतिनिधित्व करतात. लोकशाही व्यवस्थेमध्ये ‘दरबार’हे सार्वजनिक जीवनातील पारदर्शिकतेचा पुरस्कार करतात. हे लोकशाहीचे नवे प्रतीक झाले असून, राजभवन हे लोक कल्याणकारी उपक्रमांचे केंद्र होईल, असा आशावाद राष्ट्रपती रामनाथ कोविंद यांनी व्यक्त केला. राजभवन येथे नव्याने बांधण्यात पान २ वर



### लोकभवन करण्यासाठी प्रयत्न

*आपण राजभवनाला लोकभवन बनवण्याचा प्रामाणिक प्रयत्न केला, असे राज्यपाल भगतसिंह कोश्यारी यांनी यावेळी सांगितले. विद्यापीठांनी कोरोना काळात अधिकाधिक योगदान द्यावे या दृष्टीने आपण कुलपती या नात्याने विद्यापीठांना सूचना केल्या असून, राज्यातील विद्यापीठांमध्ये संरक्षण विषयक अभ्यासक्रम सुरु करण्यासाठी आपण प्रयत्न केल्याचे राज्यपालांनी सांगितले.*

# रायगडात ‘जलजीवन’, स्वच्छतेला मिळणार गती

**॥ ग्रामपंचायत स्तरावर पाणीपुरवठा व स्वच्छता समिती गठीत**

**॥ मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. किरण पाटील यांची माहिती**

**। अलिबाग । विशेष प्रतिनिधी ।**

जल जीवन मिशनची प्रभावी अंमलबजावणी करण्यासाठी व मिशन अधिक परिणामकारक होण्याकरिता ग्रामपंचायत स्तरावर पाणीपुरवठा व स्वच्छता समितीची स्थापना करण्याचे निर्देश शासनाने दिले आहेत. त्यानुसार जिल्ह्यात सर्व ग्रामपंचायतींमध्ये ग्राम पाणीपुरवठा व स्वच्छता समितीची स्थापना करण्यात यावी, अशा सूचना जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. किरण पाटील व पाणी व स्वच्छता विभागाच्या उपमुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. ज्ञानदा फणसे यांनी दिलेल्या आहेत.



जल जीवन मिशन अंतर्गत ग्रामीण भागातील प्रत्येक घरात वैयक्तिक नळ जोडणीद्वारे दरडोई किमान ५५ लीटर प्रतिदिन गुणवत्तापूर्ण पाणीपुरवठा करणे हे जल जीवन मिशनचे प्रमुख उद्दिष्ट आहे. तसेच स्वच्छ भारत मिशन (ग्रामीण) टप्पा-२ अंतर्गत वैयक्तिक शौचालय, संस्थात्मक शौचालय यांचे बांधकाम व वापर याबरोबरच पान २ वर

### समितीची रचना

- *या समितीचे अध्यक्ष अध्यक्ष सरपंच व सचिव ग्रामसेवक असतील.*
- *पाणीपुरवठा व स्वच्छता या समितीमध्ये किमान १२ सदस्य व जास्तीत जास्त २४ सदस्य असतील.*
- *समितीमधील एक तृतीयांश सदस्य ग्रामपंचायत सदस्यातून निवडलेले असतील.*
- *या समितीत ५० टक्के महिला सदस्यांचा समावेश असेल.*
- *गावपातळीवरील महिला मंडळ, युवा मंडळ, भजनीमंडळ, महिला बचतगट सहकारी संस्था इ. प्रतिनिधी असतील.*
- *ग्रामस्तरीय शासकीय, जि.पं. ग्रामपंचायत कर्मचारी आमंत्रित व सहकारी सदस्य म्हणून निवड करता येईल त्यांना मतदानाचा अधिकार नसेल.*
- *मागासवर्गीय समाजास योग्य प्रतिनिधित्व असावे.*
- *प्रत्येक वॉर्ड किंवा वस्तीतील किमान प्रतिनिधी सदस्य म्हणून असतील.*

### ग्रामीण पाणीपुरवठा व स्वच्छता समिती कर्तव्य

- *गावातील सर्व कुटुंबांना प्रत्येक घरात वैयक्तिक नळ जोडणीद्वारे किमान ५५ लीटर प्रतिदिन गुणवत्तापूर्ण पाणीपुरवठा करणे.*
- *पाणीपुरवठा योजनेचा गाव कृती आराखडा तयार करणे, गावातील पाणीपुरवठा व स्वच्छता सुविधांचे नियोजन रचना, संकल्पना, अंमलबजावणी व देखभाल दुरुस्ती करणे.*
- *पेयजल व स्वच्छतेबाबतच्या समस्यांचा आढावा घेण्याच्या दृष्टीने ग्रामपंचायतीस वस्तुस्थितीदर्शक माहिती देणे.*
- *गावाचा पेयजल सुरक्षा आराखडा तयार करणे.*
- *पाणीपुरवठा योजनेच्या सर्व टप्प्यात व निर्णय प्रक्रियेत लोकसहभागाची खात्री करणे तसेच लोक वर्गणी (आर्थिक/श्रमदान स्वरुपात) देण्याबाबत गावकऱ्यांना प्रोत्साहित करणे.*
- *योजनेसाठी प्राप्त निधी बँक खात्यात जमा करून त्यांचे व्यवस्थापन करणे.*

# आगीत संसाराची राखरांगोळी

**। पाली/बेणसे । प्रतिनिधी ।**

सुधागड तालुक्यातील उन्हेरे बुद्रुक (धनगरवाडी) येथील राम धोंडू ढेबे यांच्या घराला अचानक आग लागली. या आगीत दोन लाखांहून अधिक रकमेचा मुद्देमाल व रोख रक्कम जळून खाक झाली आहे. सुदैवाने कोणतीही जीवितहानी झाली नाही.

या आगीत ५० किलो गहू, कपडे, ३ तोळे सोने, १ क्विंटल तांदूळ, १ कुलर, ४ प्लास्टिक बॅरल, इतर खाण्याचे पदार्थ, मुलांचे शैक्षणिक साहित्य असे मिळून तब्बल १ लाख ७८ हजारांचा मुद्देमाल व २३ हजार रुपये रोख रक्कम जळून खाक झाली आहे. त्यामुळे राम ढेबे यांचे तब्बल २ लाख १ हजार ५०० रुपयांचे नुकसान झाले आहे. एवढे मोठे नुकसान झाल्याने पान २ वर

**सुधागडात घराला आग**



## अभीष्टचिंतन ज्येष्ठ नागरिकांचे

१२ फेब्रुवारी

१) श्री. दिलीपकुमार म्हात्रे
चेंढरे, अलिबाग
१२-०२-१९५५

२) श्रीम. अनुया देवळे
नागाव, अलिबाग
१२-०२-१९५७

## म ह त्त्वा चे

### एकावर गुन्हा

**पनवेल :** स्त्री मनास लज्जा उत्पन्न होईल अशी कृती करुन तिचा विनयभंग इसमाविरुद्ध पनवेल शहर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल झाला आहे. एका लॉजमध्ये पती-पत्नीच्या भांडणाविषयी सहानुभूती दाखविण्याच्या बहाण्याने आरोपीने महिलेशी जवळीक साधण्याचा प्रयत्न केला. महिलेच्या सांगण्यावरुन पोलिसांनी गुन्हा दाखल केला आहे.

# न्याय न मिळाल्यास लढा उभारु

## कंत्राटी सफाई कामगारांच्या न्याय्य हक्कासाठी शेकाप आक्रमक

**। ठाणे । प्रतिनिधी ।**

ठाणे महानगरपालिकेच्या अंतर्गत काम करणाऱ्या कंत्राटी सफाई कामगारांवर कंत्राटदाराकडून, तसेच महानगपालिकेच्या अधिकाऱ्यांच्या संगनमताने होणाऱ्या अत्याचाराविरोधात शेतकरी कामगार पक्ष आक्रमक झाला असून, कामगारांना योग्य न्याय न मिळाल्यास न्याय्य हक्कासाठी लढा उभारु, असा इशारा शेतकरी कामगार पक्षाचे ठाणे जिल्हा अध्यक्ष प्रसाद साळवी यांनी दिला आहे. याबाबतचे निवेदन महापालिका आयुक्तांना देण्यात आले आहे.



या निवेदनात म्हटले की, नौपाडा व उथळसर प्रभाग समिती क्षेत्रामध्ये घरोघरी जाऊन कचरा संकलन व वाहतूक करण्याकरिता मे. अमृत एंटरप्रायजेस यांया बरोबर करारनामा केलेला आहे, तसेच त्याच शर्ती आणि अटींवर आपण सदर करारांमध्ये कामगार कायदेविषयक तरतुदी केलेल्या आहेत. परंतु, त्या तरतुदीचे पालन कुठलाही कंत्राटदार करीत नाही. यासंदर्भा आपल्या अधिकाऱ्यांना तक्रारी करुनसुद्धा त्याकडे दुर्लक्ष करण्यात येत आहे.

तसेच प्रत्येक कामगारास वर्षभरात २२ भरपगारी सुट्टी दिली पाहिजे. परंतु, कंत्राटदार २१ दिवसांचीच सुट्टी देतो. त्यामुळे ४०० कामगारांच्या ४००० सुट्ट्यांचा फायदा कंत्राटदारास होत आहे. म्हणजेच वर्षाला जवळपास २५ लाख रुपयांचा घोटाळा होत आहे. कामगारांना गणवेशासाठी पैसे मिळतात, परंतु, त्यातील ५० टक्के रक्कमसुद्धा खर्च करीत नाहीत. ही बाब अधिकाऱ्यांच्या वेळोवेळी लक्षात आणूनदेखील त्याकडे जाणूनबुजून दुर्लक्ष करण्यात येत आहे. आतापर्यंत कुठल्याही सफाई कामगाराला ग्रॅज्युएटी मिळाली नाही, मग चार टक्के ग्रॅज्युएटीचे पैसे जातात कुठे, याचीदेखील चौकशी झाली पाहिजे. तसेच पगार महिन्याच्या १० तारखेपूर्वी देणे बंधनकारक आहे. परंतु, सर्व कंत्राटदार १५ दिवस ते दोन महिने उशिराने पगार देतात. यामुळे कामगारांची मोठी अडचण होत आहे. घंटागाडीवरील कामगारास दरवर्षी एक जोडी गमबूट, हातातील ग्लोज, मास्क, गणवेश, रेनकोट व इतर संरक्षण साहित्य पुरवणे कंत्राटदाराची जबाबदारी आहे. परंतु, याकडे कंत्राटदार टाळाटाळ करीत असून, कामगारांच्या जीवाशी खेळत आहेत, असा आरोप शेकापचे ठाणे जिल्हा अध्यक्ष प्रसाद साळवी यांनी केला आहे.

कोरोना काळात कंत्राटी कामगारांना ३०० रुपये प्रतिदिन कोव्हिड भत्ता देण्यात येणार होता, तोही अद्याप मिळालेला नाही. तो ताबडतोब देण्यात यावा, तसेच २०१५-१६ या कालावधीमधील कामगारांना वेतनाच्या फरकाची रक्कम व त्या २० महिन्यांतील बोनस, रजेची रक्कम अद्याप पूर्णपणे अदा करण्यात आलेली नाही. आदी विविध मागण्यांचे निवेदन महापालिका आयुक्तांना शेतकरी कामगार पक्षाच्या वतीने देण्यात आले. तसेच या मागण्या तात्काळ मान्य न झाल्यास कामगारांच्या न्याय्य हक्काकरिता लढा उभारणार असल्याचा इशारा यावेळी शेकापचे ठाणे जिल्हा अध्यक्ष प्रसाद साळवी यांनी दिला आहे.



## बोर्लीमध्ये आरओ वॉटर प्लांटचे उद्घाटन

**। कोर्लई । वार्ताहर ।**

शेतकरी कामगार पक्ष व बोर्ली ग्रामपंचायतीच्या माध्यमातून बोर्ली गावात अनेकविध उपक्रम राबविले जात असून, गावाचा सर्वांगीण विकास हाच एक ध्यास असल्याचे प्रतिपादन ग्रामपंचायतीचे सरपंच चेतन जावसेन यांनी ग्रामपंचायत व साळाव येथील जेएसडब्ल्यू कंपनीच्या माध्यमातून गावातील जुना बाजार येथे उभारण्यात आलेल्या जलशुद्धीकरण (आरओ) प्रकल्पाच्या उद्घाटनप्रसंगी केले.

बोर्ली ग्रामपंचायत व जेएसडब्ल्यू कंपनी यांच्या संयुक्त विद्यमाने जुना बाजार येथे उभारण्यात आलेल्या जलशुद्धीकरण प्रकल्पाचा लोकार्पण सोहळा अस्मिता वामन चुनेकर यांच्या हते पार पडला.

यावेळी ग्रामपंचायत सरपंच चेतन जावसेन, उपसरपंच मतीन सौदागर, मनोहर भोपी, सदस्य गणेश कट, भारती बंदरी, शिंदे मॅडम, भारती पाटील, ग्रामविकास अधिकारी पी.जे.गाडेकर, ग्रामस्थ विशेष करून महिला उपस्थित होत्या.

गेल्या अनेक वर्षांपासून फणसाड धरणातून जलवाहिनीद्वारे गावाला पाणीपुरवठा करण्यात येत आहे. परंतु, याठिकाणी जलशुद्धीकरण यंत्रणा नसल्याने शुद्ध पाणीपुरवठ्याची गरज भासत होती. ग्रामपंचायत व जेएसडब्ल्यू कंपनीच्या माध्यमातून हा प्रश्न सुटला असून, ५० पैसे प्रतिलीटर या अल्प दराने आरओ पाणी उपलब्ध होणार असल्याचे सरपंच चेतन जावसेन यांनी सांगितले.

# जिओनी पळवले श्रीवर्धनकरांच्या तोंडचे पाणी

## फायबर केबलसाठी खड्डा खोदताना जलवाहिनी फुटली

**। श्रीवर्धन । वार्ताहर ।**

शहरात गेल्या महिनाभर जीओ फायबर केबल टाकण्यचे जोरात काम सुरू आहे. दरम्यान, मशीनद्वारे निष्काळजीपणे खड्डे खणत असताना रानवली धरणामधून श्रीवर्धन शहराला पाणीपुरवठा करणारी जलवाहिनी फुटल्यामुळे श्रीवर्धनवासीयांना चार दिवस पाण्यापासून वंचित राहावे लागले आहे.



दरम्यान, केबल टाकण्यासाठी दोन खड्ड्यांमध्ये तीनशे ते चारशे मीटर अंतर ठेवून आठ फूट खोलीचे खड्डे खोदून ठेवण्यात आले होते. खड्डा खणून झाल्यानंतर आजूबाजूला कुठल्याही प्रकारचे बॅरिकेट्स, रिबीन, पांढरा रंग लावलेले दगड ठेवण्याची दखल न घेतल्यामुळे रात्रीच्या सुमारास खड्ड्यात दुचाकी पडल्याच्या घटना ताज्या असतानाच तवसाळकर हॉटेल, नगरपरिषद व श्री सोमजादेवी मंदिराच्या समोर जलवाहिनी फुटल्यामुळे श्रीवर्धनवासियांना चार दिवस पाण्यापासून वंचित राहावे लागले आहे.

रानवली धरण येथे जलशुध्दीकरण प्रकल्पाच्या टाक्यांचे काम सुरू असल्यामुळे तसेच आराठी येथे पाण्याचा साठा करण्यासाठी टाकीचे काम सुरू असल्यामुळे गेले दहा दिवस एक दिवसाआड कमी दाबाने पाणीपुरवठा होत असताना, जलवाहिनी फुटल्यामुळे श्रीवर्धनवासियांना दुष्काळात तेरावा महिना अनुभवायला मिळत आहे.

श्रीवर्धन येथील स्थानिकांनी जीओ कंपनीने पाण्याच्या टँकरद्वारे शहरात पाणीपुरवठा करावा, अशी मागणी केली असून, नगरपरिषदेने जिओ कंपनीकडून आर्थिक दंड वसूल करावा, अशी जोरदार चर्चा सुरु आहे.

# नवनिर्वाचित नगराध्यक्ष, उपनगराध्यक्षांचा सत्कार

**। म्हसळा । वार्ताहर ।**

नगरपंचायत नगराध्यक्ष म्हणून असहल कादरी आणि उपनगराध्यक्षपदी सुनील शेडगे यांची नुकतीच निवड झाली. यानिमित्ताने म्हसळा तालुका शिवसेनेच्या वतीने त्यांचा सत्कार करण्यात आला.

यावेळी माजी तालुका प्रमुख नंदू शिर्के, विद्यमान नगरसेवक अनिकेत पानसरे, युवासेना तालुका अधिकारी अमित महामुनकर, शौकत हजवाने, दीपल शिर्के, बाळा म्हात्रे, अजय करंबे, प्रसाद बोर्ले उपस्थित होते. यावेळी नवनिर्वाचित नगराध्यक्ष व उपनगराध्यक्ष यांनी शहराच्या विकासाची ग्वाही दिली.





लता मंगेशकर यांना श्रद्धांजली वाहताना सार्वजनिक वाचनालयाचे पदाधिकारी. (छायाचित्र : उदय कळस)

# भारतरत्न लता मंगेशकर यांना आदरांजली

**। म्हसळा । वार्ताहर ।**

गानसम्राज्ञी भारतरत्न स्वर्गीय लता मंगेशकर यांना श्रध्दांजली अर्पण करण्यासाठी गुरुवार, दि. १० फेब्रुवारी रोजी उच्च व तंत्र शिक्षण तंत्रशिक्षण विभागाचे माध्यमातून रुईया महाविद्यालय मुबई येथे सभेचे उच्च व तंत्रशिक्षणमंत्री उदय सावंत यांच्या उपस्थितीत कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. त्या सभेत सार्वजनिक वाचनालय म्हसळाचे पदाधिकारी, कर्मचारी, वाचक सहभागी झाले होते.

यावेळी गटशिक्षणअधिकारी मंगेश साळी यानी स्वर्गीय लतादीदींच्या प्रतिमेला पुष्पहार घालून आभिवादन केले. आदरांजलीचे कार्यक्रमाला सार्वजनिक वाचनालयाचे अध्यक्ष संजय खांबेटे, गटशिक्षणाधिकारी मंगेश साळी, हेमंत माळी, सुनिल गायकवाड, एच.बी.इंदुलकर, विनोद सोनावणे, ग्रंथपाल उदय करडे, दिपाली दातार, सायली चोगले, अनिल महामुनकर, अशोक बाक्कर, धनंजय सरनाईक, अनिल बेडके, किशोर पैलकर, अ. सलाम कौचाली व अन्य वाचक उपस्थित होते.

# महाडमध्ये छबिना उत्सवाचे आयोजन

**। महाड । प्रतिनिधी ।**

महाड पोलादपुर तालुक्याचे आराध्य दैवत असलेल्या वीरेश्वर महाजांचा छबिना उत्सव यावर्षी भव्य स्वरुपांमध्ये साजरा करण्यात येणार आहे. कोरोनाच्या प्रादुर्भावामुळे उत्सव साजरा करण्यात आला नाही; परंतु यावर्षी छबिना उत्सव नेहमीप्रमाणे पारंपरिक पद्धतीने साजरा करण्यात येणार असल्याची माहिती वीरेश्वर देवस्थान ट्रस्टचे सरपंच दीपक वारंगे यांनी दिली. मोठ्या संख्येने भाविकांनी सहभागी व्हावे, असे आवाहन करण्यात आले आहे.

यावर्षी व्यापारी दीपक वारंगे यांनी सरपंचपदाची जबादारी स्वीकारली असून, उपसरपंच म्हणून रमेश नातेकार काम पाहणार आहेत. त्याचबरोबर विश्वस्त म्हणून दिलीप पार्टे, अनंत दामोदर शेट, वसंत गोगावले, संजय पवार, अविकुमार धुळे आणि गणेश वडके यांच्या मार्गदर्शना खाली उत्सव साजरा करण्यात येत आहे. यावर्षी रविवार, दि.२७ फेब्रुवारी ते शनिवार दि.५ मार्च या कालावधीमध्ये साजरा करण्यात येणार आहे.

# हिजाबप्रकरणी योग्यवेळी हस्तक्षेप : सुप्रीम कोर्ट

**। नवी दिल्ली । वृत्तसंस्था ।**

देशभरात सध्या कर्नाटकमधील हिजाब वादावर राजकारण सुरू झालं आहे. कर्नाटकच्या उडुपीमधल्या एका महाविद्यालयाने मुस्लीम मुलींना हिजाब घालून महाविद्यालयात प्रवेश नाकारल्यानंतर हा वाद सुरू झाला. यासंदर्भात कर्नाटक उच्च न्यायालयाने या प्रकरणाचा निकाल लागेपर्यंत विद्यार्थ्यांनी धार्मिक पेहरावाचा आग्रह करू नये, असे निर्देश दिल्यानंतर हे प्रकरण थेट सर्वोच्चन्यायालयापर्यंत पोहोचलं आहे. या मुद्द्यावर आता सर्वोच्च न्यायालयाने आपली भूमिका स्पष्ट केली असून, योग्य वेळी आम्ही हस्तक्षेप करू, असं न्यायालयानं सांगितलं आहे.

शुक्रवारी यासंदर्भात सर्वोच्च न्यायालयात दाखल झालेल्या एका याचिकेवर सुनावणी घेण्यास नकार देत न्यायालयानं आपली भूमिका मांडली. कर्नाटक उच्च न्यायालयाने दिलेल्या निर्देशांच्या विरोधात ही याचिका दाखल करण्यात आली होती. मात्र, त्यावर सुनावणी घेण्यास न्यायालयानं नकार दिला.

कर्नाटक उच्च न्यायालयाने दिलेल्या अंतरिम आदेशांमध्ये प्रकरणाचा निकाल लागेपर्यंत धार्मिक पेहरावाचा आग्रह न करण्याचे निर्देश दिले आहेत. याला आव्हान देणारी याचिका काही विद्यार्थ्यांच्या माध्यमातून सर्वोच्च न्यायालयात दाखल करण्यात आली होती. त्यावर सरन्यायाधीशांनी आपली भूमिका मांडली.

> **या प्रकरणात सर्वोच्च न्यायालय योग्य वेळी हस्तक्षेप करेल. या गोष्टी राष्ट्रीय पातळीवर पसरवू नका.**
> **– एन.व्ही. रमना, सरन्यायाधीश**

**याचिकाकर्त्याला फटकारलं**

दरम्यान, आपल्याला यावर काहीही बोलायचं नाही, असं देखील सरन्यायाधीश यावेळी म्हणाले. ही गोष्टी व्यापक स्तरावर नेऊ नका. कर्नाटकमध्ये आणि कर्नाटक उच्च न्यायालयात काय सुरू आहे हे आम्हालाही माहिती आहे. तुम्हीही यावर विचार करायला हवा, की हा मुद्दा दिल्लीपर्यंत (सर्वोच्च न्यायालय) आणणं योग्य आहे की नाही, अशा शब्दांत सरन्यायाधीशांनी याचिकाकर्त्यांना फटकारलं आहे.

## पान १ वरुन

### डोलवी एमआयडीसी प्रकल्प रद्द करा

यापूर्वी तालुक्यातील शेतकऱ्यांनी सेझविरुद्धची लढाई जिंकली आहे. जेएसडब्ल्यू कंपनीने या जमिनीची मागणी केली असेल, तर आपली लढाई कंपनीविरोधात असेल. स्थानिकांना कंपनीत प्राधान्य मिळाले पाहि. या जिल्ह्यातील दोन मंत्र्यांनी एमआयडीसी रद्द करावी, असे आवाहनही आ. जयंत पाटील यांनी केले. याशिवाय या प्रकरणाबाबत विधान परिषदेत आवाज उठविणार असल्याचेही त्यांनी सांगितले. या भूसंपादनाला येथील शेतकऱ्यांनी विरोध दर्शविला आहे. या सभेत सामाजिक कार्यकर्ते अरुण शिवकर, वैशाली पाटील आदींनी मनोगत व्यक्त केले.

शेतकऱ्यांची एकजूट महत्त्वाची आहे. पूर्वजांनी जपणूक केलेल्या जमिनी वारसा हक्काने राखायच्या आहेत. पुढच्या पिढीला वारसा हक्क मिळाला पाहिजे. एमआयडीसी रद्द केली नाही तर येथील शेतकरी सरकारला ऐकणार नाहीत. विधानसभेत याबाबत आमदार म्हणून आवाज उठविला जाईल.

- आ. रवी पाटील, पेण

### गाळेधारकांसाठी रस्त्यावर उतरणार

की मूळचे जुने गाळेधारक आहेत, त्यांना गाळे दिल्यानंतरच इतर गाळ्यांचे लिलाव करण्यात येतील. त्यावर नगरसेवक संतोष पाटील यांनी सांगितले होते की, तुमच्या समितीचे आवाहल येइपर्यंत तुम्ही थांबू नका. जे काही ११ किंवा १५ गाळेधारक आहेत, त्यांना जागा उपलब्ध करून द्या व त्यांच्यासाठी प्राधान्य क्रमांक पहिला देऊन जी रक्कम भरून घ्यायची आहे ती घ्या. परंतु, आजच्या स्थितीला गाळेधारकांना त्रास देऊ नये. त्यानंतर पूर्ण सभागृहात ठराव सहमत झाले असतानादेखील नगरपालिका प्रशासन कुणाच्या सांगण्यावरुन जर गाळेधारकांना जागा खाली करण्यास भाग पाडत असतील, तर शेकाप ते कधीच मान्य करणार नाही.

पुढे त्यांनी असेही सांगितले की, जेव्हा नगरपालिकेला भाजी मार्केट बांधण्यासाठी जागेची आवश्यकता होती, तेव्हा याच गाळेधारकांना गोड बोलून बाजूला सरकवले. तसेच नगरपालिकेने स्वखर्चात पत्र्याचे गाळे काढून दिले. जर गाळेधारकांचा हक्क नसता, तर नगरपालिकेने स्वतःचे पैसे खर्च करून गाळे बांधून दिले असते का? मात्र, आज इमारत होताच नगरपालिका प्रशासन गाळेधारकांवर उलटली आहे. एकंदरीत काय, तर गरज सरो आणि वैद्य मरो अशाच प्रकारचा पवित्रा जणू काही नगरपालिकेने घेतला आहे. मात्र, या नगरपालिकेच्या दडपशाही पद्धतीला शेकाप जशास तसे उत्तर दिल्याशिवाय राहणार नाही. आणि कुणी राजकीय मंडळी प्रशासनाला आपल्या म्हणण्या नुसार वागायला सांगून जर मुळ जुन्या गाळेधारकांना त्रास देत असेल तर त्या मंडळीना ही योग्य तो उत्तर दिला जाईल यात काही शंका नाही. शेतकरी कामगार पक्ष हा खंबीरपणे गाळेधारकांच्या सोबत आहे, असे शेवटी शोमेर पेणकर यांनी प्रसारमाध्यमांना सांगितले.

### दरबार हॉलचे उद्घाटन

आलेल्या दरबार हॉलचे उद्घाटन राष्ट्रपती रामनाथ कोविंद यांच्या हस्ते आज संपन्न झाले.

कार्यक्रमाला राष्ट्रपतींच्या पत्नी सविता कोविंद, राज्यपाल भगतसिंह कोश्यारी, मुख्यमंत्री उद्धव ठाकरे, उपमुख्यमंत्री अजित पवार, सार्वजनिक बांधकाम मंत्री अशोक चव्हाण, राजशिष्टाचार मंत्री आदित्य ठाकरे, मुंबई उच्च न्यायालयाचे मुख्य न्यायमूर्ती दीपांकर दत्ता, विधान परिषदेच्या उपसभापती डॉ. नीलम गोऱ्हे, विधानसभेचे उपाध्यक्ष नरहरी झिरवाळ, राज्यमंत्री अदिती तटकरे, माजी मुख्यमंत्री सुशील कुमार शिंदे, माजी राज्यपाल राम नाईक, डॉ. डी.वाय. पाटील व पद्मनाभ आचार्य तसेच इतर निमंत्रित उपस्थित होते. दरबार हॉलच्या उद्घाटनानिमित्त राज्यातील जनतेचे अभिनंदन करताना महाराष्ट्र राज्याच्या महानतेला विविध आयाम असल्याचे राष्ट्रपती कोविंद यांनी सांगितले. संतांची, वीरांची व समाज सुधारकांची भूमी असलेले महाराष्ट्र हे आज देशातील प्रमुख आर्थिक व सांस्कृतिक केंद्र झाले असल्याचे राष्ट्रपतींनी सांगितले. यावेळी राष्ट्रपतींनी छत्रपती शिवाजी महाराज, संत ज्ञानेश्वर, संत एकनाथ, संत तुकाराम, महात्मा फुले, लोकमान्य टिळक, आगरकर, डॉ बाबासाहेब आंबेडकर, डॉ हेडगेवार यांचा कार्याचे स्मरण केले. दिवंगत पार्श्वगायिका लता मंगेशकर यांचे संगीत अमर असल्याचे त्यांनी सांगितले.

### आगीत संसाराची राखरांगोळी

राम यांच्या डोळ्यातील अश्रू थांबत नव्हते. तलाठ्यांनी लागलीच घटनास्थळी जाऊन पंचनामा केला आहे. यावेळी पोलीस पाटील शिवमूर्ती पवार व गावकरी उपस्थित होते. ही आग नक्की कशाने लागली याचे कारण अद्याप समजलेले नाही. मात्र, आग शॉर्ट सर्किटमुळे लागली असल्याचा अंदाज राम यांनी व्यक्त केला. गावकऱ्यांनी मिळून ही आग आटोक्यात आणली. मात्र, तोपर्यंत मोठे नुकसान झाले होते.

### रायगडात 'जलजीवन', स्वच्छतेला मिळणार गती

घनकचरा व सांडपाणी व्यवस्थापनाची कामे करावयाची आहेत. त्यामुळे ग्रामपंचायत स्तरावर ग्राम पाणीपुरवठा व स्वच्छता समिती स्थापन करणे गरजेचे आहे. महाराष्ट्र ग्रामपंचायत अधिनियम १९५८ कलम ४९ नुसार बनवलेली ग्राम पाणीपुरवठा व स्वच्छता समिती ही ग्रामपंचायतीची उपसमिती आहे. पाणी व स्वच्छता प्रकल्पाची आखणी, नियोजन, अंमलबजावणी व देखभाल दुरुस्ती करण्याची जबाबदारी पाणीपुरवठा व स्वच्छता समितीची असल्याची माहिती डॉ. किरण पाटील व डॉ. ज्ञानदा फणसे यांनी दिली आहे.

**MAHATRANSCO**
Maharashtra State Electricity Transmission Co. Ltd.

**e-TENDER NOTICE**

MSETCL invites online bids (e-Tender) from reputed and registered contractors on Mahatransco e-Tendering Website **https://srmetender.mahatransco.in/** for the following Tender specification.

| RFX | Description | Estimated cost |
|---|---|---|
| Tend-33/ 2021-22 7000021956 | Work of replacement of existing old 0.2 ACSR conductor of 100kV Apta – Thal, 100kV Apta –Jite & Jite – Thal with new 0.2ACSR conductor under EHV (O&M) Division Panvel. | Rs. 274.88 Lakhs |

EMD 1% of estimated cost & Tender fee Rs.5000/- + GST. **Submission of bids from 11.02.2022 to 27.02.2022 up to 23:59 hrs, Opening date:-28.02.2022.** For further details visit our website **https://srmetender.mahatransco.in/ Contact Person:** The Executive Engineer(Adm)
Tel No. 022-27459624, Mob. No. 9167026141
E-mail ID **se7200@mahatransco.in**

**Sd/-**
**SUPERINTENDING ENGINEER**
**EHV (O&M) CIRCLE, PANVEL**

## जाहीर नोटीस

**अर्जदारतर्फे ॲड्. श्रीराम ठोसर**

**अलिबाग येथील मे. चिफ ज्युडिशिअल मॅजिस्टेंट यांचे कोर्टात,**
**फौजदारी चौकशी अर्ज क्रमांक २६१/२०२१**

**श्री. अमित राजाराम भावे,** ........... **अर्जदार**

**विरूध्द**

**ग्रुप ग्रामपंचायत, खानाव वगैरे,** .......... **सामनेवाले**

ज्याअर्थी, अर्जदार यांनी न्यायालयात जन्ममृत्यू नोंदणी नियम १९६९ मधील नियम ९(३) व महाराष्टं जन्म- मृत्यू नोंदणी नियम २००० मधील नियम ९(३) अन्वये कै. राजाराम धोंडू भावे यांचा तारीख २२/०४/२०१३ रोजी मृत्यू झाल्याबद्दल जन्म-मृत्यू नोंदणी रजिस्टरमध्ये नोंद घेण्याबाबत सदरचा अर्ज दाखल केला आहे.

त्याअर्थी, तमाम लोकांस या जाहीर नोटीसद्वारे असे कळविण्यात येते की, कै. राजाराम धोंडू भावे यांचा तारीख २२/०४/२०१३ रोजी मृत्यू झाल्याबद्दल दाखला देण्यास हरकत असल्यास त्यांनी नेमल्या तारखेस म्हणजे तारीख १८/०२/२०२२ रोजी या न्यायालयात ठीक सकाळी ११=०० वाजता स्वत: अगर वकिलामार्फत हजर राहून योग्य त्या कागदोपत्री पुराव्यासह लेखी स्वरूपात आपल्या हरकती दाखल कराव्यात. अशा प्रकारे कोणतीही हरकत न आल्यास अर्जदारांच्या लाभांत तसा योग्य तो हुकुम करणेंत येईल व मग मागाहून येणारी कोणतीही हरकत विचारात घेतली जाणार नाही. याची सर्वांनी नोंद घ्यावी.

आज दिनांक ११/०२/२०२२ रोजी माझ्या सहिनीशी व न्यायालयाचे सहिनीशी दिली.

**कनिष्ठ लिपिक**
दिवाणी न्यायाधीश(कनिष्ठ स्तर)
अलिबाग

कोर्टाचा शिक्का

**सहाय्यक अधिक्षक**
दिवाणी न्यायाधिश(कनिष्ठ स्तर)
अलिबाग

प्रोसेस जमा रू. /-

## जाहीर नोटीस

ने. ता. ११/०३/२०२२
नि. १६/D

**अलिबाग येथील दिवाणी न्यायाधीश वरिष्ठ स्तर, यांचे कोर्टांत,**
दिवाणी चौकशी अर्ज ७०/२०१९

**श्री. सचिन सुधीर चाळके ........ अर्जदार**

**विरूद्ध**

**श्री. लालताप्रसाद बद्रीप्रसाद कुशवाह वगैरे, ....... सामनेवाले**

अर्जदार यांनी सदरील अर्ज स्पेशल मुकदमा २७/२००० या कामातील तडजोड हुकुमनाम्यातील अटी व शर्तीचे सामनेवाला यांनी अनुपालन करावे या मागणीकरिता दाखल केले आहे.

सदर अर्जांतील सामनेवाले क्रमांक ३ - धर्मेंद्र हिरालाल कुशवाह, सामनेवाले क्रमांक ४ - रामप्रकाश रणजित कुशवाह, सामनेवाले क्रमांक ५ - रामनरेश छेदालाल कुशवाह सर्व मु. पो. रोहा, तालुका रोहा, जिल्हा रायगड यांस वेळोवेळी कोर्टामार्फत आणि पोस्टामार्फत नोटीस पाठविली असता ते बाहेरगावी गेले असल्याच्या शेऱ्यासह न बजावता परत आली असून बजावणी झालेली नाही.

तरी, सदर सामनेवाले यांस याद्वारे असे कळविणेंत येत आहे की, या अर्जाची पुढील तारीख ११/०३/२०२२ रोजी सकाळी ११.०० वाजता या कोर्टांत स्वत: अथवा प्राधिकृत व्यक्तीमार्फत त्यांनी हजर व्हावे व आपले म्हणणे / कैफियत दाखल करावी. त्याचप्रमाणे बजावणीकरिता स्वत:चा पत्ता दाखल करावा.

सदर तारखेस हजर होण्यास व म्हणणे देण्यास कसुरी केल्यास सदर सामनेवालेविरूध्द योग्य तो हुकुम करणेंत येईल याची नोंद घ्यावी.

आज तारीख ११/०२/२०२२ रोजी माझ्या सहीने व कोर्टाच्या शिक्क्याने दिले.

**कनिष्ठ लिपीक**
**दिवाणी न्यायालय,**
**अलिबाग - रायगड**

कोर्टाचा शिक्का

**अधिक्षक**
**दिवाणी न्यायालय,**
**अलिबाग - रायगड**

# अलिबागकरांनी अर्पण केली स्व. लतादीदींना गीतांजली

। अलिबाग । विशेष प्रतिनिधी ।

पीएनपी नाट्यगृहाच्यावतीने गानसम्राज्ञी भारतरत्न स्व. लता मंगेशकर आणि स्व. पंडित बिरजू महाराज यांना अलिबाग येथे अलिबागमधील गायक कलाकारांनी लतादीदींना स्वरातील एकापेक्षा एक गीत सादर करीत संपूर्ण अलिबागकरांच्या वतीने संगीतमय आदरांजली वाहण्यात आली. यावेळी पीएनपी सहकारी सांस्कृतिक कला विकास मंडळाच्या अध्यक्षा चित्रलेखा पाटील, डॉ. मेघा घाटे, रायगड जिल्हा मध्यवर्ती बँकेचे संचालक ॲड.परेश देशमुख, वेश्वीचे माजी सरपंच प्रफुल्ल पाटील, लायन्स क्लबचे माजी अध्यक्ष भगवान मालपाणी, शरद वरसोलकर, चेंढरेचे माजी उपसरपंच यतिन घरत आदी उपस्थित होते.










कार्यक्रमाच्या सुरुवातीला चित्रलेखा पाटील यांनी स्व. लता मंगेशकर आणि पंडित बिरजू महाराज यांच्या प्रतिमेचे पूजन करीत आदरांजली अर्पण केली. त्यानंतर भूमी काळबेरे हिने आपल्या स्वरातून लतादीदींचे 'सुन्या सुन्या मैफिलीत माझ्या' हे सुंदर गीत सादर करीत लतादीदीवाचून मैफिल अधुरी असूनही त्यांच्या गाण्याने त्यांचे अस्तित्व दाखवून दिले. 'मेरी आवाज ही पहचान है' हे गीत सादर करीत त्यांच्या स्वराच्या महिम्याची जाणीव करुन दिली. तर रेश्मा पाटील यांनी 'लग जा गले' हे गीत सादर करीत त्या पाठोपाठ 'रहे ना रहे हम' या सुंदर गीतातून जणू काही दीदी आपल्यातच असल्याचा भास झाला. तर प्रसिद्ध नृत्यदिग्दर्शक पंडित बिरजू महाराज यांना नृत्यांजली अर्पण करण्यासाठी नृत्यदिग्दर्शक अमोल कापसे यांनी पंडितजींचे किस्से आणि आठवणी सादर करतच नृत्यातून त्यांना आदरांजली अर्पण केली. त्यानंतर पुन्हा एकदा भुमीने 'दिल हुम हुम करे' चा स्वर लावत अलिबागकरांना लतादीदींच्या स्वर विश्वात नेले. 'सोला बरस की बाली उमर को सलाम' सादर करुन रसिकांना मंत्रमुग्ध केले. त्यानंतर आलेल्या रेश्मा पाटील यांनी 'आपकी नजरोने समझा आणि नैनो मे बदरा छाये' हे गीत सादर करीत लतादीदींचा स्वर महिमा सादर केला. तर योगेश आग्रावकर यांनी लतादीदीचे द्वंद गीत 'सुर तेच छेडिता' सादर करुन वाहवा मिळवली. तर अमोल कापसे यांनी लता दीदींच्या 'लुका छूपी बहोत हुयी' या गीतावर नृत्य अदाकारी सादर केली. भूमी काळबेरे हिने 'बेदर्दी बालमा तुझको मेरा मन' आणि 'रुके रुके से कदम' या गीतातून कार्यक्रमाच्या शेवटाकडे नेले तर रेश्मा पाटील यांनी 'अखेरचा हा तुला दंडवत' गीतातून लतादीदींना स्वर आदरांजली अर्पण करत शेवटी लतादीदींचे अजरामर देशभक्तीपर गीत सादर करतानाच अलिबागकर रसिकांनी उभे राहून लतादीदींना आदरांजली अर्पण केली.

या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन करताना संगीतकार विक्रांत वार्डे यांनी लतादीदींच्या जीवनपट उभा केला. त्यांनी दीदींचे अनेक किस्से सांगत कार्यक्रमात रंगत आणली.

## ठेकेदारांमुळे सरेभाग ग्रामस्थांची फरफट

। पेण । वार्ताहर ।

पेण तालुक्यांतील वाशी ग्रुप ग्रामपंचायत हद्दीतील वाशी सरेभाग हा रस्ता प्रधानमंत्री ग्राम सडक योजनेअंतर्गत सन २०१८ मध्ये मंजुर झाला. त्या रस्त्याच्या कामाचा ठेका एप्रिल १८ मध्ये मे व्ही. एस. कन्स्ट्रक्शन, खोपटा, उरण या कंपनीला देण्यात आलेला आहे. सदरचे काम पुर्ण करण्याची मुदत १२ महिने इतकी होती. काम सुरू करण्याची मुदत संपून २१ महिने अधिक झाले. तरीही ठेकेदाराने आतापर्यंत अवघे ३० टक्केच्या जवळपास इतकेच काम केलेले आहे. ठेकेदाराने आतापर्यंत केलेले काम अतिशय निकृष्ठ दर्जाचे असून काम पूर्ण होण्यापूर्वीच हा रस्ता अनेक ठिकाणी खचला आहे.

वाशी सरेभाग येथील रस्त्याच्या कामाची लांबी ४/६५० कि.मी. इतकी आहे व हे काम करण्यास हा ठेकेदार सक्षम असल्याची खात्री न करता त्याला हे काम दिल्याचे स्थानिक ग्रामस्थांचे म्हणणे आहे. या कामांत एकूण दोन पुलांचा समावेश असून या ठेकेदाराने एकाही पुलाचे काम अद्याप सुरू केलेले नाही. यातील एका ठिकाणी ग्रामस्थांनी स्वखर्चाने जाण्यायेण्यासाठी २५ मीटर लांब व दिड फूट रुंद लाकडी तरंगता साकव (पुल) तयार केला असुन हा साकव सद्यस्थितीत मोडकळीस आला आहे. यावरुन रहदारी करतांना कधीही अपघात होवून जिवीत हानी होवू शकते. रस्त्याचे काम सुरू झाल्यामुळे व या नविन रस्त्यावरून जाणे येणे केल्याने जुने पारंपारिक मार्ग बंद झाले आहेत. त्यामुळे अस्तित्वात असलेल्या याच मार्गावरून जिव धोक्यात घालून सरेभाग गावात जाणाऱ्या व येणाऱ्या ग्रामस्थांना प्रवास करावा लागत आहे. रस्ता व पुलाअभावी गेली अनेक वर्ष ग्रामस्थांना खूप मोठ्या अडचणीला सामोरे जावे लागत आहे.

२७ जानेवारी २०२२ रोजी ग्रामस्थांनी उपविभागीय अधिकारी याचे कार्यालयासमोर धरणे आंदोलन केले होते. या आंदोलनात वाशी सरपंच गोरख पाटील, राजेंद्र झेमसे, रुपेश पाटील, रेश्मा पाटील व ग्रामस्थ मोठया संख्येने या आंदोलनात सहभागी झाले होते.

## पूरक्षेत्रांतील बांधकाम परवानगीबाबत फेरविचार करण्याची मागणी

### महाड तालुका पत्रकार संघाचे जिल्हाधिकाऱ्यांना निवेदन

। महाड । प्रतिनिधी ।

महाड शहर आणि तालुक्यांत २१-२२ जुलै २०२१ रोजी महाप्रलयंकारी पूरामुळे शहर आणि परिसरांतील दहा गावांना पुराच्या पाण्याचा मोठा फटका बसला. या पूरामुळे नागरिकांचे त्याच बरोबर व्यापाऱ्यांच्या दुकानांचे प्रचंड नुकसान झाले. शहरात ज्या भागांमध्ये सातत्याने पाणी येते त्या क्षेत्रामध्ये इमारतीचे बांधकामाची परवानगी देत असताना त्यावर फेरविचार करण्यांत यावा, अशी मागणी महाड तालुका पत्रकार संघातर्फे करण्यात आली आहे. पत्रकार संघाचे अध्यक्ष निलेश पवार, मिलींद माने, उदय सावंत यांनी रायगड जिल्हाधिकारी यांची भेट घेऊन निवेदन देण्यांत आले.

शहराच्या परिसरांमध्ये गेल्या दहा ते पंधरा वर्षात नागरी वसाहत वाढल्याने बांधकामे देखील मोठ्या प्रमाणांत उभारण्यांत आली आहेत. सावित्री नदीच्या किनाऱ्यावर महाड शहर वसलेले असल्याने त्याचबरोबर या शहराच्या परिसरांतील नागरिकांचे दैनंदिन व्यवहार महाड शहरावर अवलंबून असल्याने या शहराचे महत्त्व वाढत आहे. त्याचबरोबर शहराची लोकसंख्या वाढत असताना इमारतींचे बांधकाम करण्यात येत आहे. शहरापासून दहा किलोमीटर अंतरावर असलेल्या गावांमध्ये

**२२ जुलैला महाभंयकर पूर**

**महाड शहरांमध्ये गेल्या अनेक वर्षा पासून पुराचे पाणी येत असुन पाणी शहरांत आल्या नंतर काही काळांतच शहरांतुन पाण्याचा निचरा होत असे, मात्र आता अनधिकृत बांधकाम मुळे पाण्याचा निचरा त्वरीत होत नाही,त्याचा फटका २२ जुलै रोजीच्या पुराने नागरिकांना अनुभवण्यास मिळाला.**

व्यावसायिक त्याचबरोबर निवासी बांधकामे करताना नियमांचे उल्लंघन करण्यात येते. नगरपालिका त्याचबरोबर ग्रामपंचायत क्षेत्रांमध्ये करण्यात आलेल्या बांधकामाकडे स्थानिक प्रशासनाकडून दुर्लक्ष केले जात असल्याने नदीतील पाण्याच्या प्रवाहावर त्याचा परिणाम होत आहे. पुर नियंत्रण रेषेचा भंग करुन बांधकामे करण्यात आली.

जलसंपदा विभागातर्फे सावित्री खाडीमध्ये ब्ल्यू लाईन व रेड लाईन या पूरनियंत्रण रेषांची आखणी केली आहे. परंतु सदरची आखणी ही नदीपुरतीच असल्याने त्या पुर नियंत्रण रेषांसंदर्भात स्थानिक प्रशासनाने बांधकामाला परवानगी देताना याचा विचारच केलेला नाही. नदीच्या किनारी बांधकामाला परवानगी देताना नगरपालिका अभियंता आणि ग्रामपंचायतीचे ग्रामसेवक यांनी बांधकामाला फक्त परवानग्या दिल्या, परंतु त्याच्या होणाऱ्या गंभीर समस्यांकडे जाणीवपूर्वक दुर्लक्ष केले असल्याचा आरोप पत्रकार संघाचे अध्यक्ष निलेश पवार यांनी केला आहे.

भविष्यांमध्ये याचे गंभीर परिणाम महाडकरांना भोगावे लागतील असा इशारा दिला असून, शासनाने नदीच्या किनारी बांधकामाला परवागी देऊ नये, अशी मागणी लेखी निवेदनाने महाड तालुका पत्रकार संघाने केली आहे.

## महत्त्वाचे

### मोहोकर यांच्या नगरसेवक निधीतून हायमास्ट पथदिवे

। पनवेल । प्रतिनिधी ।

पनवेल महानगरपालिकेच्या शेतकरी कामगार पक्षाच्या नगरसेविका डॉ. सुरेखा विलास मोहोकर यांच्या नगरसेवक निधीतून प्र. क्र.१८ मध्ये चार ठिकाणी ९ मीटर उंचीचे हायमास्ट-पथदिवे लावण्यात आले आहेत. विरोधी पक्षनेते प्रीतम म्हात्रे यांच्या हस्ते व शे.का.प.जिल्हा चिटणीस नगरसेवक गणेश कडू यांच्या उपस्थितीत उद्घाटन करून लोकार्पण करण्यात आले. कार्यक्रमास नगरसेविका प्रीती जॉर्ज, माजी नगरसेवक डी.पी. म्हात्रे, विजय मोहोकर, शरद मोहोकर, विजय उरणकर, गजरे, हास्य क्लबचे अध्यक्ष नाझरे व इतर ज्येष्ठ सदस्य, कामरे, मनीषा परदेशी,.सापणे, धामणकर, श्याम देशमुख, नंदू भोईर, मंगेश भोईर, मंगेश अपराज, संदेश मोहन, जॉनी जॉर्ज, रोहन गावंड, सुशील तुपे, शंकर मंदिराचे स्वामी निलेश स्वामी उपस्थित होते. प्र. क्र.१८ मधील शिवकृपा सोसायटी लगत, डॉ.आशिष गांधी यांच्या दवाखान्याच्या कोपऱ्यावर, तीर्थरूप नानासाहेब धर्माधिकारी उपजिल्हा रुग्णालय, कैलास पार्क समोर हायमास्ट लावण्यात आले आहेत.

## जिल्हाधिकारी कार्यालयाचा विस्तार होणार

### पालकमंत्र्यांच्या हस्ते भूमीपूजन

। अलिबाग । विशेष प्रतिनिधी ।

रायगड जिल्हाधिकारी कार्यालयाच्या विस्तारीकरण कामाचा भूमीपूजन समारंभ पालकमंत्री अदिती तटकरे यांच्या हस्ते जिल्हाधिकारी कार्यालयाच्या आवारात संपन्न झाला.

यावेळी जिल्हा परिषद अध्यक्षा योगिता पारधी, कोकण विभागीय आयुक्त विलास पाटील, जिल्हाधिकारी डॉ. महेंद्र कल्याणकर, मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ.किरण पाटील, पोलीस अधीक्षक अशोक दुधे, अपर जिल्हाधिकारी अमोल यादव, निवासी उपजिल्हाधिकारी डॉ.पद्मश्री बैनाडे, डॉ. महेंद्र कुरा, सर्जेराव म्हस्के-पाटील, सुषमा सातपुते,



मेहेत्रे, मधुकर बोडके, डॉ. सुहास माने, जे.ए.सुखदेवे, विशाल दौंडकर, सचिन शेजाळ, सतिश कदम, गोविंद वाकडे, प्रशांत ढगे, मीनल दळवी आणि जिल्हाधिकारी कार्यालयातील इतर अधिकारी-कर्मचारी उपस्थित होते.

## मतिमंद मुलांसाठी खाद्यपदार्थ प्रक्रिया व्यवसाय प्रशिक्षण

। अलिबाग । वार्ताहर ।

कौशल्य विकास व उद्योजकता मंत्रालय भारत सरकार यांच्या माध्यमातून जिल्ह्यामध्ये कार्यरत असणारी जन शिक्षण संस्था रायगड या योजनेत कार्य करत असणाऱ्या अलिबाग तालुक्यातील राजमाता जिजाऊ शाळा आरसीएफ कॉलनी येथे सोलरवर आधारित खाद्यपदार्थ प्रक्रिया व्यवसाय प्रशिक्षण सी. एस.आर, जेएनपीटी मुंबई व जन शिक्षण संस्थान रायगड यांच्या आर्थिक सहकार्यातून व्यवसाय प्रशिक्षण ११ फेब्रुवारी संपन्न झाले.



या व्यवसाय प्रशिक्षणात विद्यार्थी व पालकांसाठी खाद्यपदार्थ प्रक्रिया व्यवसाय प्रशिक्षण पूर्ण केले आहे. संस्थेच्या संस्थापक अध्यक्षा डॉ. मेधा सोमैया, डॉ. नितीन गांधी, ॲड. निला तुळपुळे, नरेन जाधव, विजय कोकणे, सिमा विषे, सुजाता देसाई, सुशील रुळेकर, प्रतिक्षा चव्हाण, सुकन्या नांदगावकर, ओंकार बोरकर, स्नेहा म्हात्रे, मतिमंद विशेष मुले व पालक यांच्या उपस्थितीत व्यवसाय प्रशिक्षण कोरोनाजन्य परिस्थितीचे सर्व नियम पाळून पार पडला.

## सरकारी कर्मचाऱ्यांचा लाक्षणिक संप

। माणगाव । प्रतिनिधी ।

आपल्या प्रलंबित मागण्यांसाठी राज्य सरकारी-निमसरकारी कर्मचारी शिक्षक-शिक्षकेत्तर कर्मचारी समन्वय समितीच्या माणगाव शाखेचे राजेंद्र खाडे यांच्या नेतृत्वाखाली राज्यव्यापी संप २३ व २४ फेब्रुवारी रोजी दोन दिवसाचे लक्षणीय संपात सहभागी होणाऱ्या निर्धार व्यक्त करीत माणगाव तहसीलदारांना लेखी निवेदन देण्यात आले.

## क्लासिफाईड

*जाहिरात छोटी, उपयुक्तता मोठी*

- पाहिजेत स्टाफ नर्स जन्नावार हॉस्पिटल, बाय पास रोड चेंढरे, अलिबाग. ९४२३८९०३१०
- विवाह, पुर्नविवाह सर्वजातीय आंतरजातीय स्थळांसाठी रोहा गणेश महाकाळ. ८८८८९३५७७५, ९२७०४३३४८७
- श्री सिद्धीविनायक ज्योतिष सर्व समस्यांचे शीघ्र निवारण, नोकरी धंदा, गृहक्लेश, व्यापारवृद्धी, प्रेमसमस्या, लग्नामधली अडचण फोन नं. ९९६०४५६९८६/८८०६४७९१७३, अलिबाग
- वधु २५ वर्ष, ५-३ एफ. वाय.बी.ए. तीन बहिणी, त्वरित लग्न ७०३८४३८५०३
- अलिबागमध्ये कॉफी शॉपमध्ये कामासाठी मुलगा पहिजे- संपर्क- ८६९८५०३८८८
- वरसोली बिच रोड येथे 1BHK फुल फर्निश ब्लॉक विकणे आहे. नंबर- ८८०५५४०४६४
- अलिबागमधील ऑफिसकरिता आर्किटेक्ट, इंटिरियर डिझायनर आणि ड्राफ्ट्समन पाहिजे. मोबाईल नंबर- ८००७४५२१४६

जाहिरातीसाठी संपर्क
☎ (०२१४१) २२२२९०/ २२२७६१

## नागाव हायस्कूलमध्ये विद्यार्थ्यांचे लसीकरण

### चित्रलेखा पाटील यांच्या हस्ते धान्य वाटप

। अलिबाग । प्रतिनिधी ।

कोरोनाच्या नव्या विषाणूचे सावट पाहता शासन निर्देशानुसार १५ ते १८ वर्ष वयोगटासाठी जिल्ह्यात लसीकरण मोहिम राबविण्यात येत आहे. याच पार्श्वभूमीवर संचालक मंडळ हायस्कूल, नागावमधील विद्यार्थ्यांचे लसीकरण करण्यात येत आहे. शुक्रवारी (दि.११) नागाव हायस्कूलमध्ये लसीकरणाचा उपक्रम राबविण्यात आला. यावेळी शेकाप जिल्हा महिला आघाडी प्रमुख चित्रलेखा पाटील यांनी उपस्थित राहून लसीकरण करणाऱ्या विद्यार्थ्यांना मोफत धान्य वाटप केले.

यावेळी नागांव ग्रामपंचायत सदस्या हर्षदा मयेकर, डॉ. मकरंद आठवले, लसीकरण करणाऱ्या कर्मचारी तसेच शाळेचे मुख्याध्यापक अजित पाटील, सहशिक्षिका जान्हवी बनकर, मोहन पाटील, गिरी, विद्यार्थी व पालक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

शाळा-महाविद्यालयात कोरोनाचा शिरकाव होऊ लागल्याने केंद्र शासनाच्या आरोग्य विभागाच्या सूचनेनुसार १५ ते १८ वयोगटासाठी लसीकरणास जिल्ह्यात सुरुवात झाली. याबाबत नागाव ग्रामपंचायतीनेही पुढाकार





घेत परिसरातील विद्यार्थ्यांचे लसीकरण व्हावे, यासाठी शाळेतच लसीकरण मोहिमेस सुरुवात केली. त्यामुळे पालकांकडून ग्रामपंचायत सरपंच निखिल मयेकर तसेच सदस्यांचे आभार व्यक्त करण्यात येत आहेत.

## नगरपरिषदेमार्फत लेखणी बंद आंदोलन

। आगरदांडा । वार्ताहर ।

अमरावती महानगरपालिका आयुक्त प्रविण आष्टीकर यांच्यावर झालेल्या हल्ल्याच्या निषेधार्थ मुरुड जंजिरा नगरपरिषदेच्यावतीने लक्षणीय काम बंद आंदोलन सुरू केले आहे. यावेळी परेश कुंभार, संजय वेटकोळी, प्रशांत दिवेकर, नरेंद्र नांदगावकर, साहिल मुजावर, कपिल वेहेले आदींसह कर्मचारी, अधिकारी उपस्थित होते.

## झेप फाऊंडेशनतर्फे हळदीकुंकू समारंभ साजरा

### चित्रा पाटील यांचा स्तुत्य उपक्रम, पाच हजारहून अधिक महिलांची उपस्थिती

। कुसुंबळे । वार्ताहर ।

अध्यक्षा चित्रा आस्वाद पाटील यांच्या झेप फाऊंडेशनतर्फे आयोजित नवेनगर पेझारी येथे 'सौभाग्याचे लेणं' हळदीकुंकू समारंभ मोठ्या उत्साहपूर्ण वातावरणात संपन्न करण्यात आला. यावेळी आजूबाजूच्या परिसरातील जवळजवळ पाच हजारांहून अधिक महिलांनी आपली उपस्थिती दर्शवून हळदी कुंकू समारंभाचा आस्वाद घेतला. सर्वप्रथम सुलभाकाकू यांच्या स्मृतीस विनम्र अभिवादन करण्यात आले. त्यानंतर महिला आघाडी कोर कमिटी मेंबर यांच्या सहकार्याने तसेच चित्रा पाटील यांच्या हस्ते उपस्थित सर्व महिलांना हळदीकुंकू व वाण देण्याचा कार्यक्रम सुरू झाला. त्यावेळी व्यासपीठावर एकता नाचमंडळ मोठे शहापुर यांच्या नाच मंडळाने पारंपारिक पद्धतीने नृत्य सादर करून उपस्थितांची मने जिंकली. यावेळी माजी राज्यमंत्री मीनाक्षी पाटील, अर्बन बँकेच्या चेअरमन सुप्रिया पाटील, पंचायत समिती सभापती प्रमोद ठाकूर, जिल्हा परिषदेचे माजी उपाध्यक्ष ॲड. आस्वाद पाटील, पंचायत समिती सदस्य रचना थोरे, सामाजिक कार्यकर्ता निलेश थोरे, जिल्हा परिषद सदस्या प्रियदर्शनी पाटील, ताडवागळे उपसरपंच शैलेश पाटील, सुनील पिंगळे, जगदीश पाटील, संपदा म्हात्रे व सर्व महिला आघाडी प्रतिनिधी, ओजस पाटील, अर्णव पाटील यांची प्रमुख उपस्थिती होती. यावेळी महिला बचत गट, सरपंच, उपसरपंच, सदस्य, सदस्या तसेच शेकापचे अनेक कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते. यावेळी महिलांनी गाणी गायली तसेच सुवासिनींनी यावेळी उखाणे घेतले. झेप फाऊंडेशनने गेले १२ वर्षे पूर्वीपासून एकत्रितरित्या हळदीकुंकू साजरा करण्याची परंपरा अखंड सुरू ठेवली. या उपक्रमात पाच हजारहून अधिक महिलांनी सहभाग घेवून आनंद साजरा केला. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन व आभार प्रदर्शन जिविता पाटील यांनी केले.





## कृषीवलच्या वाचकांना आवाहन

अन्नदान हे श्रेष्ठ दान आहे. आपला वाढदिवस, लग्नाचा वाढदिवस तसेच आपल्या नातेवाईक-मित्रांच्या स्मृतिदिनी आपण समाजातील तळागाळातील लोकांना अन्नदान करावे असे आवाहन कृषीवल आपणाला करीत आहे. अलिबाग येथील श्री कच्छी जैन भवन चॅरिटेबल ट्रस्टच्या वतीने अन्नदानासाठी एक अभिनव योजना आखली आहे. जिल्हा रुग्णालयात दुर्गम भागातील राहणारे आदिवासी, मोलमजुरी करणारे, गोर-गरीब रुग्ण विविध उपचारांसाठी येथे येत असतात. ज्यांच्याकडे येण्या-जाण्याचे देखील पुरेसे पैसे नसतात आणि यात घरातला कमवता पुरुष जर आजारी असेल तर या लोकांची मोठी आर्थिक कुचंबणा होत असते. यासाठी या ट्रस्टच्या वतीने जिल्हा रुग्णालयात दाखल असलेल्या रुग्णांच्या एका नातेवाईकाला जेवणाची सोय करण्यात आली आहे. जिल्हा रुग्णालयात फक्त रुग्णांसाठी जेवणाची सरकारी सोय असते, त्यांच्या सोबत रुग्णालयात राहणाऱ्या नातेवाईकांना जेवण मिळत नाही. अशा परिस्थितीत रुग्णाच्या नातेवाईकाला फार कठीण परिस्थितीला तोंड देऊन पोटाची खळगी भरावी लागते किंबहुना काही वेळेला उपासमारीचीही वेळ त्यांच्यावर ओढावते. त्यांच्या या अडीअडचणी लक्षात घेऊन श्री कच्छी जैन भवनने असाह्य रुग्णाच्या एका नातेवाईकाला एक वेळचे पूर्ण जेवण देण्यास सुरुवात केली आहे. या योजनेत दररोज किमान ७०/८० लोक जेवत असतात. या जेवणाचा खर्च प्रति दिवस






रु. ३००० असून ही देणगी देणाऱ्याचा फोटो कृषीवलमध्ये छापला जाईल. तरी जास्तीत जास्त लोकांनी अन्नदान सेवेचा लाभ घेऊन या सामाजिक उपक्रमात सहभागी व्हावे असे आवाहन कृषीवल करीत आहे.

**संपर्क- ८०५५३२५६७८ (बीपीन राठवा)**
**९२२६०५५१५५ (अमित शहानंद)**

**- मुख्य संपादक, कृषीवल**

### आजचे अन्नदाते



**. कै. शालिनी विठ्ठल कुंटे स्मरणार्थ कुंटे खानावळ, बाजारपेठ-अलिबाग**

## संपादकीय

# वाढत्या आत्महत्या चिंताजनक

प्रत्येकाच्या जीवनात चढ-उतार येतच असतात. या चढ उताराचा सामना करताना अनेकजण अखेरपर्यंत संघर्ष करीत राहतात तर अनेकजण संघर्ष करायचे सोडून जीवनाची अखेर करतात. हे अत्यंत दुर्दैवी म्हटले पाहिजे. कारण गेल्या तीन वर्षात देशभरात सुमारे १७ हजार १९९ शेतकरी आणि ९ हजाराहून अधिकजणांनी विविध कारणांनी आत्महत्या करुन आपले जीवन संपविले आहे. संकटे प्रत्येकाच्या जीवनात येतात. पण त्या संकटांना घाबरुनच या २५ हजाराहून अधिकजणांनी आपला जीव देणे हे कितपत योग्य आहे याचा सर्वांनीच गांभीर्याने अंतर्मुख होऊन विचार करण्याची गरज निर्माण झालेली आहे. शेतकऱ्यांच्या आत्महत्या हा कृषीप्रधान भारत देशाला लागलेला एक शापच आहे. कारण ज्या देशाची अर्थव्यवस्था कृषीक्षेत्रावरच अवलंबून आहे त्या देशातील बळीराजाच आत्महत्या करीत असेल तर त्यासारखे दुर्दैव दुसरे काय असू शकेल. अर्थात यामागे नैसर्गिक आणि मानव निर्मित कारणेही तितकीच कारणीभूत ठरलेली आहे. भारत हा कृषीप्रधान देश असला तरी येथील बदलत्या हवामानावरच संपूर्ण शेती व्यवसाय अवलंबून आहे. त्यामुळे निसर्ग कसा राहिल यावरच बळीराजाचे भवितव्य अवलंबून राहिलेले आहे. विशिष्ट भौगालिक परिस्थितीमुळे देशात पूर, जलप्रलयाबरोबरच दुष्काळही मोठ्या प्रमाणात असतो. एकीकडे पावसाचे थैमान तर दुसरीकडे पाण्याचा ठणठणाट. एकीकडे पावसाचे पाणी अक्षरश: वाहून जात असते तर दुसरीकडे पाण्यासाठी जमीन, तेथे राहणारे नागरिक देवाकडे धावा करीत असतात. या विषमतेमुळेच देशातील शेतकरी आणि कृषी क्षेत्राची वाताहात होत आलेली आहे. याचा परिणाम पीक उत्पन्नावर होऊन त्याचे पर्यावसान नुकसानीत होत असते. शेतीसाठी काढलेले कर्जही फेडण्याची ताकद बळीराजात नसते. शेतात पीक येवो अथवा नाही येवो ज्याच्याकडून कर्ज घेतले अशा बँका आणि खाजगी सावकार बळीराजाकडे पैशांच्या वसुलीसाठी खेटे मारत त्याच्याकडून सक्तीने कर्जाचे हप्ते वसूल करतात.त्यातून मग मेटाकुटीस आलेला बळीराजा जीवनच संपवून टाकतो. हे विदारक दृश्य देशाच्या प्रत्येक राज्यात प्रकर्षाने दिसते. महाराष्ट्रही त्याला अपवाद नाही. कोकण आणि पश्चिम महाराष्ट्र वगळता राज्याच्या मराठवाडा, विदर्भ, उत्तर महाराष्ट्रात कर्जबाजारी झालेल्या शेतकऱ्यांच्या आत्महत्या करण्याचे प्रमाण सर्वाधिक आहे. हे महाराष्ट्राला अशोभनीय असेच आहे. दुर्दैवाने आतापर्यंत जे जे राज्यकर्ते झाले त्यांनी बळीराजाच्या आत्महत्या कशा थांबविता येतील याकडे गांभीर्याने पाहिलेच नाही. तात्पुरती मलमपट्टी करण्यावरच सर्वच राज्यकर्त्यांनी प्रयत्न केला. त्याला केंद्रातील विद्यमान मोदी सरकारही अपवाद ठरलेले नाही. मागील तीन वर्षाच्या काळात देशभरात तब्बल १७ हजार १९९ शेतकऱ्यांनी तर २०१८ ते २०२० या काळात बेरोजगारीमुळे ९ हजाराहून अधिक लोकांनी आत्महत्या केल्याची आकडेवारी नॅशनल क्राईम रेकॉर्डस ब्युरोच्या हवाल्याने देण्यात आली आहे. सरकारने दिलेल्या या आकडेवारीमध्ये मार्च २०२० मध्ये कोरोनामुळे लागू करण्यात आलेल्या लॉकडाऊननंतर उद्‌भवलेल्या परिस्थितीची केवळ सुरुवातीची आकडेवारीच समाविष्ट करण्यात आली आहे. देशात लॉकाडाऊन केल्यामुळे त्याचा रोजगाराच्या स्थितीवर वाईट परिणाम झाला आहे. रोजगार, उद्योग बंद पडल्याने अनेकांनी आत्महत्या केल्या आहेत. तसेच या काळात अनेक शेतकऱ्यांनी आत्महत्या देखील केल्या आहेत. ही आकडेवारी चिंताजनक आहे. सन २०१८ मध्ये ५ हजार ७६३, सन २०१९ ५ हजार ९५७ आणि २०२० मध्ये देशभरात ५ हजार ५७९ शेतकऱ्यांनी आत्महत्या केल्या आहेत. एकूण ही संख्या १७ हजार १९९ आहे. ही सारी आकडेवारी सर्वसामान्यांच्या उरात धडकी भरवणारी अशीच आहे. हे कुठेतरी थांबणे ही काळाची गरज आहे. कोरोना साथीमुळे मोठ्या प्रमाणात उद्योग बंद झालेले आहेत. जे सुरु आहेत ते पूर्ण क्षमतेने सुरु झालेले नाहीत. त्यामुळे मोठ्या प्रमाणात बेरोजगार झालेले आहेत. त्यात सुशिक्षितांचे प्रमाणही लक्षणीय आहे.आधीच विविध कारणांसाठी घेतलेली कर्जे फेडताना या सर्वांना नाकीदम आलेला आहे. त्यात हातचा रोजगारच हिरावून घेतल्याने दोन वेळच्या खायचे वांदे झालेले आहे. अशा परिस्थितीत जगायचे कसे याचीच भ्रांत या सर्वांना लागलेली आहे. यावर आता सरकारनेच ठोस उपाय शोधून आत्महत्या करणाऱ्यांना रोखणे गरजेचे आहे.

अजय तिवारी

# उत्तराखंड, मणिपूरमध्ये किंगमेकर कोण?

**उत्तराखंडमध्ये भाजप आणि काँग्रेस या दोन्ही पक्षांमध्ये काट्याची लढत होत आहे. सलग दुसऱ्यांदा कुणालाही सत्तेत येऊ न देण्याची मानसिकता असलेलं उत्तराखंड यावेळी काँग्रेसला साथ देतं का, याकडे लक्ष लागलं आहे. अन्य चार राज्यांच्या तुलनेत फारसं लक्ष नसलेल्या मणिपूरमध्ये या वेळी भाजपमध्येच मोठी फाटाफूट झाली आहे. शिवाय भाजपने मित्रपक्षांना वाऱ्यावर सोडलं आहे. त्यामुळे तिथलीही निवडणूक चुरशीची झाली आहे.**



उत्तराखंड राज्यात शेती, सैनिक, विकास हे महत्त्वाचे मुद्दे आहेत. हिंदीभाषक राज्य असलेल्या उत्तराखंडच्या प्रचारात उत्तर भारतातले बहुतांश हिंदीभाषक नेते उतरले आहेत. मध्यप्रदेशमधून दिग्विजय सिंह, शिवराजसिंह चौहान, राजस्थानमधून सचिन पायलट, उत्तर प्रदेशातले बहुतांश नेते तसंच पंजाब आणि दिल्लीतून मोठ्या फौजा उत्तराखंडमध्ये दाखल झाल्या आहेत. भाजपने गेल्या वर्षभरात इथे तीनदा मुख्यमंत्री बदलले. या वेळच्या निवडणुकीचं वैशिष्ट्य म्हणजे काँग्रेस आणि भाजप या दोन्ही पक्षांमध्ये प्रचंड बंडखोरी झाली आहे. दोन्ही पक्षांनी बंडखोरांवर कारवाई केली असली तरी बंडखोरच आता आपापल्या मूळ पक्षाला पराभूत करण्यासाठी मैदानात उतरले आहेत. दोन्ही पक्षांनी निवडणुका कुणाच्या नावावर लढवायच्या हे ठरवलं असलं, तरी मुख्यमंत्रीपदाचे उमेदवार जाहीर केलेले नाहीत. पंजाबमध्ये मुख्यमंत्रीपदाचे उमेदवार जाहीर करणाऱ्या काँग्रेस आणि आम आदमी पक्षाने बंडोबांना जादा संधी मिळू नये, म्हणून मुख्यमंत्रीपदाचे उमेदवार जाहीर करणं टाळलं आहे. राष्ट्रीय महामार्गाच्या बांधणीत मोठा घोटाळा झाल्याचं उघड होऊनही सत्ताधारी भाजप आणि विरोधी काँग्रेसने मौन बाळगलं आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी उत्तराखंडमध्ये यापूर्वीच प्रचारसभा घेतल्या आहेत. काँग्रेसचे माजी अध्यक्ष राहुल गांधी यांनी उत्तराखंडमध्ये प्रचारसभा घेतल्या. दोन्ही पक्ष विकासाच्या गप्पा मारत असले, तरी अजूनही या राज्यांमध्ये वीज आणि पाण्याची मूलभूत सुविधा सर्वत्र पोचलेली नाही. सैनिकांच्या वन पेन्शन, वन रँकचा मुद्दा प्रचारात आणला जात आहे. राहुल यांनी मोदी यांची संभावना २१ व्या शतकातला राजा अशी केली असून त्यांना सामान्यांचे प्रश्न माहीत नसल्याची टीका केली आहे. दोन्ही राजकीय पक्षांनी युवा नेत्यांना प्रचारात उतरवलं आहे. या वेळी 'आप' मोठ्या तयारीनिशी मैदानात उतरला आहे. दोन्ही पक्षांमध्ये सत्ता मिळवण्यासाठी मोठी स्पर्धा आहे. कदाचित 'आप' इथे किंगमेकरची भूमिका वठवू शकतो.

पाचव्या विधानसभेची निवडणूक जिंकण्यासाठी मैदानात उतरलेल्या भाजपला केंद्रीय अर्थसंकल्पातून बूस्टर डोस मिळाला आहे. अर्थसंकल्पात केलेल्या तरतुदी आणि त्यातून उत्तराखंडला निवडणुकीत मिळणारे फायदे यांचं भांडवल करण्यात पक्ष मागे नाही. त्याची ब्ल्यू प्रिंट तयार झाली आहे. भाजपने आपलं नेटवर्क बूथ स्तरापर्यंत पसरवलं असून हे बजेट राज्यासाठी किती फायदेशीर आहे हे सांगण्यावर भर दिला जात आहे. निवडणुकीच्या सभा, बैठका, आभासी बैठका याशिवाय इंटरनेटच्या माध्यमातून होत असलेल्या प्रचारातही तो प्रमुख विषय आहे. विधानसभा निवडणुकीची उमेदवारी प्रक्रिया पूर्ण झाल्यानंतर भाजपने निवडणूक प्रचारात ताकद पणाला लावली आहे. या दरम्यान केंद्रात आणि राज्यात भाजप सरकारचं दुहेरी इंजिनच विकास घडवून आणेल, यावर भाजपचा जोर आहे. गेल्या सात वर्षांमध्ये केंद्राकडून राज्याला मिळालेल्या एक लाख कोटींहून अधिक रुपयांच्या योजना मतदारांमध्ये ठळकपणे मांडल्या जात आहेत. राज्यांना कर्जाच्या स्वरूपात बिनव्याजी मदत, कृषी, पायाभूत सुविधा, पर्वतराजी प्रकल्पातल्या सीमांत भागात रस्त्यांचं जाळं, सेंद्रिय आणि नैसर्गिक शेती, प्रधानमंत्री आवास योजना, मनरेगा आणि पंतप्रधान किसान निधीच्या बजेटमध्ये वाढ यांचा उल्लेख प्रचारात केला जात आहे.

दुसरीकडे काँग्रेसने भाजपच्या गेल्या पाच वर्षांमधल्या अपयशावर बोट ठेवलं आहे. काँग्रेस, भाजप आणि आम आदमी पक्ष आपापल्या विजयाचा दावा करत आहेत. मतदानपूर्व चाचण्यांमध्ये काँग्रेस आणि भाजपमध्ये एक-दोन जागांचाच फरक राहील, असं दिसतं. त्यामुळे सत्तेचं पारडं कुणाकडेही जाऊ शकतं. कदाचित काँग्रेसही सत्तेवर येईल. दोन्हीपैकी कुणालाही बहुमत मिळालं नाही तर आम आदमी पक्ष किंगमेकरच्या भूमिकेत येऊ शकतो. सी व्होटरच्या सर्वेक्षणात भाजप आणि काँग्रेसमध्ये निकराची लढत पहायला मिळत आहे. भाजपला ४३ टक्के मते मिळत आहेत तर काँग्रेसला ४१ टक्के मतं मिळण्याची शक्यता आहे. आम आदमी पक्षाला १३ टक्के मतं मिळू शकतात तर तीन टक्के मतं इतरांच्या खात्यात जाऊ शकतात. अन्य संस्थांच्या चाचण्यांमध्येही असाच कल दिसून येतो. मुख्यमंत्रीपदाचा उमेदवार कुणीही जाहीर केला नसला तरी हरीश रावत आणि पुष्करसिंह धामी यांच्यात स्पर्धा दिसते. अर्थात भाजप आणि काँग्रेसमध्येही मुख्यमंत्रिपदावरून मोठी स्पर्धा आहे. त्यामुळे दोन्ही राजकीय पक्षांनी मुख्यमंत्रिपदाचा उमेदवार जाहीर करणं टाळलं आहे.

ईशान्येकडील मणिपूर या राज्यात विधानसभेची निवडणूक असली तरी माध्यमांतून तिची फारशी चर्चा होताना दिसत नाही. गेल्या वेळी २८ जागा मिळूनही काँग्रेसला सत्तेबाहेर रहावं लागलं होतं. भाजपने इथे प्रादेशिक पक्षांच्या मदतीने सत्ता मिळवली होती. गोव्यासारखीच स्थिती इथे होती. आता मात्र भाजपने प्रादेशिक पक्षांना बरोबर घेतलेलं नाही. भाजप स्वबळावर निवडणुकीला सामोरं जात आहे. अतिशय संवेदनशील असलेल्या या राज्यात दोन टप्प्यांमध्ये मतदान होत आहे. भाजपने मणिपूर विधानसभा निवडणुकीसाठी ६० उमेदवारांची नावं जाहीर केली. या पक्षाने चार आंतरराष्ट्रीय खेळाडूंनाही तिकीट दिलं आहे. मुख्यमंत्री एन. बिरेन सिंह हिंगंण विधानसभा मतदारसंघातून निवडणूक लढवणार आहेत. मणिपूरच्या उमेदवारांची नावं जाहीर करताना भाजप नेते संबित पात्रा म्हणाले होते की मणिपूरमध्ये आमच्या पक्षात कोणताही वाद नाही. आम्ही दोन तृतीयांश बहुमतानं सरकार स्थापन करू; परंतु त्यांच्या वक्तव्याला काही तास होत नाही तोच भाजपला मोठा झटका बसला. गेल्या वेळी निवडणुकीत विजयी झालेले आमदार पी. सरचंद्र यांनी काँग्रेसमध्ये प्रवेश केला. भाजपने तिकीट न दिल्यामुळे त्यांनी हा निर्णय घेतला. त्यांच्यासोबत भाजपचे ज्येष्ठ नेते एन. बिरेन आणि एन. जॉयकुमार यांनीही काँग्रेसमध्ये प्रवेश केला.

निवडणुकीचे उमेदवार जाहीर करताना भाजपने पक्षात सर्व काही ठीक असल्याचा दावा केला होता; मात्र परिस्थिती वेगळी असल्याचं दिसून येत आहे. मोईरंग मतदारसंघाचं प्रतिनिधित्व करणाऱ्या सरचंद्र यांनी भाजप पक्षातल्या जुन्याजाणत्या सदस्यांपेक्षा नवीन लोकांना प्राधान्य देत असल्याचा आरोप केला. ते स्पष्टपणे एम. पृथ्वीराज यांचा संदर्भ देत होते. गेल्या वर्षी काँग्रेसमधून भाजपमध्ये आलेल्या एम. पृथ्वीराज यांना मोइरांगमधून तिकीट दिलं होतं. पृथ्वीराज यांचा गेल्या निवडणुकीत सरचंद्र यांच्याकडून ४०० पेक्षा कमी मतांनी पराभव झाला होता. माजी मंत्री बिरेन आणि जॉयकुमार यांनीही तिकीट न मिळाल्याने भाजपला सोडचिठ्ठी दिली. काँग्रेसचे निवडणूक प्रभारी भक्त चरणदास यांनी तिघांचंही पक्षात स्वागत केलं आणि आगामी निवडणुकीत पक्ष ६० पैकी ४० जागा जिंकेल, असा दावा केला.

भाजपचे आणखी दोन नेते थंजम अरुण कुमार आणि टी. वृंदा यांनी संयुक्त जनता दलात प्रवेश केला. मणिपूरमधील सत्ताधारी भाजपचा मुकाबला करण्यासाठी काँग्रेसने इतर पाच राजकीय पक्षांसोबत निवडणूकपूर्व युती केली आहे. अशी युती केली असली, तरी कितपत यशस्वी ठरते, हे दहा मार्चलाच कळेल; परंतु दोन्ही राष्ट्रीय पक्षांमध्ये सत्ता मिळवण्यासाठी मोठी चुरस आहे. भाजपपुढे सत्ता राखण्याचं तर काँग्रेसपुढे सत्ता खेचून आणण्याचं आव्हान आहे. मतदानपूर्व चाचण्यांमध्ये भाजपला कौल मिळताना दिसत असला तरी प्रत्यक्षात झालेल्या बंडाच्या घटना पाहता इथेही काहीही घडू शकतं, असं सांगितलं जातं. शिवाय दुखावले गेलेले दोन नागा पक्ष भाजपला धडा शिकवण्यासाठी प्रयत्न करण्याची शक्यता नाकारता येत नाही. दोन्ही राष्ट्रीय पक्षांना मिळणाऱ्या आणि प्रादेशिक पक्षांच्या वाट्याला जाणाऱ्या जागा पाहता इथे प्रादेशिक पक्ष किंगमेकर ठरण्याची शक्यता जास्त आहे.

एकंदरीत, या निवडणुकीमध्ये दोन्ही राज्यांत भाजपपुढे मोठं आव्हान असेल आणि वेगळे पक्ष किंगमेकरच्या भूमिकेत पुढे आल्यास या पक्षाचं राजकारण आणखी अवघड बनेल, अशी शक्यता राजकीय तज्ज्ञ बोलून दाखवत आहेत.

वार-वार
भारत राजणकर

## सेना आमदारांचे बंड

राज्यात महाविकास आघाडीचे सरकार सत्तारुढ आहे. शिवसेना प्रमुख पक्ष असल्याने मुख्यमंत्री पद या पक्षाच्या वाट्याला आले. तर राष्ट्रवादी काँग्रेस आणि राष्ट्रीय काँग्रेस हे या सरकारचे घटक पक्ष आहेत. मात्र तीन टोकाचे पक्ष एकत्र आले असल्याने त्यांची आघाडी कितपत टिकेल याबाबत साशंकता होती. मात्र आतापर्यंत अडीच वर्षे कुरबूरी करीत का होईना हे सरकार कायम आहे. रायगड जिल्ह्यात मात्र सुरुवातीपासूनच शिवसेना आणि राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष यांचे पटतच नव्हते. जिल्ह्यात तीन तीन आमदार असलेल्या सेनेच्या वाटेला एखाद दुसरे मंत्रीपद येईल अशी अपेक्षा होती. मात्र राष्ट्रवादी काँग्रेसच्या माध्यमातून सुनील तटकरे हे आपले राजकीय वजन वापरुन सेनेच्या अपेक्षा मोडीत काढून आपल्या सुकन्या अदिती तटकरे यांना एकदोन नाही तर सात राज्यमंत्री पद पदरात पाडून घेतली. त्यामुळे संतप्त झालेल्या तीनही आमदार आणि जिल्हाप्रमुखांनी बंडाचे हत्यार उपसत नाराजी व्यक्त केली. त्यावर पक्षश्रेष्ठींनी त्यांना समज देत तटकरे यांच्याशी जुळवून घेण्याचे आदेश दिले. मात्र तटकरे यांचे जिल्ह्यावरील वर्चस्व एवढयावरच थांबले नाही तर सर्वाधिक आमदार असून देखील एकमवे आमदार असणाऱ्या अदिती तटकरे यांच्यावर रायगडच्या पालकत्वाची जबाबदारी सोपविण्यात आली. यामुळे देखील सेना आमदारांचा पारा चढला. मात्र मातोश्रीने त्यांचे हे बंड थंड करीत शांत राहण्याच्या सुचना केल्या. पुन्हा एकदा पोस्को कंपनीच्या भंगारावरुन राष्ट्रवादी-सेनेत राडा झाला. शिवसेनेला दुय्यम वागणूक देणाऱ्या पालकमंत्र्याविरोधात आक्रमक पवित्रा घेणाऱ्या शिवसेना नेतृत्वाचे बंड मोडीत काढुन पालकमंत्र्यांना झुकते माप दिले गेले. त्यानंतर आता पुन्हा एकदा तीनही आमदारांनी केलेले बंड कितपत यशस्वी ठरेल हे येणारा काळच ठरवेल. आजवरच्या अनुभवावरुन हे बंड देखील शांतच होऊन जिल्ह्याचे पालकत्व पाच वर्षे तटकरे पुर्ण करतील की राष्ट्रवादीकडून सेनेची होणारी मुस्काटदाबी थांबविण्यासाठी पक्षश्रेष्ठी ताकद देते यासाठी प्रतिक्षा करावी लागेल एवढे मात्र नक्की!

## झेडपी गटांची फेररचना

जिल्हा परिषदेचे गट आणि पंचायत समितीचे गण यांच्या संख्येत वाढ करण्याचा राज्य सरकारने आदेश जारी केला आहे. अध्यादेशानुसार मतदारसंघांची फेररचना करण्यात आली आहे. रायगड जिल्हा परिषदेची सदस्य संख्या पूर्वी ६२ होती त्यानंतर ती कमी होवून ५९ झाली. आता पुन्हा ही सदस्य संख्या सातने वाढण्याची शक्यता आहे. जिल्हा परिषदेच्या गटांची संख्या ५५ पेक्षा कमी नाही, तर ८५ पेक्षा जास्त नसल्याचे स्पष्ट करण्यात आले आहे. त्यामुळे एकूण सदस्य संख्या ६६ होणार असून, ज्या पक्ष किंवा गटाकडे किमान ३४ इतकी सदस्य संख्या असेल त्यालाच सत्ता स्थापन करण्याची संधी मिळणार आहे. त्यामुळे आता सत्ता स्थापनेसाठी सर्व पक्षांची दमछाक होणार एवढे मात्र नक्की! जिल्हा परिषदेच्या गटांबरोबर पंचायत समितीच्या १४ गणांचीही भर पडणार आहे. जिल्हा परिषदेच्या एका गटामध्ये दोन पंचायत समिती गण समाविष्ट आहेत. उरण, पनवेल, खालापूर, पेण, अलिबाग, रोहा आणि माणगाव या सात तालुक्यांमध्ये प्रत्येकी एक जिल्हा परिषद मतदार संघ वाढणार आहे. त्याचबरोबर या तालुक्यांमध्ये पंचायत समितीचे दोन मतदार संघ वाढणार आहेत. नव्या गटरचनेचे आराखडे तयार करण्यासंदर्भात राज्य निवडणूक आयोगाकडून सूचना आल्यानंतर हा प्रारुप आराखडा तयार करण्यात आला आहे. जिल्हा परिषदेच्या विद्यमान सभागृहाची मुदत २१ मार्च रोजी संपणार आहे, त्या दरम्यान जिल्हा परिषदेच्या निवडणुका होणार आहेत. या निवडणुकांमध्ये नव्या मतदार संघांचाही समावेश असणार आहे. नवीन मतदारसंघ (गट आणि गण) निश्चित झाल्यानंतरच जिल्हा परिषद आणि पंचायत समितीच्या निवडणुका जाहीर होतील. कोरोनामुळे ही सर्व प्रक्रिया लांबणीवर पडली होती. परंतु आता ती वेगाने सुरू होईल. त्यामुळे या निवडणुका एप्रिल किंवा मे महिन्यात होण्याची शक्यता वर्तवली जात आहे. जिल्हा परिषद मिनी मंत्रालय म्हणून ओळखले जाते. या निवडणूकांच्या निकालावरुन जिल्ह्याचा संपूर्ण कल लक्षात येतो. त्यामुळे आतापासूनच सर्व पक्ष तयारीला सुरुवात करुन शिवतिर्थावर आपल्या पक्षाचा झेंडा फडकवण्यासाठी ताकद पणाला लावतील यात शंका नाही!



## भगवद्गीता

वर्णाश्रमसंस्थेमध्ये, जी चौथी अवस्था, संन्यासाश्रम आहे ती अत्यंत खडतर अवस्था आहे. पण जो आपले जीवन परिपूर्ण करण्याबद्दल प्रामाणिक आहे तो सर्व अडचणींना न जुमानता संन्यासाश्रम स्वीकारतो. कौटुंबिक नाते तोडल्यामुळे आणि पत्नी व मुलेबाळे यांच्या संपर्काचा त्याग करण्यामुळे साधारणपणे अडचणी उद्‌भवतात; परंतु जर कोणी अशा अडचणी सहन करण्यास समर्थ असेल तर निश्चितपणे आत्मसाक्षात्काराच्या मार्गात तो पूर्णत्व प्राप्त करतो. त्याचप्रमाणे जरी आपल्या कुटुंबियांशी किंवा प्रियजनांशी लढणे कठीण असले तरी अर्जुनाने आपल्या क्षत्रिय धर्माच्या कर्तव्यपालनात चिकाटीने प्रयत्न करणे आवश्यक आहे, असा त्याला उपदेश देण्यात आला आहे. श्री चैतन्य महाप्रभूंनी वयाच्या चोविसाव्या वर्षीच संन्यास ग्रहण केला आणि त्यांच्यावर अवलंबून असणारी त्यांची तरुण पत्नी आणि वृद्ध माता यांची देखभाल करण्यास कोणीच नव्हते. तरीसुद्धा उच्चतर हेतूप्रीत्यर्थ त्यांनी संन्यास घेतला व ते आपल्या श्रेष्ठ अशा कर्तव्यपालनात दृढ होते. भौतिक बंधनातून मुक्ती प्राप्त करण्याचा तोच एकमात्र मार्ग आहे.

नासतो विद्यते भावो नाभावो विद्यते सतः ।
उभयोरपि दृष्टोन्तस्त्वनयोस्तत्वदर्शिभिः ।।१६।।

न- कधीच नाही; असतः- जे असत् आहे ते; विद्यते-आहे; सतः- जे शाश्वत आहे त्याचा; उभयोः- दोहोंचा; अपि- खरोखरच; दृष्टः- पाहिलेला आहे; अन्तः- निर्णय; निष्कर्ष; तु- निःसंदेह; अनयोः- या दोन्हींचा; तत्व- सत्याचा; दर्शिभिः- साक्षात्कारी पुरुषांद्वारा

जे तत्वदर्शी पुरुष आहेत त्यांनी असा निष्कर्ष काढला आहे की, जे असत्- (भौतिक शरीर) आहे ते चिरकाल टिकू शकत नाही आणि जे सत् (जीवात्मा) आहे ते कधीच बदलत नाही. या दोन्हींच्या स्वरुपांचा अभ्यास करुन तत्वदर्शी पुरुषांनी असा निष्कर्ष काढला आहे.

तात्पर्य : परिवर्तनशील शरीर स्थायी नसते. आधुनिक विज्ञानाने मान्य केले आहे की, विविध प्रकारच्या पेशींच्या क्रिया व प्रतिक्रिया यामुळे क्षणोक्षणी शरीर बदलत असते आणि याप्रमाणे शरीरामध्ये वाढ होते आणि वृद्धत्व येते, पण शरीर आणि मनामध्ये जरी सर्व प्रकारचे बदल झाले तरी जीवात्मा नित्य स्थायी राहतो. पदार्थ आणि आत्मा यामध्ये हाच भेद आहे. स्वभावतः शरीर नेहमी बदलत असते आणि आत्मा शाश्वत असतो. निर्विशेषवादी आणि सविशेषवादी या दोन्ही तत्वदर्शी पुरुषांनी हा निर्णय प्रस्थापित केला आहे. विष्णुपुराणामध्ये सांगण्यात आले आहे की, विष्णू व त्यांचे धाम या सर्वांना स्वयंप्रकाशित आध्यात्मिक अस्तित्व आहे. (ज्योर्तीषि विष्णुर्भुवनानि विष्णुः) सत् व असत् हे शब्द केवळ आत्मा आणि पदार्थाला उद्देशून आहेत. सर्व तत्वदर्शी लोकांचे हेच प्रतिपादन आहे.

अज्ञानाने प्रभावित झालेल्या सर्व जीवांना जो उपदेश भगवंतांनी केला आहे त्याचा आरंभ येथपासूनच होतो. अज्ञान नाहीसे करणे म्हणजे पूजक व पूजनीय यांच्यातील शाश्वत संबंध प्रस्थापित करणे, तसेच अंशरुप जीव आणि पुरुषोत्तम श्रीभगवान यांच्यातील भेद जाणून घेणे होय. कोणताही मनुष्य प्रथम स्वतःला जाणून घेऊन भगवंतांचे स्वरुप जाणू शकतो. जीव आणि भगवंत यांच्यातील संबंध, अंश आणि अंशी किंवा अंश व पूर्ण यांच्यातील संबंधाप्रमाणे असतो. वेदांत सूत्रे तसेच श्रीमद्‌भागवतात, समस्त सृष्ट पदार्थांचे उत्पत्तीस्थान म्हणून भगवंतांचा स्वीकार करण्यात आला आहे. अशा सृष्ट पदार्थांची ओळख परा आणि अपरा किंवा श्रेष्ठ आणि कनिष्ठ अशा क्रमाने होते. सातव्या अध्यायात सांगितल्याप्रमाणे जीवात्मे परा प्रकृतीत येतात. जरी शक्ती आणि शक्तिमान यांच्यामध्ये भेद नसला तरी शक्तिमानाला भगवंत मानले जाते आणि शक्ती किंवा प्रकृतीला गौण मानले जाते. म्हणून ज्याप्रमाणे स्वामी आणि सेवक किंवा गुरु आणि शिष्य यांच्यामध्ये संबंध असतो त्याप्रमाणे जीव हे नेहमी भगवंतांच्या अधीनच असतात. अज्ञानाच्या प्रभावाखाली असे स्पष्ट ज्ञान जाणून घेणे अशक्य आहे. असे अज्ञान काढून टाकण्याकरीता आणि सर्व काळी सर्व जीवांना प्रबुद्ध करण्यासाठी भगवद्‌गीतेचा उपदेश दिला आहे.

**(क्रमशः)**

**(भगवद्‌गीता स्पर्धा माहिती पान क्रमांक ८ वर)**

## लोकसंसद

### उत्क्रांतीवादाचा जनक : चार्ल्स डार्विन

उत्क्रांतीवादाचा जनक असे ज्यांना समजले जाते त्या चार्ल्स रॉबर्ट डार्विन यांचा आज जन्मदिन. चार्ल्स डार्विन हे विख्यात जीवशास्त्रज्ञ होते. त्यांनी मांडलेल्या उत्क्रांतीवादाच्या सिद्धांतात जगातील जीवसृष्टीची उत्पत्ती व विकासाची कशी प्रगती होत गेली हे शास्त्रशुद्धरित्या उलगडून दाखवले. चार्ल्स डार्विन यांचा जन्म १२ फेब्रुवारी १८०९ रोजी इंग्लंडमधील श्रॉपशायर परगण्यात झाला. त्यांचे वडील रॉबर्ट डॉक्टर तर आजोबा इमर्सन शास्त्रज्ञ होते. शालेय जीवनात त्यांना रसायन शास्त्राची खूप आवड होती म्हणून आपल्या भावाच्या मदतीने त्यांनी आपल्या घराबाहेर एक छोटीशी प्रयोगशाळा उभारली होती तिथे ते तासनतास प्रयोग करीत बसत. ते असे एकाच जागेवर तासनतास प्रयोग करीत बसत असल्याने मित्र मंडळी त्यांची नेहमी टर उडवत पण ते त्याकडे कायम दुर्लक्ष करीत. त्यांना निसर्गाचीही खूप आवड होती. पुढे त्यांची डॉ ग्रांट यांच्याशी ओळख झाली. डॉ ग्रांट हे स्वतः प्रसिद्ध जीव शास्त्रज्ञ होते. १८२५ मध्ये डार्विन यांनी केंब्रिज विद्यापीठाच्या क्राईस्ट महाविद्यालयात नाव नोंदवून पदवी मिळवली. तिथे त्यांना कीटक व निसर्गातील जीव जिवाणूंच्या निरीक्षणाचा नाद लागला. १८२६ मध्ये कॅप्टन किंगने दक्षिण अमेरिका संशोधनाची मोहीम आखली त्यात ते सहभागी झाले. त्या मोहिमेवर ते पाच वर्ष होते. तिथे त्यांनी निरनिराळे पक्षी, प्राणी, कीटक, जीवजंतू एकमेकांशी कसे वागतात. ते एकमेकांशी आणि निसर्गाशी कसे जुळवून घेतात याचे निरीक्षण व अभ्यास केला व तेथे उत्क्रांतीवाद, सहजीवन, 'बळी तो कान पिळी' ही मूलभूत नैसर्गिक तत्वे ते शिकले. याच दरम्यान माणसाचा मूळ पुरुष, चार पायी माकडपासून झाला असला पाहिजे असा विचार त्यांच्या डोक्यात घुमू लागला. त्यांनी याचे खूप संशोधन केले. वेगवेगळे प्राणी कसे निर्माण झाले यासंदर्भातही त्यांनी खूप संशोधन केले. या संशोधनावर आधारित ओरिजन ऑफ स्पेसिस हा ग्रंथ त्यांनी लिहिला. या ग्रंथातच त्यांनी उत्क्रांतवादाचा सिद्धांत मांडला आहे. या ग्रंथाच्या १२५० प्रति एकाच दिवसात विकल्या गेल्या. या ग्रंथामुळे त्यांचे सर्वत्र त्यांचे नाव झाले. या ग्रंथात त्यांनी मांडलेला उत्क्रांतीवादाचा सिध्दांत बायबलच्या विरुद्ध जात होता म्हणून अनेकांनी या सिद्धांताला विरोध केला. हा सिद्धांत बायबलच्या विरुद्ध जातो म्हणून त्याचा निषेध करण्यासाठी १८६० मध्ये ऑक्सफर्डमध्ये विलबर फोर्स या बिशपने सभा बोलावली. डार्विन यांचा एकीकडे पुरोगामी विचारांचे लोक समर्थन करीत होते दुसरीकडे प्रतिगामी लोक विरोध करीत होते. पण या सर्व घडामोडींचा डार्विन यांच्यावर कोणताही परिणाम होत नव्हता त्यांचे संशोधन चालूच होते. बिशप डार्विनला कडाडून विरोध करीत असताना हक्सले डी हुकर हे शास्त्रज्ञ मात्र डार्विन यांची बाजू सडेतोड व सोदाहरण मांडत होते. त्यामुळे उत्क्रांतीवादाच्या सिद्धांताला कडाडून विरोध करणाऱ्या बिशपला अखेर माघार घेऊन डार्विनचा सिद्धांत मान्य करावाच लागला.

**- श्याम बसप्पा ठाणेदार,** पुणे

### एवढं काटेकोर असू नये?

नाट्यसंविधा, कलावंत आणि प्रेक्षक यांच्यातील एकमेकांच्या दाद, प्रतिसादाचा दुवा म्हणजेच नाटक होय. कलावंत आणि प्रेक्षक यांच्या प्रोत्साहनातून नाट्यकला अधिकाधिक खुलत जाते तेव्हा कलावंत मंडळींसह प्रेक्षकही एक आगळा वेगळा आनंद घेत असतात, एकरुप होते असतात अशा एखादेवेळी दहा पंधरा मिनिटांचा वेळ मागेपुढे होतो. कदाचित मात्र अशावेळी नाट्यगृहाच्या व्यवस्थापनाने काटेकोरपणे नियमांचे पडदे दाखवून प्रयोग बंद करायला सांगणे अथवा घाईघाईने प्रयोग संपवावयास लावणे उचित वाटत नाही. (नियम हवेत, अंमलबजावणी देखील हवी यात दुमत नाही पण प्रसंग पाहून अपवादही हवा) अशाने कलावंतांची आणि प्रेक्षकांचीही नाराजी मात्र स्वीकारावी लागते, क्षणात उत्साह, जोश, आनंद याचे विरजण होते. व्यवस्थापनाने सुद्धा समजून घेणे आवश्यक वाटते. रंगणाऱ्या, फुलणाऱ्या, खुलणाऱ्या, प्रेक्षकांसह कलावंतांनाही जिथे आनंद मिळतोय अशा सुरु असलेल्या नाट्यप्रयोगांनी काही मिनिटं अधिक वेळ घेतल्यास नाट्य व्यवस्थापनाने अगदीच काटेकोरपणे राहू नये असं मनापासून वाटतं.

**- विश्वनाथ पंडित,** चिपळूण

### मेटाकुटीस आलेले आहेत

नावात काय आहे? असे म्हणतात खरे परंतु, सर्वकाही नावात आहे याचं प्रत्यंतर मात्र मार्क झुकेरबर्ग याला आलं आहे. २०२१ च्या कंपनीच्या चौथ्या तिमाहीतील आकडेवारी सामोरी आली असून, फेसबुकचे नाव मेटा झाल्यानंतर फेसबुकने आपले पाचलाख यूझर्स (डेली ॲक्टिव्ह) गमावले व हे प्रथमच होत आहे. याआधी कधीही फेसबुकला उतरती कळा लागली नव्हती. पण, नावात काय आहे हा प्रश्न उपस्थित करणाऱ्यांसाठी हे उत्तम उदाहरण आहे.त्यात मेटा प्लॅटफॉर्मचे समभाग २६% टक्क्यांनी कोसळल्याने झुक्याभाऊंची संपत्ती तब्बल २९ अब्ज डॉलरने कमी झाली. याचं रुपयांत रूपांतरित केल्यास खूप मोठं नुकसान झाले आहे. एवढे मात्र नक्की. मार्क झुकेरबर्ग हे फेसबुकचे संस्थापक असले तरी, त्यांच्याकडे कंपनीच्या केवळ १२.८% हिस्सा आहे. २९ अब्ज डॉलर झालेल्या नुकसानीमुळे मार्क यांच्या फॉर्ब्स यादीतील नाव सुद्धा डळमळीत झालेले आहे. मार्क यांची संपत्ती घटून ८५ अब्ज डॉलर झाली आहे. इंस्टाग्राम व व्हाट्सएपच्या माध्यमातून लोकांचा वाढलेला संवाद मार्क यांच्या कंपनीच्या वाढीस मारक ठरलेला दिसत आहे. सध्यातरी फेसबुक नाव मेटा झाल्यापासून मेटाकुटीस आलेले दिसत आहे.

**- दत्तप्रसाद शिरोडकर,** मुलुंड

# माथेरान पालिकेचे आकाशगंगा निरीक्षण केंद्र बंद



**। नेरळ । वार्ताहर ।**
माथेरान गिरिस्थान नगरपरिषदेचे आकाशगंगा हा अवकाश निरीक्षण प्रकल्प आहे. कोटीच्या घरात खर्च करून उभारलेला हा प्रकल्प गेली अनेक महिने बंद आहे.

माथेरान मध्ये काही हौशी खगोलप्रेमी या केंद्रावर येऊन अवकाश दर्शन करायचे. दरम्यान, पालिकेच्या या प्रकल्पबाबत असलेल्या उदासीनतेबद्दल नाराजी व्यक्त होत आहे.

आकाशगंगा निरीक्षण केंद्रात आल्यानंतर पर्यटकांना सुरुवातीला अवकाश ग्रह आणि ताऱ्यांविषयी माहिती दिली जाते. तदनंतर ३५ आसनी असलेल्या ३ डी थिएटरमध्ये तारे ग्रह विषयक अर्ध्या तासाचा लघुपट दाखविला जातो आणि सायंकाळी ७:३० नंतर अत्याधुनिक दुर्बिणीतून आकाश भ्रमंती केली जाते. हा प्रकल्प मुंबईच्या युनायटेड सेल्स कॉर्पोरेशन या कंपनीला दिला गेला आहे. याची देखभाल या कंपनीची आहे.

शैलेश संसारे, संचालक आकाशगंगा प्रकल्प यांनी आकाशगंगा प्रकल्प युनायटेड सेल्स कॉर्पोरेशनला दिला आहे. या कंपनीच्या माध्यमातून अद्ययावत सामुग्री बसविली आहे. त्याचवेळी स्थानिक सात सुशिक्षितांना प्रसिद्ध पंचागकर्ते दा. कृ. सोमण यांच्या मार्गदर्शनाखाली ट्रेनिंग देऊन रोजगार उपलब्ध करून दिला आहे.

पे मास्टर पार्क येथे आकाशगंगा केंद्रातीलअनेक मशिनरी ही वास्तू अनेक महिने बंद असल्याने खराब झाले आहेत. पर्यटकांचे आकर्षण असलेली हे आकाशगंगा पुन्हा सुरू व्हावे अशी मागणी करीत आहेत. त्यात सर्वात आधुनिक अशी दुर्बीण मुंबई येथून संगणक तंत्रज्ञान वापरून नियंत्रित केली जाते.त्याचवेळी माथेरानमध्ये सर्वात उंच ठिकाणी हे आकाशगंगा अवकाश केंद्र असल्याने कोणत्याही वेळी येथून ग्रह-तारे यांचे निरीक्षण करता येते.

मात्र अनेक महिने बंद असलेल्या या दुर्बिणीबरोबर सर्व मशिनरी नादुरुस्त झाले आहेत तर तेथील मुख्य दुर्बिण वरील डोम मागील चक्रीवादळात उडून गेला आहे, तो डोम देखील अद्याप दुरुस्त करण्यात आलेला नाही. तर इमारतीचे नळजोडणी कनेक्शन बंद पडले आहे. त्यामुळे तेथील शौचालय हे दुर्गंधीमध्ये सापडले आहे. तर कोटींच्या आसपास खर्च झाले असलेल्या या अवकाश केंद्राची दुरुस्ती करण्याची मागणी माथेरानकर करू लागले आहेत.

# वाघ्रण घरगुती पाणी पुरवठा योजनेच्या कामाचा शुभारंभ



**। वाघ्रण । वार्ताहर ।**
अलिबाग तालुक्यातील वाघ्रण येथे शासनाच्या जलजीवन मिशन पाणी पुरवठा योजनेतंर्गत घरगुती नळ पाणी पुरवठा योजनेचा शुभारंभ १० फेब्रुवारी रोजी मान्यवरांच्या उपस्थित करण्यात आला. त्या ग्रामस्थांनी शेकाप आ. जयंत पाटील, माजी आ. पंडित पाटील, जिल्हा परिषद प्रतोद अ‍ॅड. आस्वाद पाटील, यांच्या प्रयत्नांना धन्यवाद दिले.

यावेळी सरपंच डॉ. प्रेरणा पाटील, ग्रामपंचायत सदस्य दिपक पाटील, रुपेश पाटील, मीना म्हात्रे, गीता पाटील, बाळकृष्ण पाटील, संजय पाटील, विवेक पाटील, माजी उपसरपंच उदय पाटील, अविनाश म्हात्रे, गजानन पाटील, दयानंद म्हात्रे, जयंवत पाटील,भूषण धोदरे, क्षितीज पाटील, मनिषा म्हात्रे, नथुराम पाटील, नरेश पाटील, अनुसया पाटील, सर्वेश ठाकूर व ग्रामस्थ उपस्थित होते.

## वाचकांसाठी निवेदन

कृषीवल वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींची शहानिशा करूनच वाचकांनी संबंधितांशी व्यवहार करावेत. वर्तमानपत्रातून प्रसिद्ध जाहिरातीतील उत्पादने, सेवा किंवा त्यासंदर्भातील दावे यांची नागेश पब्लिशर्स प्रा. लि. कोणतीही हमी घेत नाही. त्या मजकुराच्या अथवा दाव्याच्या पूर्ततेसंदर्भातील कोणतीही जबाबदारी नागेश पब्लिशर्स प्रा.लि.चे मुद्रक, प्रकाशक, संपादक किंवा मालक यांच्यावर राहणार नाही, याची कृपया वाचकांनी नोंद घ्यावी.

**- मुख्य संपादक**

# खेमसिंग चव्हाण यांचे निधन

**। सुतारवाडी । वार्ताहर ।**
रायगड जिल्हा प्राथमिक आदर्शशाळा येरळचे मुख्याध्यापक खेमसिंग चव्हाण यांचे वयाच्या ५१ व्या वर्षी आकस्मिक निधन झाले.चव्हाण यांचे शिक्षण बी.ए. बी.एड. होते. ते २० जून १९९५ ला सेवेत रुजू झाले. गौळवाडी, पहुर या प्राथमिक शाळेत यशस्वी सेवा केल्यानंतर सन २०१० पासून येरळ (ता. रोहा) या प्राथमिक शाळेत त्यांचा सेवाकाळ सुरु झाला. त्यांनी गौळवाडी पहुर या शाळेप्रमाणे येरळ प्राथमिक शाळा बोलकी केली. त्यांच्या मागे आई, वडील, पत्नी, एक मुलगा, मुलगी भाऊ असा परिवार आहे.



(छायाचित्र : महेश पवार)

# नागोठणे आयटीआय विद्यार्थ्यांचे लसीकरण

**। नागोठणे । वार्ताहर ।**
नागोठण्यातील शासनमान्य औद्योगिक प्रशिक्षण संस्थेतील विद्यार्थ्यांचेही कोव्हिड प्रतिबंधक लसीकरण राष्ट्रीय सेवायोजन विभागातर्फे हा कार्यक्रम राबविण्यात आला.

२५० जणांना पहिला डोस तर ६० विद्यार्थ्यांना दुसरा डोसही नुकताच देण्यात आला. नागोठणे प्राथमिक आरोग्य केंद्राच्या सहकार्याने राबविण्यात आलेल्या या लसीकरण मोहिमेच्या वेळी प्राचार्या प्रतिभा चव्हाण, गटनिर्देशक संजय हजारे, निदेशक एन.डब्ल्यु.पाटील, सुर्यकांत बारगोडे, आर.बी.नखाते, पि.पि. पाटील, संग्राम नरळे, साईनाथ वाव्हल, शिंदे सर आदि शिक्षक वृंद उपस्थित होते. आरोग्य सहाय्यक वंदन तांबोळी व इतर कर्मचाऱ्यांनी सहकार्य केले.

# सार्वजनिक बांधकाम विभागाच्या इमारती होणार इतिहासजमा?



**। माथेरान । वार्ताहर ।**
माथेरानमध्ये विविध खात्यांचे बंगले, वास्तू अनेक वर्षांपासून येणाऱ्या अधिकारी वर्गासाठी उपलब्ध आहेत. सार्वजनिक बांधकाम विभागाचे तीन जागी बंगले आहेत. निसर्गाच्या सान्निध्यात गर्द वनराईत इंस्पेक्षण बंगला, माऊंट बंगला आणि एक हॉटेल बाईकसमोर बंगला आहे. जुन्या काळातील बांधकाम केलेल्या या हेरिटेज वास्तू खूपच आकर्षक होत्या; परंतु त्याकडे या खात्याचे दुर्लक्ष होत असल्याने त्या डबघाईला आलेल्या असून, काही वर्षांतच त्या इतिहासजमा होतील, अशी शंका व्यक्त केली जात आहे.

मागील काही वर्षांपूर्वी यातील काही बंगल्यांची डागडुजी करण्यात आली होती. त्यानंतर इकडे कुणीही लक्ष केंद्रित केले नाही. केवळ ठेकेदारांना काम देण्यासाठीच की काय किरकोळ मलमपट्टी करण्यात आली होती.

या वास्तू सुरू केल्यास संबंधित अधिकारी वर्गाला तसेच त्या खात्यातील कर्मचारी यांना काही दिवस मुक्कामी राहता येऊ शकते. परंतु, या खात्याची याबाबतीत काहीएक मानसिकता दिसत नसल्याने या सर्व वास्तू लवकरच डबघाईला येऊन निश्चितपणे इतिहासजमा होण्याच्या मार्गावर आहेत.

## जाहीर नोटीस

तमाम जनतेस या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की, आमचे अषिलांनी मौजे वाली, ता. रोहा, जि. रायगड येथील खालील वर्णनाची मिळकत, त्या मिळकतीचे विद्यमान मालक श्री. नितिन यशवंत पिंपळे यांचेकडून कायम मालकी हक्काने विकत घेण्याचे ठरविले आहे.

**मिळकतींचे वर्णन**

| मौजे | गट नं. | क्षेत्र (हे. आर) | आकार (रु. पै.) |
|---|---|---|---|
| वाली | १०८८ | ०-४६-६० | ७.४० |
| | | ०-९७-०० | |
| | | १-४३-६० | |
| | | पो. ख. ०-१५-५० | |
| | | ०-५९-१० | |

सदरची मिळकत ही त्यांचे निर्वेध मालकी हक्कांची व प्रत्यक्ष ताबेकब्जा वहिवाटीतील असून ती विकणेचा त्यांस हक्क अधिकार असल्याबाबतचा निर्वाळा विद्यमान मालकांनी आमच्या अशिलांस दिलेला आहे. मात्र तरी देखील वर वर्णन केलेल्या मिळकतीवर अथवा तिचे कोणत्याही भागावर कुणाचाही विक्री, गहाण, दान, भाडेपट्टा, विक्रीचा करार, वारसाहक्क, लिज, लिएन, चार्ज, पोटगी, ताबा, वहिवाट, इजमेंटरी हक्क, रस्त्याच्या वहिवाटीचा निरंतर हक्क या अथवा अन्य कोणत्याही प्रकारचा हक्क-हितसंबंध असल्यास अथवा अन्य कोणत्याही तऱ्हेने सदर मिळकतीचे विक्री व्यवहारास हरकत असल्यास, त्यांनी त्यांच्या हरकती अगर तक्रारी ही नोटीस प्रसिध्द झाल्यापासून १४ दिवसांचे आत खाली दिलेल्या आमचे पत्त्यावर कागदोपत्री पुराव्यांसहित लेखी स्वरूपात आणून द्याव्यात. मुदतीत कुणाचीही, कोणत्याही प्रकारची तक्रार अथवा हरकत न आल्यास सदरची मिळकत ही विद्यमान मालकांच्या निर्वेध व निजोखमी मालकी हक्कांची आहे व तिचेवर अन्य कुणाचाही कोणत्याही प्रकारचा हक्क हितसंबंध नाही अथवा तसा हक्क असूनही तो त्यांनी विद्यमान मालकांच्या तसेच आमच्या अशिलांच्या लाभांत सोडून दिला आहे, असे गृहित धरून आमचे अशिल व्यवहार पूर्ण करतील व मागाहून मुदतीनंतर आलेली कुणाचीही तक्रार अगर हरकत विचारात घेतली जाणार नाही, हे सर्वांस कळावे.

अलिबाग
तारीख : १२/२/२०२२

सही/-
**अ‍ॅड. गणेश गोविंद पाटील.**
अे/१,२, तळमजला,
'श्रुतीसारंग'को. ऑप. हा. सोसायटी,
युनियन बँकेसमोर, ब्राह्मणआळी,
अलिबाग, रायगड, ४०२ २०१.

# लता मंगेशकर यांना श्रद्धांजली

**। चिरनेर । वार्ताहर ।**
उरण तालुक्यातील मोरा येथील ग्राइंडवेल नॉर्टन लिमिटेडमध्ये भारतरत्न लता मंगेशकर यांना ७ फेब्रुवारी रोजी ग्राइंडवेल नॉर्टनचे ऑपरेशन बॉन्डेड अ‍ॅण्ड थीन व्हीलचे हेड कमलजीत सिंह व सिनिअर मॅनेजर अ‍ॅडमिनीस्टेशन आय.बी. सिंह यांच्या मार्गदर्शनाखाली श्रद्धांजली अर्पण करण्यात आली. याप्रसंगी कंपनीतर्फे व्यवस्थापन कर्मचारी, कामगार, कंत्राटी कामगार उपस्थित होते.

# दिनेश पवार त्यांचा सत्कार

**। चिरनेर । वार्ताहर ।**
दिनेश पवार हे मोरा येथील ग्राइंड वेल नॉर्टन लिमिटेड कंपनीतून ३१ वर्ष प्रदीर्घ सेवेतून दिनांक १९ जानेवारी रोजी सेवा निवृत्त झाले. तसेच २००३ साली महाराष्ट्राचे राज्यपाल एस एम कृष्णा यांच्या हस्ते महाराष्ट्र शासनाचा गुणवंत कामगार पुरस्कार देऊन गौरविण्यात आले होते. सत्कारप्रसंगी हिंदू लोहार समाज संघ त्याचबरोबर मुंबई महाराष्ट्र अध्यक्ष अण्णासाहेब जोशी, मनोहर मनेर, राहुल कोशे, कृष्णा व्यापारी, जगन्नाथ जोशी, आदी उपस्थित होते.

## ऐश्वर्य ज्वेल कलेक्शन

१ ग्रॅम सोन्याचे प्लेटींग
दागिने-नविन डिझाइन्स



मोत्याचे दागिने- तन्मणी, चींचपेटी, बांगड्या, बाजुबंद. गॅरंटीचे दागिने- मंगळसूत्र, बांगड्या, पाटल्या, हार, माळ. डायमंड- कुंदन- पोलकी-सेट- मॅचिंग बांगड्या- कानातले. सर्व नामांकित कंपन्यांची कॉस्मेटीक्स, परफ्यूम, डीओ. वाजवी भाव आणि भरपूर व्हरायटीसाठी प्रसिद्ध दुकान.

**२/१२ पी.एन.पी. नगर, अलिबाग.**
**मोबाईल : ९८६०६५८५६५**

**MAHATRANSCO** Maharashtra State Electricity Transmission Co. Ltd.

**Tender Extension Notice**

MSETCL invites online bids (E-Tender) from registered contractors / agencies on Mahatransco E-Tendering website **https://srmetender.mahatransco.in** for following work.

**Tender No.: EE/400kV/RS(O&M)/DN/KHR/ Ten-1/2022-23 (RFX No. 7000022118)**
**Period for submission of E-Bid: 11.02.2022 to 18.02.2022 up to 23:59 hrs**

**Name of Work : Providing services Housekeeping and Garden Maintenance at 400kV R.S. (O&M) Dn., Kharghar**

| Estimated Cost | EMD (Rs) | Tender Fee (Rs) | Closing Date | Technical Opening Date | Commercial Opening Date |
|---|---|---|---|---|---|
| Rs. **4,83,609.12** (Including GST) | Rs. 5,000/- | Rs.525/- (Including GST) | **18.02.2022** up to 23:59 hrs | **21.02.2022** at 10:00 hrs (If possible) | **21.02.2022** at 10:15 hrs (If possible) |

**Contact Persons:**
1) Mr. S.J.Darekar, Executive Engineer, 400kV RS O&M Dn., Kharghar, 9619892040
2) Ms. P.C. Deshpande, Dy.EE (O), 400kV RS O&M Dn., Kharghar, 9819313988
For further details visit our website **www.mahatransco.in**

1] Tender document can be downloaded by only online from aforesaid website.
2] Eligible contractor should submit their Bid well in advance instead of waiting till last date.

**MSETCL will not be responsible for non-submission of Bid due to any website related problems.**

**Note :- All eligible interested contractors are mandated to get enrolled on SRM E-Tendering portal (New) - https://srmetender.mahatransco.in.**

**Sd/-**
**Executive Engineer,**
**400kV R.S. (O&M) Dn., Kharghar**

## जाहीर नोटीस

सर्व जनतेस कळविण्यात येते की, आमच्या अशिलांनी मौजे चेंढरे, ता. अलिबाग जि. रायगड येथील खालील वर्णन केलेली बिनशेती मिळकत मिळकतीचे विद्यमान मालक करुणा महेंद्र जैन व श्री. महेंद्र भवरलाल जैन रा. रेवदंडा, ता.अलिबाग, जि.रायगड यांच्याकडून विकत घेण्याचे ठरविले आहे. सदरची मिळकत निर्वेध व बोजाविरहित असल्याचा भरवसा आमचे अशिलांस विद्यमान मालकांनी दिलेला आहे.

**मिळकतीचे वर्णन**
**मौजे चेंढरे, ता. अलिबाग, जि. रायगड**

| सर्व्हे/नंबर | एकूण क्षेत्र आर.चौ.मी. | आकार रु.पैसे |
|---|---|---|
| ३६/१/२/२५ | २-६८-०० | २६.८० |

तरी वरील मिळकतीचे संदर्भात कोणाचाही गहाण, दान, बक्षिस, लीज, फरोक्त, साठेकरार, कोर्टात दावा, मृत्यूपत्र, वारसा हक्क, वहिवाटीचे जाण्यायेण्याचा मार्ग आदी कोणत्याही प्रकारे हक्क व हितसंबंध असल्यास त्यांनी त्यांची हरकत योग्य त्या कागदोपत्री पुराव्यानिशी ही नोटीस प्रसिध्द झालेपासून १५ दिवसांच्या मुदतीत खालील सही करणार खरेदीदारांतर्फे अ‍ॅडव्होकेट यांजकडे लेखी कळवावी. येणेप्रमाणे विहित मुदतीत कोणाचीही कसल्याही प्रकारची हरकत न आल्यास सदर मिळकत निर्वेध व बिनजोखमी आहे असे समजून आमचे अशिल सदर मिळकतीचा खरेदी व्यवहार पूर्ण करतील व मागाहून येणारी कोणतीही हरकत आमचे अशिलांवर बंधनकारक रहाणार नाही याची नोंद घ्यावी.

**अलिबाग,**
दि. .०२.२०२२

**अ‍ॅड. मच्छिंद्र एस. म्हात्रे**
बी/७, सोमेश्वर वैभव बिल्डींग,
ब्राम्हण आळी, अलिबाग.
मो.नं. ९२७२१७०००९

नोंदणीकृत कार्यालय: जेएसडब्ल्यू सेंटर, बांद्रा-कुर्ला कॉम्प्लेक्स, बांद्रा (पूर्व), मुंबई- 400 051.वेबसाईट: www.jsw.in

## सर्व संबंधितांना सावधगिरीची सूचना

आम्ही सर्व संबंधितांच्या हे निदर्शनास आणून देऊ इच्छितो की जेएसडब्ल्यू समुहाच्या कंपन्यांकडून गुणवत्तेवर आधारित कर्मचारी नियुक्ती प्रक्रिया राबवली जात आहे. आम्ही निवड प्रक्रियेदरम्यान किंवा मुलाखतीसाठी उमेदवारांना आमंत्रित करतेवेळी नोकरी इच्छुकांकडून कोणतीही रक्कम अथवा अनामत रक्कम आकारत /स्वीकारत नाही.

आमच्या निदर्शनास असे आले आहे की जेएसडब्ल्यू स्टील लिमिटेड, जेएसडब्ल्यू कोटेड प्रॉडक्ट्स लिमिटेड, जेएसडब्ल्यू एनर्जी लिमिटेड, जेएसडब्ल्यू सिमेंट लिमिटेड आणि अन्य जेएसडब्ल्यू समूह कंपन्यांच्या नावाने तसेच नकली संस्थांच्या नावाने काही अनधिकृत व्यक्ती /अज्ञात तोतयांकडून खोटे आणि बनावट रोजगार संबंधीचे प्रस्ताव आणि आश्वासने फसवणुकीसाठी पसरवली जात आहेत. हे फसवणूक करणारे लोक जेएसडब्ल्यू कंपन्यांच्या नावाचा वापर करुन नोकरीसाठी अर्ज मागवतात आणि खोटे इमेल्स पाठवून किंवा नकली फोन कॉल्स करुन नोकरी इच्छुकांनी /अर्जदारांनी प्रोसेसिंग फी किंवा अनामत रक्कम भरावी अशी मागणी करतात. हे इमेल्स अस्सल वाटावेत यासाठी त्यामध्ये जेएसडब्ल्यूचे (किंवा सारख्या दिसणाऱ्या फसव्या नावाचे) इमेल आयडी किंवा डोमेन नेम असू शकेल.

कृपया नोंद घ्यावी की जर नोकरीच्या संधीसाठी किंवा मुलाखतीच्या आमंत्रणासाठी पैसे/अनामत रक्कम/सुरक्षा ठेव इत्यादींच्या मागणीसाठी जर कोणी तुमच्याशी अनाहूत किंवा बनावट संपर्क साधला, तर अशा इमेल्स किंवा कॉल्सना प्रतिसाद देऊ नका किंवा त्यानुसार काही कार्यवाही करु नका आणि तो एक बनावट घोटाळा/सापळा आहे असे समजण्यात यावे. आम्ही प्राथमिक मुलाखतीकरीता बँक खाते क्रमांक, वैयक्तिक तपशील इत्यादी प्रकारची कोणतीही खासगी किंवा वैयक्तिक माहिती विचारत नाही.

कोणत्याही फसव्या संपर्कातून झालेल्या चुकीच्या प्रतिनिधित्वाबाबत किंवा त्याच्या परिणामांबाबत जेएसडब्ल्यू कोणतीही जबाबदारी स्वीकारणार नाही आणि अशा प्रकारचा फसवणूक करणारा संपर्क/प्रस्ताव हा कोणत्याही जेएसडब्ल्यू समूह कंपन्यांकडून/प्रतिनिधींकडुन आलेला कोणताही प्रस्ताव किंवा प्रतिनिधित्व आहे असे मानण्यात येऊ नये.

जर अशा प्रकारचा फसवणुकीचा प्रसंग आपल्या बाबतीत घडला असेल किंवा जेएसडब्ल्यू (आणि त्यांच्या सहयोगी/समूह कंपनी) मध्ये नियुक्ती किंवा रोजगारासाठी विनंतीबाबत आपणास काही माहिती असल्यास त्यांवर योग्य ती कायदेशीर कारवाई करण्यासाठी कृपया आम्हाला सहाय्य करावे जेणेकरुन अशा खोटया प्रवृत्तींना आळा घालता येईल.

**प्रमुख – मानव संसाधन**
**जेएसडब्ल्यू स्टील लिमिटेड – डोलवी**

*नोकरी इच्छुकांना असा सल्ला देण्यात येत आहे की विविध जेएसडब्ल्यू ग्रुप कंपन्यांमधील नोकरीच्या संधी पडताळून पाहण्यासाठी आमच्या वर नमूद केलेल्या वेबसाईटवर लॉगीन करून करिअर विभागाला भेट द्या.*

## जाहीर नोटीस

सदरील नोटीशीद्वारे सर्वांना सूचीत करण्यात येते की, माझ्या अशिलांनी खालील परिशिष्टामध्ये नमूद केलेली जमीन मिळकत संदर्भित जमीनमिळकतीचे विद्यमान मालक १) श्री. सुरेंद्र हरिश्चंद्र पडते, २) श्री. सिद्धांत सुरेंद्र पडते, ३) श्री.शेखर हरिश्चंद्र पडते व ४) श्री.शुभम शेखर पडते यांच्याकडून कायमस्वरूपी व कायदेशीरपणे विकत घेण्याचे ठरविलेले आहे व तशी प्राथमिक बोलणी माझे अशिल व विद्यमान मालक यांचे दरम्यान पूर्ण झालेली आहेत. संदर्भित जमीन मिळकत ही पूर्णपणे बिनजोखमी, बोजाविरहीत व निर्वेध तसेच कोणत्याही प्रकारे अबाधित असल्याचा निर्वाळा विद्यमान मालकांनी माझ्या अशिलांना दिलेला आहे. असे असूनदेखील संदर्भित जमीनमिळकतीमध्ये जर कोणत्याही व्यक्तीचे/व्यक्तींचे खरेदीखत, करार, भाडेपट्टा, बक्षिस, गहाणखत इत्यादीद्वारे व इतर कसल्याही कराराद्वारे वा दस्ताद्वारे प्राप्त होणारे कायदेशीर हक्क/अधिकार वा हितसबंध असतील तर अशा व्यक्तीने/व्यक्तींनी त्या आशयाची लेखी हरकत आवश्यक त्या कागदोपत्री पुराव्यासह सदरची नोटीस प्रसिद्ध झाल्या दिनांकापासून १५ दिवसांचे आत माझ्या खालील नमूद पत्त्यावर पाठवून द्यावी. विहीत मुदतीनंतर आलेली कसलीही हरकत/हरकती विचारात घेतल्या जाणार नाहीत व माझे अशिल संदर्भित जमीन मिळकतीचा व्यवहार अंतिमतः पूर्ण करतील याची कृपया नोंद घ्यावी.

**:-संदर्भित जमीन मिळकतीचे परिशिष्टः-**

| मौजे | गट नं. | हिस्सा नं. | क्षेत्र (हे.आर.) | आकार (रु.पै.) |
|---|---|---|---|---|
| धोकवडे ता. अलिबाग जि.रायगड | ९२५ | २ | ०-२०-५० | २.९५ |

**अलिबाग**
दिनांकः१२/०२/२०२२

**राजेंद्र दा.पाटील**
ॲडव्होकेट
कृष्णवंदन-२, ब्राम्हणआळी
कन्याशाळेसमोर,अलिबाग,ता.अलिबाग जि.रायगड

## जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, आमचे अशील १) श्री. चंदन राजन मंत्री, रा. एफ-५, गुरु प्रसाद को-ऑप. हौसिंग सोसायटी, हेडगेवार मैदानाच्या बाजूला, हनुमान रोड, विले पार्ले (पूर्व), मुंबई ४०००५७ २) श्री. केदार मनोहर सोहोनी, रा. ए-१०३, महिन्द्रा एमिनन्ट, एस.व्ही. रोड, गोरेगाव (पश्चिम), मुंबई ४०००६२ यांनी खालील वर्णनाची शेतजमीन मिळकत त्यांचे मालकांकडून कायमची खरेदी करण्याचे ठरविलेले आहे

**मिळकतीचे वर्णन**
मौजे-धामणी, तलाठी सजा कोठींबे, ता कर्जत, जि.रायगड
येथील रायगड येथील शेतजमीन जमीन मिळकत

| मालकाचे नाव | सर्व्हे नंबर | हिस्सा नंबर | क्षेत्र हे.आर.पॉ | आकार रुपये-पैसे |
|---|---|---|---|---|
| श्री. गजानन अनंत सांगळे | १६६ | ९ | ०-९७-०० | ०.७५ |

वरील वर्णनाच्या शेतजमीन मिळकतीशी कोणत्याही इसमाचा अगर संस्थेचा कोणत्याही प्रकारचा हक्क हितससंबंध असल्यास, आणि किंवा त्यांची आमचे अशीलांच्या खरेदीच्या व्यवहारास हरकत असल्यास, त्यांनी तसे आम्हास ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १४ दिवसांत लेखी पुराव्यासह कळवावे. वरील मुदतीत कोणीही हरकत न घेतल्यास, वरील मिळकतीशी कोणत्याही इसमाचा अगर संस्थेचा कसल्याही प्रकारचा हक्क हितसंबंध नाही, किंवा असल्यास, तो हक्क हितसबंध त्यांनी आमचे अशिलांच्या लाभात सोडून दिलेला असून, त्यांची आमचे अशिलांच्या खरेदीच्या व्यवहारास कोणतीही हरकत नाही, असे समजण्यात येऊन आमचे अशिल खरेदीचा व्यवहार पूर्ण करतील. मागाहून कोणतीही तक्रार विचारात घेतली जाणार नाही.

येणेप्रमाणे जाहीर नोटीस आहे
दिनांक : १२ फेब्रुवारी २०२२

**दीपक राजाराम गायकवाड**
बी.ए.एलएल.बी
अधिवक्ता
एन्रोलमेंट क्रमांक (११९८/१९९३)
१०२, पहिला मजला, जय नारायण कॉम्लेक्स,
अंबिका नाका मु.पो. नेरळ, ता. कर्जत,
जि. रायगड- ४१० १०१
९४२२४९३८८४/८३०८८४३८८४

## जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यांत येते की मौजे वैजनाथ, ता.कर्जत,जि.रायगड येथील हक्कनोंदीस वर्णन असलेली जमीन मिळकत आमचे अशिलांनी सदर मिळकतीचे विद्यमान मालक सुरेश बाळकृष्ण गुरव वै ५ यांचेकडून विकत घेण्याचे ठरविले. सदर जमिन मिळकतीचे वर्णन खालीलप्रमाणेः-

**मौजे वैजनाथ, ता.कर्जत, जि.रायगड येथील जमिन मिळकत**

| सर्व्हे नं. | हिस्सा नं. | क्षेत्र (हे.आर.पॉ.) | आकार (रु.पै.) |
|---|---|---|---|
| ८२ | २ | ०-४८-६० | ५-०० |

तरी सदर मिळकतीमध्ये इतर कोणाचा कोणत्याही प्रकार हक्कहितसंबंध असल्यास व सदर व्यवहारास कोणाचीही हरकत असल्यास सदर व्यक्तीने आपली लेखी हरकत पुराव्यानिशी खालील सही करणार यांचेकडे ही नोटीस प्रसिद्ध झालेपासून १५ (पंधरा) दिवसांत नोंदवावी. सदर मुदतीत कोणाचीही हरकत न आल्यास सदरचा व्यवहार पूर्ण केला जाईल व त्यानंतर येणारी कोणतीही हरकत आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाही याची नोंद घ्यावी.

कर्जत
ता.१२/०२/२०२२ खरेदीदारातर्फे ॲडव्होकेट
**किशोर तुकाराम देशमुख**
प्रेरणा निवास, नाना मास्तर नगर,
मुद्रे खुर्द, ता. कर्जत, जि. रायगड ४१०२०१
मो.९४२२०६८७५५

# कलासक्त

## आठवण
शरद कोरडे

# एक देखणा जिद्दी कर्तबगार अभिनेता





***मराठी व हिंदी चित्रपटसृष्टीत आपल्या अभिनय कारकिर्दीची सुमारे सात दशके पूर्ण करणारा एकमेव मराठी अभिनेता रमेश देव आहे. ज्याने आजपर्यंत २८५ हिंदी चित्रपट, १९० मराठी चित्रपट व ३० मराठी नाटकांतून कामे केलेली आहेत. आपल्या अभिनयाच्या कर्तृत्वाच्या व मेहनतीच्या बळावर त्यांनी तब्बल ६७ वर्षे मराठी व हिंदी चित्रपटसृष्टीवर अतिराज्य गाजवले. सात चित्रपटांची निर्मिती केली. २ फेब्रुवारी २०२२ रोजी त्यांनी जगाचा निरोप घेतला.***

रमेश देव यांचे कुटूंब कोल्हापूरात रहात असले तरी त्यांचा जन्म अमरावती येथे आईच्या माहेरी झाला. रमेश देव यांचे वडील कोल्हापूरात छत्रपती शाहू महाराजांचे कायदेशीर सल्लागार व वकील म्हणून काम करीत होते. त्यांचे मूळ गाव राजस्थानमधील जोधपूर. जोधपूर पॅलेस बांधण्याचे काम त्यांचे आजोबा व पूर्वजांनी केले. छत्रपती शाहू महाराजांनी त्यांचे बांधकामातील कौशल्य पाहून त्यांना कोल्हापूरात सन्मानाने बोलावले. कोल्हापूर येथे महाल व इमारती बांधण्याचे काम त्यांनी त्यांच्याकडे असल्याने शाहू महाराजांनी त्यांना कायदेशीर सल्लागार म्हणून नेमून घेतले. त्यानंतर देव हे कुटूंब कोल्हापूर येथेच स्थायिक झाले. एक वेळ शाहू महाराज यांचे कोर्टात अडकलेले काम देवांनी आपल्या चातुर्याने तडीस नेले. त्यावेळेपर्यंत ते आपले आडनाव सोनीवाल ठाकूर म्हणून लावीत होते. शाहू महाराज म्हणाले 'तुम्ही ठाकूर कसले, तुम्ही तर साक्षात देवच आहात.' महाराजांच्या या बोलण्यानंतर ठाकूर यांना देव म्हणून संबोधण्यात आले व तेच नाव त्यांनी धारण केले.

त्याच काळात कोल्हापूर 'कलानगरी' म्हणून प्रसिद्ध होती. या शहरात चित्रपट निर्मिती करणारे दोन स्टुडिओ होते. शिवाय निरनिराळ्या नाटक कंपन्यांचा मुक्काम कायम कोल्हापूरात असायचा. रमेश देव एकवेळ स्टुडिओ पहायला गेले असता तेथे 'पाटलाची पोर' या चित्रपटाचे काम चालू होते. निर्मात्यांनी त्यांना 'चित्रपटात काम करणार का?' असे विचारताच त्यांनी होकार दिला. त्या चित्रपटात त्यांनी एक छोटेसे काम केले. पुढे दिग्दर्शक राजा परांजपे यांनी रमेश देव यांना आपल्या 'आंधळा मागतो एक डोळा' या चित्रपटात खलनायकाची भूमिका दिली. या चित्रपटानंतर राजा परांजपे यांनी रमेश देव यांना आपल्या चित्रपटात भूमिका द्यायला सुरुवात केली. तेव्हापासून रमेश देव राजाभाऊंना आपले गुरु मानायला लागले. पुढे नलिनी सराफ नावाची एक नवीन अभिनेत्री राजाभाऊंकडे आली. त्यांनी तिलाही अभिनय शिकवून आपल्या चित्रपटात घेतली. हिच नलिनी सराफ पुढे सीमा देव झाली. रमेश देव यांनी नंतर 'गाठ पडली ठका ठका' (१९५६), 'देवघर' या चित्रपटांतून भूमिका केल्या. दिग्दर्शक दत्ता धर्माधिकारी यांनी १९५७ सालच्या आपल्या 'आलिया भोगासी' या चित्रपटात राजा गोसावी, जयश्री गडकर, दादा साळवी, वसुंधरा पौडवाल व रणजीत बुधकर यांच्या भूमिका होत्या. त्यानंतर रमेश देव-सीमा यांनी 'साताजन्माचा सोबती' १९५९, 'उमज पडेल तर' १९६०, 'जगाच्या पाठीवर' १९६० व 'सुवासिनी' १९६१, 'वरदक्षिणा' १९६२ आदी चित्रपटांत एकत्र भूमिका केल्या. या काळात दोघेही परस्परांच्या प्रेमात होते, पण गाडी पुढे जात नव्हती. 'वरदक्षिणा' मध्ये बैलगाडीतून नायक-नायिका येत असल्याचा एक लाँग शॉट होता. आजूबाजूला कुणीही नसल्याने ती संधी साधून रमेश देव यांनी सीमाला प्रपोज केले व त्यांनी होकार दिला. चित्रपटाच्या सेटवरच हे लग्न ठरले. त्यानंतर १ जुलै १९६३ रोजी रमेश देव सीमा यांचे लग्न झाले. दोघांचेही गुरु, मार्गदर्शक राजा परांजपे या लग्नाला उपस्थित होते.

१९६२ मध्ये रमेश देव यांना ताराचंद बडजात्या यांच्या राजश्री प्रॉडक्शनतर्फे बोलावणे आले आणि 'आरती' या हिंदी चित्रपटासाठी त्यांची निवड झाली ती खलनायक म्हणूनच. या चित्रपटात मीनाकुमारी व प्रदीपकुमार ही जोडी होती. रमेश देव यांची 'आरती' मधून हिंदी चित्रपटात इंट्री झाली.

१९६२ सालीच अनंत माने यांच्या 'भाग्यलक्ष्मी' या चित्रपटात रमेश देव यांनी राजा गोसावी, जयश्री गडकर, दामूअण्णा मालवणकर यांचेसह काम केले, त्यानंतर लगेच अनंत माने यांनी रमेश देव यांना त्यांच्या 'माझा होशील का?' या चित्रपटासाठी बोलावले. या चित्रपटांत रमेश देवसह ललिता देसाई, कामिनी कदम, शरद तळवलकर यांनी भूमिका केल्या होत्या. अनंत माने यांच्या 'मानिनी' या चित्रपटांतही त्यांनी रमेश देव यांना नायिकेच्या (जयश्री गडकर) भावाची भूमिका दिली होती. अभिनय संवेदनशील असलेली ही भूमिका रमेश देव यांनी उत्कृष्ट केली होती. १९६५ मध्ये दोन सर्वांगीण सुंदर चित्रपटात रमेश देव यांनी बहारदार भूमिका केल्या. त्यांतील 'पडछाया' हा राजा परांजपे यांचा रहस्यमय चित्रपट होता, दुसरा वसंत जोगळेकर यांचा 'शेवटचा मालुसरा' हा युद्धपट होता. या दोन्ही चित्रपटांतील रमेश देव यांच्या कामांची रसिकांनी उत्तम दाद दिली. या दोन्ही चित्रपटांतील गाणीही सुंदर होती.

१९६६ साली राजा परांजपे यांनी 'लव्ह अँड मर्डर' या हिंदी चित्रपटात रमेश देव यांना नायक केले. हाही एक रहस्यपट होता. या चित्रपटात रमेश देव यांची नायिका होती जयमाला. या चित्रपटात पृथ्वीराज कपूर, हिरालाल, हेलन, अरुणा इराणी व चंद्रकांत गोखले असा नटसंच होता. या चित्रपटाला ओ.पी. नय्यर यांनी संगीत दिले होते. यातील आशा भोसले यांची गाणी खूप गाजली. यानंतर रमेश देव यांनी अनेक हिंदी चित्रपटातून कामे केली. त्यात 'दसलाख', मेहेरबान, शिकार, सरस्वतीचंद्र, तीन बहुरानीयाँ, मनकामीत, शर्त, बाँबे बाय नाईट, पत्नी, परदेस, दर्पण आदी चित्रपटांचा समावेश होता.

धर्मेंद्र-राखी यांच्या 'जीवनमृत्यू' (१९७०) या चित्रपटांतही रमेश देव खलनायकांच्या टिममध्ये होता. याचवर्षी आलेल्या प्रकाश वर्मा यांच्या 'बंसी और बिरजू' मध्ये रमेश देव नायकाचा मित्र होता. या चित्रपटांत अमिताभ बच्चन व जया भादुरी ही जोडी होती. अमिताभ त्यावेळी नवीन होता व चित्रपटसृष्टीत स्थिरावण्यासाठी धडपडत होता.

या चित्रपटात त्याची रमेश देव यांच्याशी मैत्री झाली व अनेक निर्मात्यांकडे रमेश देव यांनी त्याच्यासाठी शब्द टाकून त्याला नवीन चित्रपट मिळवून दिले होते. ते ऋण अजूनही अमिताभ मान्य करतो व रमेश देव यांचा आदर राखतो.

मेहमूदचा गाजलेला 'मस्ताना', 'खिलौना', 'चिंगारी', 'गंगा तेरा पानी अमृत', 'हलचल', 'लाखोंमे एक' हे चित्रपट करीत असतानाच ऋषीकेश मुखर्जीनी रमेश देव यांना 'आनंद' साठी बोलावले. त्यांना एका मराठी कुटूंबातील डॉक्टर प्रकाश कुलकर्णी या भूमिकेसाठी मराठी नटच पाहिजे होता. आनंदमध्ये डॉक्टर म्हणून रमेश देव व त्यांची पत्नी म्हणून सीमा देव यांनी बहारदार कामे केली. राजेश खन्ना तेव्हापासून सीमाला आपली मोठी बहिण मानू लागला व दररोज घरुन सेटवर येताना तिला मराठी पदार्थ आणण्याचा आग्रह करु लागला. पुढे रमेश देव यांनी राजेश खन्नासह 'जोरुका गुलाम', 'आपकी कसम', 'प्रेमनगर', 'अशांती' व 'गोरा' हे चित्रपट केले.

रमेश देव यांनी आपली स्वतःची चित्रसंस्था काढून त्या अन्वये प्रथम 'जानकी' (१९७९) या चित्रपटाची निर्मिती केली. यात श्रीराम लागू व सीमा यांनी भूमिका केल्या होत्या. त्यानंतर 'या सुखांनो या', 'सेनानी सानेगुरुजी', 'क्रांतीवीर वासुदेव बळवंत फडके', 'सर्जा' व 'गोष्ट लग्नानंतरची' आदी चित्रपटांची निर्मिती केली. हे करीत असतानाच रमेश देव काही निवडक मराठी व हिंदी चित्रपटांतून भूमिकाही करीत होते. त्यात 'कोरा कागज' १९७४, '३६ घंटे' १९७४, 'रानी और लालपरी' १९७५, देवेंद्र गोयल यांच्या 'आदमी सडकका' या चित्रपटावरुन त्यांनीच मराठीमध्ये तयार केलेला 'दोस्त असावा असा' १९७८ या चित्रपटात प्रमुख भूमिका केली. त्यापूर्वी 'जनमा जनमका साथ' या १९७७ च्या गुजराथी चित्रपटातही काम केले. 'हिरालाल पन्नालाल' १९७८ 'हातकडी' १९८२. 'श्रीमान श्रीमती' १९८२ 'खुद्दार' १९८२, 'एक चिठ्ठी प्यार भरी' १९८५, 'औलाद' १९८७, 'मिस्टर इंडिया' १९८७ 'सिंदूर' १९८७, 'घायल' १९९०, 'जॉली एल.एल. बी.' २०१३, 'घायल वन्स अगेन' या २०१६ मधील हिंदी चित्रपटात रमेश देव यांनी शेवटचे काम केले. तसेच 'पिपाणी' या २०१२ सालच्या रमेश देव यांचा चित्रपट.

रमेश देव व सीमा यांनी आपल्या चित्रपट कारकिर्दीत एकूण ७५ हिंदी व मराठी चित्रपटांतून सोबत कामे केली. 'सीमा ही माझ्यासाठी खूप लकी आहे' असे ते नेहमी म्हणत असत. त्यांनी स्वतःची 'अजिंक्य थिएटर' ही नाट्यसंस्था सुरु करुन त्यातून निवडक नाटके सादर केली. प्रथम आचार्य अत्रे यांचे 'लग्नाची बेडी' हे नाटक रंगमंचावर आणले. या नाटकात राजा परांजपे, शरद तळवळकर, राजा गोसावी, सीमा, पद्मा चव्हाण कामे करीत असत. पुढे पु.ल. देशपांडे यांचे 'तुझे आहे तुजपाशी' या नाटकाचेही प्रयोग केले. रमेश देव यांचे 'लाल बंगली', 'मवाली', 'गहिरे रंग' ही नाटकेही गाजली. प्रथम इंट्री घेण्याची एक अभिनव पद्धत त्यांनी रंगभूमीवर आणली व प्रत्येक इंट्रीला टाळ्या घेतल्या. स्टायलीस्ट इंट्रीचा पहिला अभिनेता रमेश देव होता.

त्यानंतर डॉ. काशिनाथ घाणेकर व अन्य अभिनेत्यांनी ही पद्धत अंगिकारली. रमेश देव यांचे पुत्र अजिंक्य देव हेही एक उत्तम अभिनेते असून मराठी व हिंदी चित्रपटांतून यशस्वी कामे करीत आहेत तर दुसरे पुत्र अभिनय देव हे हिंदी चित्रपटात दिग्दर्शन करीत आहेत. २ फेब्रुवारी २०२२ रोजी रमेश देव यांचे वयाच्या ९३ व्या वर्षी हृदयविकाराच्या तीव्र झटक्याने निधन झाले. त्यांचे चित्रपट व त्यांचा हसरा प्रसन्न चेहरा आपण विसरु शकत नाही.

---

## तारे जमीं पर
अनिता पाध्ये

# हमारी याद आएगी...







मुबारक बेगम हे नाव पन्नास व साठ दशकात चित्रपट पार्श्वगायनात लोकप्रिय होतं एकापेक्षा एक सरस व लोकप्रिय चित्रपट गीते गाऊन सुध्दा नंतरच्या चित्रपटसष्टीतून बाहेर फेकल्या गेल्यामुळे घर आणि पैसा यासाठी दारोदार हात पसरण्याची वेळ त्यांच्यावर का आली?

राजस्थानमधील झुंझुनु जिल्ह्यामधील सुजानगड गावात १९४० मध्ये मुबारक बेगम यांचा जन्म झाला. घरी आई-वडील, आजी आणि पाच भाऊ-बहिण. त्यांच्या वडिलांचा फळांचा ठेला होता. मुबारक बेगम यांचे काका लहान मुबारकला घेऊन सिनेमा बघायला जात असत तेव्हा नुरजहाँ, सुरैय्या या गायिका- अभिनेत्री पडद्यावर गाऊ लागल्या की तल्लीन होऊन मुबारक त्यांची गाणी ऐकत आणि गाण्यांचे शब्द, चाल लक्षात ठेवुन घरी आल्यावर अब्बा, अम्मा आजी यांच्यासमोर ती गाणी गात असत.

वाढत्या वयामुळे थकलेल्या वडिलांना कुटुंबाच्या भविष्याची चिंता सतावत होती. मुबारकचा आवाज सुरेल आहे, मग तिला घेऊन आपण मुंबईला गेलो तर चित्रपटांमध्ये तिला गाणी गायची संधी मिळेल असा विचार एक दिवस त्यांच्या मनात आला. चित्रपटाच्या गाण्यांसाठी चांगला मोबदला मिळतो ही गोष्ट ते ऐकून होते. मुलीला चित्रपटात गाण्याची संधी मिळाली तर आपला वनवास संपेल अशी आशा त्यांच्या मनात निर्माण झाली त्यामुळे त्यांनी मुबारकना एका गवयाकडे शात्रीय संगीताची शिकवणी लावली.

दोन-तीन वर्षांनी सुर पक्के होताच मुबारक बेगमना घेऊन त्यांचे वडील मुंबईला आले व ऑल इंडिया रेडियोवर गझल गाण्याची संधी त्यांना मिळाली. एक दिवस संगीतकार रफीक गजनवींच्या कानी रेडियोवर गझल गाणाऱ्या मुबारक बेगम यांचा सुरेल आवाज पडला आणि त्यांनी दिग्दर्शक आगा जानी काश्मीरी यांच्या एका चित्रपटासाठी मुबारक बेगमना पार्श्वगायनाची प्रथम संधी दिली. परंतु गाण्याच्या रेकॉर्डिंगच्यावेळी स्टुडियोमध्ये जमलेल्या वादकांची, अन्यजणांची गर्दी बघुन बावचळल्याने मुबारक बेगम गाणे गाऊच शकल्या नाहीत. त्यामुळे नाईलाजाने रफीक गजनवीनी ते गाणे अन्य गायिकेकडून गाऊन घेतलं. संगीतकार शामसुंदर यांच्यासाठी पार्श्वगायनची संधी मिळाली तेव्हा देखील तीच पुनरावत्ती घडली.

या घटनेनंतर सहा एक महिन्यांनी सन १९४९ मध्ये त्यांना पार्श्वगायनाची तिसरी संधी मिळाली तेव्हा मात्र न घाबरता त्या गाणे गायल्या. तो चित्रपट होता अभिनेता याकुब निर्मित आइए व गाण्याचे बोल होते मोहे आने लगी अंगडाई हेच मुबारक बेगम यांचं पहिलं पार्श्वगीत.

त्यानंतर १९५२ मध्ये धर्मपत्नी या चित्रपटाबरोबरच जमाल सेनच्या संगीत दिग्दर्शनात मुबारक बेगमना दिग्दर्शक-लेखक कमाल अमरोहींच्या गदायरांतील सर्व गाणी गाण्याची संधी मिळाली. देवता तुम्ही हो सहारा हे या चित्रपटातील त्यांचं गीत सुपरहिट झालं आणि मुबारक बेगम यांच्या पार्श्वगायन कारकिर्दीची खऱ्या अर्थाने सुरुवात झाली.

हळुहळु चित्रपटसंगीतक्षेत्रामधील अनेक संगीतकार, निर्माता-दिग्दर्शक मुबारक बेगम यांच्याकडून गाणी गाऊन घेऊ लागले. बिमल रॉय दिग्दर्शित देवदास मध्ये मुबारक बेगमनी गायिलेलं वो ना आए पलट के हे गीत लोकप्रिय झाल्यामुळे बिमल रॉय आपल्या प्रत्येक चित्रपटासाठी एखाद-दुसरं गाणे गाण्यासाठी त्यांना आदराने बोलावू लागले. हेच कारण असावं की मधुमती मधील सर्व गाणी लता मंगेशकरांच्या आवाजात रेकॉर्ड केली तरी 'हम हाल दिल सुनाएंगे, सुनिए के ना सुनिए' हे मुजरा गीत मुबारक बेगमकडून गाऊन घेण्यात आलं आणि ते अतिशय लोकप्रिय झालं. त्यानंतर वर्ष-दिड वर्षातच हमारी याद आएगी या चित्रपटाचं शीर्षक गीत सुपरहिट झाल्यामुळे मुबारक बेगम हे नाव भारतातील घराघरात पोहचलं. आजही हे गाणे लोकप्रिय आहे.अनेक वाचकांना कदाचित ही गोष्ट माहित नसेल की हे गीत लता मंगेशकर यांच्या आवाजात रेकॉर्ड होणार होतं. परंतु तब्येत ठीक नसल्याचं कारण सांगत लताबाईंनी हमारी याद आएगी या शीर्षक गीताचं रेकॉर्डिंग आयत्यावेळी रद्द केलं. परंतु या गोष्टीची शहानिशा करण्यासाठी चित्रपटाचे निर्माता-दिग्दर्शक केदार शर्मानी ताबडतोब लताबाईंच्या घरी फोन केला तेव्हा त्या घरी नसुन संगीतकार सी.रामचंद्र यांचं गीत रेकॉर्ड करण्यासाठी गेल्या आहेत हे कळल्यावर केदार शर्मा इतके संतप्त झाले की सदर शीर्षक गीत लताबाईंऐवजी अन्य गायिकेच्या आवाजात रेकॉर्ड करण्याचा तडकाफडकी निर्णय त्यांनी घेतला आणि मुबारक बेगम यांची वर्णी लागली.

त्यानंतर पुन्हा दिड एक वर्षांनी असाच एक प्रसंग घडला. हमराही या चित्रपटामधील मुझको अपने गले लगा लो हे द्वंद्वगीत महंमद रफी व लता मंगेशकर यांच्या आवाजात रेकॉर्ड होणार होतं. परंतु रेकॉर्डिंगच्या दिवशी लताबाई न आल्यामुळे मुबारक बेगम यांच्या आवाजात ते गाणे तात्पुरते डब करण्याचा निर्णय चित्रपटाचे संगीतकार शंकर-जयकिसननी घेतला. परंतु कलाकारांच्या तारखा मिळाल्यामुळे हे गीत लगेच चित्रित करण्याचा निर्णय दिग्दर्शकाने घेतल्याकारणाने 'मुझको अपने गले लगाओ' हे गीत मुबारक बेगम यांच्याच आवाजात ठेवण्याचा निर्णय घेतला गेला आणि हे गाणे इतके लोकप्रिय झालं की मुबारक बेगम यांची सही घेण्यासाठी त्यांच्या घरासमोर चाहत्यांच्या लांबच लांब रांगा लागू लागल्या.

आर्थिक परिस्थिती बेताची असल्याकारणाने मुबारक बेगम यांचं शालेय शिक्षणही झालं नव्हतं. त्या फक्त सही करायला शिकल्या होत्या. गाण्याचं रेकॉर्डिंग सुरु होण्यापूर्वी स्टुडियोतील एखाद्या साक्षर व्यक्तीकडून त्या गाण्याचे बोल दोन वेळा वाचून घेत आणि न चुकता गाणे गात असत. अन्य गायिकांची गाणी काढून घेण्यासाठी राजकारण केलं जातं ही अक्कल हुशारी त्यांच्यासारख्या सरळ साध्या बाईकडे नव्हती. जसजशी त्यांची गाणी लोकप्रिय होऊ लागली तसतशी पार्श्वगायनासाठी त्यांची मागणी वाढण्याऐवजी घटू लागली. हे उलट गणित त्यावेळी त्यांच्या लक्षात आलं नाही आणि जेव्हा लक्षात आलं तेव्हा चित्रपटसष्टीतुन, पार्श्वगायनातून त्या बाहेर फेकल्या गेल्या. त्यांच्या आवाजात रेकॉर्ड झालेली अनेक गाणी चित्रपट प्रदर्शित झाल्यानंतर अन्य गायिकांच्या आवाजात त्यांना गायला मिळू लागली. 'परदेसियों से ना अखिंया मिलाना' (जब जब फुल खिले) व अगर मुझे न मिले तुम (काजल) ही त्याची काही उदाहरणं.


गुलाम मोहम्मद, सचीनदेव बर्मन, जमाल सेन, नौशाद, सरदार मलिक, सलिल चौधरी, खय्याम, शंकर- जयकिसन, कल्याणजी-आनंदजी अशा अनेक आघाडीच्या संगीतकारांची गाणी गायली असली तरी मुबारक बेगम यांच्याविरोधात राजकारण खेळणाऱ्या गायिकेचा चित्रपटसष्टीमध्ये इतका दरारा होता की कुणीही नामी संगीतकार मुबारक बेगमकडून गाणी गाऊन घेण्यास घाबरु लागले.

अशा रितीने १९५० मध्ये सुरु झालेली त्यांची गायन कारकिर्द १९६० संपेपर्यंत संपली देखील. सत्तरच्या दशकामध्ये एखादं दुसऱ्या गाण्यावर त्यांना समाधान मानावं लागलं. त्यांनी गायलेलं शेवटचं गीत होतं १९८१ मध्ये प्रदर्शित झालेल्या नई इमारत या चित्रपटातमधील पहन के मैं.

मुबारक बेगम यांची चित्रपट पार्श्वगायन कारकिर्द तर संपुष्टात आलीच परंतु घरच्या आघाडीवर सुध्दा अनेक दु:खांचा सामना त्यांना करावा लागला. मुंबईला आल्यानंतर शेख नावाच्या इसमाशी त्यांचा निकाह झाला होता. दोन्ही मुलं लहान असतानाच पतीचं अचानक निधन झालं. चित्रपटासाठी पार्श्वगायन करत असताना एका गाण्यासाठी त्यांना शंभर- दिडशे रुपये मिळत असत. परंतु भविष्याचा विचार करुन त्या मोबदल्याची योग्य तरतुद ना मुबारक बेगमनी केली होती ना त्यांच्या वडिलांनी. त्यामुळे स्वत:चं, वडिलांचं व मुलांचं पोट भरण्यासाठी या चित्रपट पार्श्वगायिकेवर अगदी लहान-सहान, गल्लीबोळातले कार्यक्रम करण्याची वेळ आली. मोठ्या लग्नकार्यामध्ये एक-दिड हजारांच्या अल्प मोबदल्यामध्ये गाणी गाऊन त्या गुजारा करु लागल्या.

---

## सहज सुचलं म्हणून...
विलास समेळ



# अश्रू

चौंढी सारख्या खेड्यातील शाळेतून पन्नास वर्षांपूर्वी मी अलिबाग शहरातील जे. एस. एम. कॉलेजमध्ये प्रवेश घेतला तेव्हा माझ्याबरोबर माझा मित्र नंदू कर्वे आणि मैत्रीण शालू वेलणकर सुद्धा होती. आम्ही तिघेही अगदी पहिलीपासून बरोबरचे. तिघांनीही पी डी. कॉमर्सला ॲडमिशन घेतल्याने एकत्रच असलो तरी खेडं आणि शहर यातला फरक सतत जाणवायचा. शाळेत रुबाबात वावरणारा मी, तिथे मात्र थोडा बावरलेला, बुजलेलाच होतो. मनात कुठे तरी कमीपणा असल्याची भावना नि खंत वाटत राहायची. ती व्यक्त करण्याची संधी मिळाली ती कॉलेजच्या स्नेहसंमेलन निमित्ताने.

माझ्या मनातील भावना मी शब्दबद्ध केल्या एका कवितेत.

आयुष्यातील पहिली वहिली
कविता मी स्टेजवरुन सादर
केली , जिचं नाव होतं 'अश्रू'.
ती अशी...
कां? कोण जाणे
कधीतरी माझ्या डोळ्यातून
अचानकपणे ओघळतात
दोन अश्रू...
एक सुखाचा अन् दुसरा
दु:खाचा
ओघळणारे अश्रू सुकून जातात
पण मन मात्र ओलावतं
पूर्वस्मृतींनी... आणि
आठवू लागतो मी माझं
पूर्वायुष्य
ज्यात मी म्हणजे कुणीतरी
असतो
नि मन तुलना करु लागतं
वर्तमानाशी....
ज्यात मी कुणाचाच नसतो !

सादरीकरणानंतर मित्रांनी आणि श्रोत्यांनी खूप कौतुक केलं. पण त्यांना कुठे माहीत होता त्यामागील अर्थ आणि मला जाणवत असलेलं दु:ख ?

मनातील वेदना असोत किंवा आनंद, तो व्यक्त करण्यासाठी शेवटी अश्रूच येतात... कधी आनंदाश्रू तर कधी दु:खाश्रू. माणूस जसं पहिलं प्रेम कधीच विसरू शकत नाही तसंच पहिल्या कवितेचं असतं. आत्तापर्यंत शेकडो कविता केल्या, अनेक पारितोषिके मिळवली, लोकांनी भरभरुन कौतुक केलं. छोटासा का होईना कवी म्हणून प्रसिद्धी मिळाली, तरीही माझी पहिली कविता आजही मला संदर्भासह लक्षात आहे ती म्हणजे 'अश्रू' !

८८७९००५८५८

रायगड, नवी मुंबई, ठाणे, रत्नागिरी, सिंधुदुर्ग ▌आर. एन. आय. रजि. क्र. ४९९६३/७७ MH/MR/RGD/RNP-16/2018-21 (31-12-2022)



**कोरोनाचा प्रभाव कमी होऊ लागल्यानंतर आता पुन्हा बॉक्स ऑफिसवर गजबजाट पहायला मिळणार आहे. येत्या काळात काही बिग बजेट चित्रपट प्रदर्शित होणार असून एकाच दिवशी दोन मोठे चित्रपट प्रदर्शित होणार असल्यामुळे बॉक्स ऑफिसवर कांटे की टक्कर अनुभवायला मिळणार आहे.**



# कोण मारणार बाजी?

ओमायक्रॉनच्या वाढत्या प्रभावामुळे अनेक चित्रपटांची जानेवारी-फेब्रुवारीतली निर्धारित प्रदर्शनं पुढे ढकलण्यात आली. आता रुग्णांची संख्या कमी होत असल्यामुळे तसंच राज्यांनी बरेच नियम शिथिल केल्यानंतर येत्या काही महिन्यांमध्ये बहुप्रतिक्षित चित्रपट प्रदर्शित होणार आहेत. त्यातच एकाच दिवशी दोन चित्रपट प्रदर्शित होत असल्यामुळे बॉक्स ऑफिसवर तगडी स्पर्धा पहायला मिळणार आहे. अक्षयकुमार, कृती सेनॉन आणि अरशद वारसी यांचा 'बच्चन पांडे' १८ मार्चला प्रदर्शित होणार आहे. याच दिवशी बिग बजेट 'आरआरआर' प्रदर्शित करण्याची तयारी सुरू आहे. तसंच रणबीर कपूर आणि वाणी कपूर जोडीचा 'समशेरा'ही याच दिवशी प्रदर्शित होऊ शकतो. एकाच दिवशी प्रदर्शित होणारे हे तिन्ही चित्रपट महत्त्वाचे असून बिग बजेटही



आहेत. एकाच दिवशी एक सोडून दोन मोठे चित्रपट प्रदर्शित होत असल्यामुळे बॉक्स ऑफिसवर चांगलीच स्पर्धा पहायला मिळू शकते. आमीर खानचा 'लालसिंग चड्ढा' आणि यशचा 'केजीएफ २' १४ एप्रिलला प्रदर्शित होणार आहे. प्रेक्षकांना या दोन्ही चित्रपटांची प्रतीक्षा आहे. या दोनपैकी कोणता चित्रपट बाजी मारणार, याबाबत उत्सुकता लागून राहिली आहे. एक एप्रिलला आर माधवनचा 'रॉकेट्री : न नंबी इफेक्ट' आणि जॉन अब्राहम, जॅकलिन फर्नांडिस, रकुलप्रीत सिंह यांचा 'अटॅक' हे दोन चित्रपट प्रदर्शित होतील. त्यांच्यातही चांगलीच टक्कर होऊ शकते. अजय देवगणचा 'रन वे ३४' आणि टायगर श्रॉफचा 'हिरोपंती २' ही एकाच दिवशी प्रदर्शित होणार आहेत. २९ एप्रिलला प्रदर्शित होणाऱ्या या चित्रपटांमध्ये मोठी स्पर्धा असेल. 'मिशन मजनू' आणि 'अनेक' हे दोन चित्रपट १३ मे रोजी एकमेकांसमोर उभे ठाकणार आहेत. 'मिशन मजनू'मधून दाक्षिणात्य अभिनेत्री रश्मिका मंदाना बॉलिवूडमध्ये पाऊल टाकते आहे तर 'अनेक' हा आयुष्मान खुरानाचा चित्रपट आहे. आता या स्पर्धेत कोणते चित्रपट बाजी मारणार हे येणारा काळच ठरवेल.



**'पाहिले न मी तुला'मधल्या खलनायकी भूमिकेनंतर आता शशांक केतकर आपल्या आधीच्या चॉकलेट बॉय प्रतिमेत कमबॅक करतो आहे. शशांक केतकर 'मुरांबा' या मालिकेत दिसणार आहे. पुन्हा एकदा नेक्स्ट डोअर बॉयच्या भूमिकेत शिरणाऱ्या शशांकने आपलं मनोगत व्यक्त केलं आहे.**

# 'मुरांबा'च्या निमित्ताने...

'मुरांबा' या मालिकेचा भाग असल्याबद्दल शशांक केतकरने आनंद व्यक्त केला आहे. छोट्या पडद्यावरच्या पुनरागमनामुळे आपण खूप आनंदी असल्याचं शशांकने म्हटलं आहे. तो पुढे म्हणतो, 'होणार सून मी या घरची', 'हे मन बावरे', 'पाहिले न मी तुला' आणि आता 'मुरांबा' असा माझा प्रवास राहिला आहे. प्रेक्षकांनी नेहमीच माझ्यावर प्रेमाचा वर्षाव केला असून मला आपल्या कुटुंबातला सदस्यच मानलं आहे. आता 'मुरांबा'च्या निमित्ताने माझ्यावर पुन्हा एकदा प्रेमाचा वर्षात होईल अशी अपेक्षा आहे. शशांक सांगतो, कोणत्याही मालिकेसाठी होकार देताना मी कथेला महत्त्व देतो. कथा चांगली असेल तर मी पुढे जातो. एक वाचक म्हणून तसंच एक प्रेक्षक म्हणूनही मला कथा आवडायला हवी. 'मुरांबा'मध्ये मी एका शेफची भूमिका करत असून नायक फूड ट्रक चालवतो. मला स्वत:ला स्वयंपाक करायला खूप आवडतं. त्यामुळे मी या भूमिकेशी स्वत:ला रिलेट करू शकलो आणि ही भूमिका स्वीकारली. या मालिकेत ज्येष्ठ आणि तरुण कलाकारांचा संगम आहे. त्यामुळे या सगळ्यांसोबत काम करण्याचा अनुभव खूपच भन्नाट असेल. शशांक सांगतो, या मालिकेत दोन स्त्री व्यक्तिरेखा आहेत. आजवर मी प्रेमकथा साकारल्या असल्या तरी दोन स्त्री व्यक्तीरेखांसोबत पहिल्यांदाच काम करतो आहे. त्यामुळे माझ्यासाठी हा वेगळा अनुभव असेल. अर्थात मी मुद्दाम प्रेमकथा निवडत नाही. पण एका उत्तम प्रेमकथेला पर्यायही नाही. त्यामुळे मला प्रेमकथा करायला आवडतात.



# हुमा विशेष भूमिकेत...

सध्या आलिया भट्टच्या 'गंगुबाई काठियावाडी'ची चांगलीच चर्चा आहे. संजय लीला भन्साळीने दिग्दर्शित केलेल्या या चित्रपटात हुमा कुरेशी महत्त्वाच्या भूमिकेत दिसेल. खुद्द हुमानेच ही माहिती दिली आहे. या महिन्यात आपण खूप व्यस्त असू, असं हुमाने म्हटलं आहे. एका बाजूला तिची 'मिथ्या' ही वेब सिरिज प्रदर्शित होत आहे तर दुसरीकडे ती 'गंगूबाई काठियावाडी'मध्ये विशेष भूमिका करणार आहे. त्यामुळे ती खूपच उत्साही आणि उत्सुक आहे.

**सध्या अनेक चित्रपट ओटीटीवर दाखल होत आहेत. या चित्रपटांचे हक्क खरेदी करण्यासाठी वेब वाहिन्याही उत्सुक आहेत. चित्रपटांसाठी कोट्यवधी रुपये खर्च करण्याचीही वेब वाहिन्यांची तयारी आहे. शाहरूख खान आणि आलिया भट्ट यांचा 'डार्लिंग' हा चित्रपट सध्या चर्चेत असून नेटफ्लिक्सने ८० कोटी रुपयांना चित्रपटाचे हक्क खरेदी केले आहेत. अशाच काही महागड्या चित्रपटांविषयी...**



# महागडा सौदा

आलिया भट्ट आणि शाहरूख खान 'डिअर जिंदगी'नंतर 'डार्लिंग'मध्ये एकत्र दिसणार आहेत. 'डार्लिंग'साठी 'नेटफ्लिक्स'ने तब्बल ८० कोटी रुपये मोजले आहेत. सध्या अनेक चित्रपट ओटीटीवर प्रदर्शित होत असून त्यासाठी भलीथोरली रक्कम मोजण्याची या वाहिन्यांची तयारी आहे. जसमीत रिनने चित्रपटाचं दिग्दर्शन केलं असून यात शाहरूख खान, आलिया भट्ट यांच्यासह विजय



शर्मा, शेफाली शाह यांच्याही प्रमुख भूमिका आहेत. महत्त्वाची बाब म्हणजे शाहरूख आणि आलिया या चित्रपटाचे निर्माते आहेत. अशाच पद्धतीने अन्य काही चित्रपटांचे हक्कही विकले गेले आहेत. या हक्कांसाठी कोट्यवधी रुपये मोजण्यात आले आहेत. 'आरआरआर' या बहुचर्चित चित्रपटाचे सॅटेलाईट हक्क ३२५ कोटी रुपयांना विकले गेले आहेत. सॅटेलाईट हक्कांचा विचार करता 'आरआरआर' हा आजवरचा सर्वात महागडा चित्रपट ठरला आहे. 'केजीएफ २' च्या गाण्यांचे हक्क ७० कोटी रुपयांना विकले गेले आहेत. या चित्रपटात यशसह रवीना टंडन आणि संजय दत्त यांच्या प्रमुख भूमिका आहेत. शाहरूख खानच्या 'पठाण'चे हक्क प्रदर्शित होण्याआधीच विकले गेले आहेत. 'ॲमेझॉन प्राईम'ने तब्बल २०० कोटी रुपयांना चित्रपटाचे हक्क विकत घेतले आहेत. 'पठाण' चित्रपटगृहांनंतर ओटीटीवर प्रदर्शित होणार आहे. सलमान खानच्या 'टायगर ३' चे हक्कही ॲमेझॉन प्राईमने खरेदी केले असून त्यासाठीही २०० कोटी रुपये मोजले आहेत. अमिताभ बच्चनचा 'झुंड' चित्रपटगृहांमध्ये प्रदर्शित होणार का थेट ओटीटीवर दाखल होणार हे अद्याप ठरलं नसलं तरी त्याचे हक्क ३३ कोटी रुपयांना विकले गेल्याचं बोललं जात आहे.



# साराची व्यस्तता

नव्या काळातल्या बऱ्याच अभिनेत्रींनी बॉलिवूडमध्ये स्वत:चं स्थान निर्माण केलं आहे. या अभिनेत्रींनी आपल्या अभिनयाने सर्वांनाच प्रभावित केलं आहे. या अभिनेत्री स्वत:ची सद्दी निर्माण करण्यासाठी प्रयत्नशील आहेत. अशीच एक अभिनेत्री म्हणजे सारा अली खान. 'केदारनाथ'मधून बॉलिवूडमध्ये पदार्पण केलेल्या साराने 'सिंबा'सारखा ब्लॉकबस्टर चित्रपट केला. साराने आपल्या वागणुकीनेही अनेकांचं मन जिंकलं आहे. साराच्या हातात आता अनेक चित्रपट आहेत. त्यामुळे येत्या काळात ती खूप व्यस्त असणार आहे. साराच्या 'अतरंगी रे'ला चांगला प्रतिसाद मिळाला. सारा गेल्या काही महिन्यांपासून एका शहरातून दुसऱ्या शहरात, एक सेटवरून दुसऱ्या सेटवर फिरते आहे. सारा जाहिरातींची कामं पूर्ण करण्याच्या प्रयत्नात आहे. सारा येत्या काळात 'गॅसलाईट' आणि लक्ष्मण उतेकर यांच्या आगामी चित्रपटात दिसणार आहे. या चित्रपटाचं नाव अद्याप ठरायचं आहे. साराने या चित्रपटाचं इंदूरमधलं शूट पूर्ण केलं असून आता ती अन्य प्रकल्प पूर्ण करण्याच्या प्रयत्नात आहे. त्यामुळे साराला श्वास घ्यायलाही उसंत मिळालेली नाही. पुढच्या चित्रपटाचं शूट सुरू करण्याआधी सारा जाहिरातींची कामं पूर्ण करते आहे. त्यामुळे येत्या काळात सारा सातत्याने व्यस्त असणार आहे.

**सध्याच्या व्यस्त अभिनेत्रींपैकी एक म्हणजे सारा अली खान. साराकडे सध्या बरेच चित्रपट आहेत. त्यामुळे पुढच्या काळात ती बरीच व्यस्त असणार आहे. केदारनाथ, सिंबाच्या यशानंतर सारा आता सातवे आसमान पर आहे.**

# आली लग्नघटीका...



आलिया भट्ट आणि रणबीर कपूर यांच्या लग्नाची चर्चा मागील काही काळापासून सुरू आहे. हे दोघं लग्नाच्या बंधनात कधी बांधले जाणार याबाबत उत्सुकता लागून राहिली आहे. बॉलिवूडमधल्या अनेक अभिनेत्री विवाहबंधनात अडकत असताना आता आलिया नवरीच्या रुपात कधी दिसणार याची चाहत्यांना प्रतीक्षा आहे. आलिया आणि रणबीर यंदा एप्रिलमध्ये लग्न करण्याची शक्यता असून त्यासाठी ती रणथंबोरची निवड करू शकतात. भट्ट आणि कपूर कुटुंबाने या लग्नाची तयारी सुरू केल्याचंही बोललं जात आहे. रणबीर आणि आलिया बरेचदा रणथंबोरला आले आहेत. त्यामुळे ते इथेच लग्नगाठ बांधतील अशी अपेक्षा आहे.



# करिनाचा कमबॅक

दुसऱ्या मुलाच्या जन्मानंतर करिना कपूर आईपणाचा आनंद अनुभवते आहे. तिने कामातून ब्रेक घेतला आहे. तैमुरच्या जन्मानंतर करिना सेटवर परतली होती. तशीच ती जेहच्या जन्मानंतरही परतणार आहे. सुजॉय घोषचा आगामी चित्रपटातून करिना पुनरागमन करणार असल्याचं बोललं जात आहे. 'द डिव्होशन ऑफ सस्पेक्ट एक्स' या चित्रपटातून ती कमबॅक करणार असल्याचं बोललं जात आहे. याबाबत अद्याप काहीच समोर आलं नसलं तरी करिनाला अशा वेगळ्या भूमिकेत पाहण्यासाठी प्रेक्षकही उत्सुक आहेत.



# यामी नकारात्मक भूमिकेत?

अ वेनस डे हा चित्रपट अनेकांनी बघितला असेल. नासिरूद्दिन शाह, अनुपम खेर तसंच जिमी शेरगिल यांच्या अभिनयाने सजलेला हा चित्रपट म्हणजे बॉलिवूडमधील मैलाचा दगड म्हणायला हवा. सध्या 'अ थर्स डे' नावचा चित्रपट चर्चेत असून तो ओटीटीवर प्रदर्शित होणार आहे. या चित्रपटात यामी गौतम भूमिका करणार असून कारकिर्दीत प्रथमच ती काहीशा नकारात्मक भूमिकेत दिसेल. 'अ थर्स डे' 'अ वेनस डे'चा सीक्वेल असल्याचीही चर्चा आहे. त्यामुळे आता या चित्रपटात नेमकं काय पहायला मिळणार याची उत्सुकता आहे.





# भन्नाट फ्लोअर पाँग आणि पिलो फायटिंग



दोस्तांनो, तुम्हाला टेबल टेनिस माहीत असेल. या खेळाला थोडं ट्विस्ट देऊन नवा खेळ सादर करण्यात आला आहे. 'फ्लोअर पाँग' असं या नव्या खेळाचं नाव. टेबल टेनिससाठी टेबलवर खेळतात तर 'फ्लोअर पाँग' जमिनीवर खेळायचा असतो. हा अत्यंत गमतीशीर असा खेळ आहे. म्हणूनच वेळ घालवण्यासाठी तो खेळता येईल. 'फ्लोअर पाँग'ची कौशल्यं विकसित केली तर त्याचे सामने अटीतटीचे होऊ शकतात. यामुळे खूप चांगला व्यायाम होतो. 'फ्लोअर पाँग'साठी एक कोर्ट लागेल. टेबल टेनिसच्या रॅकेट, टेबल टेनिस बॉल वापरून हा खेळ खेळायचा असतो. हा खेळ खेळताना खेळाडूला साजेसे कपडे आणि बूट घालावे लागतात. या खेळाचं कोर्ट १४ फूट लांब आणि ७ फूट रुंद असतं. दोन खेळाडू हा खेळ खेळतात. प्रत्येक सामन्यात पाच सेट असतात. चार गेम जिंकल्यावर एक सेट जिंकता येतो. खेळाडू पाच पॉईंट्स मिळाल्यावर एक गेम जिंकतो. टेबल टेनिसचेच नियम याला लागू पडतात.

उश्या घेऊन भांडण्याचा प्रकार तुम्ही चित्रपटांमध्ये पाहिला असेल. पण प्रत्यक्षात हा एक खेळ आहे. याच्या स्पर्धा आयोजित केल्या जातात.

फन टाईम

'पिलो फायटिंग' हा खेळ फक्त महिलाच खेळातात. कॅनडातल्या टोरांटोमध्ये 'पिलो फायटींग'च्या स्पर्धा आयोजित केल्या जातात. यासोबतच इतर काही शहरांमध्येही या स्पर्धा लोकप्रिय झाल्या आहेत. विशेष म्हणजे 'पिलो फाईट लीग'ही आहे. 'पिलो फायटिंग'चा एक सामना फक्त पाच मिनिटं चालतो. या काळात दोन स्पर्धकांपैकी कोणीही जिंकलं नाही तर परिक्षकांची समिती विजेत्याची घोषणा करते. या समितीत तीन सदस्य असतात. हा खेळ खेळताना खेळाडूला दुखापतही होऊ शकते. त्यामुळे 'पिलो फायटिंग' वाटते तेवढी सोपी नाही.

# छोटासा बुरुंडी

'बुरुंडी' हा आफ्रिकेतला छोटासा देश. 'बुजुंबरा' ही या देशाची राजधानी. जगातल्या खूप गरीब देशांमध्ये बुरुंडीची गणना होते. 'किरुंडी' आणि 'फ्रेंच' या इथल्या अधिकृत भाषा. आकाराने छोटा असलेला बुरुंडी चारही बाजूंनी जमिनीने वेढला आहे. टांझानिया, कांगो आणि आरवंडा हे या देशाचे शेजारी. या देशाच्या इतिहासात डोकवायचं तर आपल्याला पंधराव्या शतकात जावं लागेल. या काळात बुरुंडीवर 'एमवानी' नावाच्या राजाचं राज्य होतं. संपूर्ण देश एमवानीच्या अधिपत्याखाली होता. शेतात राबणारे शेतकरी राजाला शेतसारा द्यायचे. त्या बदल्यात राजा त्यांचं रक्षण करायचा. १८५६ मध्ये इथे युरोपियन लोकांचं आगमन झालं. पण तेव्हा कोणी बुरुंडीवर राज्य केलं नाही. १८९९ मध्ये जर्मनीने या देशाचा ताबा घेतला. १९१६ मध्ये इथे बेल्जियमची सत्ता आली. एक जुलै १९६२ रोजी बुरुंडी स्वतंत्र झाला. यानंतरही या देशात स्थैर्य नव्हतं. १९९० च्या दशकात बुरुंडीमध्ये अंतर्गत युद्ध पेटलं. देशातले दोन गट एकमेकांविरुद्ध उभे ठाकले. बुरुंडीतल्या हुतुस आणि तुटसी या गटांमध्ये बरीच अशांतता निर्माण झाली. हे युद्ध २००६ मध्ये संपलं. यात दीड लाख लोक मारले गेले. आत बुरुंडी काही प्रमाणात सावरलं आहे. या देशाचा बराच मोठा भाग डोंगराळ आहे. पूर्व भाग पठारी असून काही भाग सपाट आहे. इथे थोडे फार उद्योग आहेत. या देशात ब्लँकेट, बूट, साबण तयार होतात. अन्नावर प्रक्रिया करण्याचे उद्योगही आहेत. कॉफी, कापूस, चहा, मका, रताळी, केळी इथे पिकवली जातात. कॉफी, चहा, साखर यांची निर्यात केली जाते तर पेट्रोलियम पदार्थ, काही अन्नपदार्थ आयात केले जातात.




सफर देशांची


# छोटा ॲप डेव्हलपर

सध्याचा जमाना ॲप्सचा. आज किराणा सामानापासून भाजीपाल्यापर्यंत सगळं काही एका क्लिकवर उपलब्ध आहे. गूगल प्ले स्टोअरवर आपली प्रत्येक गरज पूर्ण करणारी असंख्य ॲप्स आहेत. एखादं ॲप विकसित करणं हे तसं कौशल्याचं काम. तुमच्याकडे कल्पकता असेल तर कोडिंग शिकून ॲप विकसित करता येईल. तुमच्यासारखाच एक छोटा मुलगा ॲप्स तयार करतो. तनिश सेठी असं त्याचं नाव. तनिश १४ वर्षांचा आहे. त्याचा नुकताच



पंतप्रधान राष्ट्रीय बाल पुरस्कार देऊन सन्मान करण्यात आला आहे. तनिशने पशु मॉल नावाचं ॲप तयार केलं आहे. या ॲपच्या माध्यमातून पशु विक्रेते आणि ग्राहक यांचा थेट संपर्क होऊ शकतो. हरयाणा आणि पंजाब या दोन राज्यांमध्ये या ॲपचा मोठ्या प्रमाणावर वापर होतो आहे. यासोबतच राजस्थान आणि उत्तर भारतातल्या इतर राज्यांमध्येही या ॲपच्या माध्यमातून बरेच व्यवहार होत आहेत. तनिश एक ॲप तयार करून थांबलेला नाही तर त्याने नऊ ॲप्स तयार केली आहेत. त्यात स्पीक इंडिया, स्पीक वर्ल्ड, टेलर डायरी, ऑक्सिजन स्टोर आदींचा समावेश आहे. स्पीक इंडिया ॲपवर स्थानिक भाषांचं भाषांतर करता येतं तर स्पीक वर्ल्डवर जगातल्या ९० भाषांचं भाषांतर करता येतं. परदेशात हे ॲप खूपच उपयोगी पडू शकतं. तनिश बुद्धिबळही खेळतो. तो राष्ट्रीय स्तरावरील बुद्धिबळ स्पर्धांमध्ये सहभागी झाला असून जिल्हा स्तरावरील स्पर्धांचं विजेतेपदही पटकावलं आहे. तर अशा या छोट्या ॲप डेव्हलपरचं सध्या चांगलंच कौतुक होत आहे.

छोटे उस्ताद




# बाहेरचं खात असाल तर...

छोट्यांनो, आपण अधूनमधून बाहेरचं खातो. एखाद्या दिवशी शाळेतल्या मित्र-मैत्रिणींसोबत कँटिनमध्ये हादडलं जातं. मॉलमध्ये फिरायला गेल्यावरही तुम्ही भरपूर खाता. बाहेरचं खातानाही तुम्ही आरोग्याचा विचार करायला हवा. तळलेलं, भरपूर कॅलरी असलेलं फास्ट फूड टाळायला हवं. मॉलचा कॅफेटेरिया असो वा कँटिन, तिथे तुम्हाला हेल्दी पर्याय मिळू शकतात. त्यामुळे काय, किती आणि कसं खायचं हे तुम्ही ठरवायचं. बाहेरचं खाताना आपलं आरोग्य कसं जपायचं याविषयी...

✻ बाहेरचं खाताना समतोल साधायला हवा. प्रथिनयुक्त पदार्थांचं जास्तीत जास्त सेवन करायला हवं. मांसाहारी असाल तर चिकन, मासे असे पदार्थ खा. शाकाहारी मुलं बीन्सचं सेवन करू शकतात. फळं, भाज्या, पूर्ण धान्याचे पदार्थ खा. मैद्याच्या ब्रेडऐवजी व्हिट ब्रेडचं सँडविच घ्या. व्हेजिटेबल सँडविच हा सुद्धा खूप चांगला पर्याय आहे. विविध प्रकारची सॅलेड्सही मिळतात. एखाद्या वेळी तीही खा. म्हणूनच मैद्याच्या बन पावापासून बनवलेलं चीज बर्गर खाण्यापेक्षा लेट्यूस आणि टॉमेटो घातलेलं मल्टीग्रेन किंवा व्हिट ब्रेडमधलं सँडविच खाणं कधीही चांगलं.

✻ खाण्याच्या प्रमाणावरही लक्ष द्या.



एखादा पदार्थ खा. सँडविच किंवा बर्गर खूप मोठं असतं. त्यामुळे ते शेअरही करता येईल. मित्र-मैत्रिणींसोबत गेला असाल तर पदार्थ वाटून खा.

✻ कोल्डड्रिंक, भरपूर साखर घातलेले फळांचे रस, एनर्जी ड्रिंक अजिबात पिऊ नका. त्याऐवजी पाणी किंवा लो कॅलरी दूध प्या.

✻ रेस्टॉरंटमध्ये खाताना विशेष काळजी घ्या. एका प्लेटमध्ये खूप जास्त अन्न येतं. त्यामुळे एकाच वेळी भरपूर मागवू नका. विविध प्रकारची सॅलड्स किंवा सँडविचमध्ये सॉस घातले जातात. त्यातही बऱ्याच कॅलरी असतात. त्यामुळे सॉस वेगळे ठेवायला सांगा. आवश्यकतेनुसार खा.

✻ बटर किंवा मार्गारिनऐवजी ऑलिव्ह ऑईलममधले पदार्थ खा. बेक, ग्रील किंवा उकडलेले पदार्थ खा. तळकट पदार्थांपासून लांब रहा. फ्रेंच फ्राइजऐवजी स्टार्टर म्हणून सॅलड्स मागवा. अशा प्रकारे बाहेरचं खातानाही आपलं आरोग्य जपता येईल.

हेल्थ वेल्थ

योगा टाईम

## केसाळ खेकडा



'येती' ही खेकड्याची एक प्रजाती आहे. 'किवा हिरसुटा' हे याचं शास्त्रीय नाव. दक्षिण पॅसिफिक महासागराच्या तळाशी या खेकड्याचा शोध लागला. हा अत्यंत केसाळ असा जलचर आहे. याच्या केसांमध्ये विशिष्ट बॅक्टेरिया दडलेले असतात. या बॅक्टेरियांमुळे येतीच्या आसपासचं पाणी स्वच्छ होतं. हा येती संशोधकांना खूप आकर्षित करतो.

खादाडी

## लेयर्ड फ्रूट सॅलड

छोट्यांनो, फ्रूट सॅलडची नवी रेसिपी शिकू या. यासाठी दोन कप किसलेलं पनीर, चार चमचे आयसिंगची साखर, पाव चमचा केवडा इसेन्स, पाव कप डाळिंबाचे दाणे, पाव कप बारीक चिरलेलं सफरचंद आणि अननस हे साहित्य घ्या. एका बाऊलमध्ये पनीर आणि साखर घालून त्यात चार ते पाच थेंब केवडा इसेन्स घाला. मिसळून घ्या. आता हे मिश्रण अर्धा तास फ्रीजमध्ये ठेवा. चार छोट्या आकाराचे काचेचे ग्लास घ्या. ग्लासच्या तळाला पनीरचं मिश्रण घाला. त्यावर डाळिंबाच्या दाण्यांचा थर द्या. पुन्हा पनीर घाला. त्यावर सफरचंदाचे तुकडे घाला. त्यावर पुन्हा पनीर, मग अननसाचे तुकडे आणि वर पुन्हा पनीरचा थर द्या. त्यावर चेरी किंव टूटीफ्रुटीने सजावट करा आणि खायला द्या. उन्हाळ्यातली ही बेस्ट डिश आहे.



एक्झॅम टाईम

## तयारी वार्षिक परीक्षेची...




छोट्यांनो, आता परीक्षा जवळ येऊ लागली आहे. गेल्या दोन वर्षांपासून तुम्ही ऑनलाईन अभ्यास करत आहात. पण आता पुन्हा शाळा सुरू झाल्या आहेत. परीक्षा तोंडावर आल्याने आता थोडा जास्त जोरात अभ्यास करायला हवा. त्यामुळे तयारीला लागा. परीक्षेची तयारी म्हणजे फक्त अभ्यास नसतो बरं का! तर नियोजनबद्ध अभ्यास करायला हवा. म्हणजे काय तर तुमच्या अभ्यासाचं नीट प्लॅनिंग करा. दिवसभरात कधी अभ्यास करायचा, कोणता विषय कधी शिकायचा, विश्रांती कधी घ्यायची हे सगळं ठरवा. खाण्या-पिण्याच्या वेळा निश्चित करा. थोडा वेळ खेळा. भरपूर सराव, उजळणी करा. घाबरून जाऊ नका. शांतपणे विचार करा, वेळापत्रक बनवा आणि वार्षिक परीक्षेच्या तयारीला लागा.

योगा टाईम

## कोवळ्या उन्हात जा

दोस्तांनो, नियमित सूर्यनमस्कारांमुळे आपलं आरोग्य उत्तम राहतं. सूर्यकिरणांमध्ये रोगनाशक शक्ती असल्याचं अथर्ववेदात नमूद करण्यात आलं आहे. सध्या अनेकजण 'ड' जीवनसत्त्वाच्या गोळ्या घेतात. पण आपल्याकडे मुबलक सूर्यप्रकाश असताना बाहेरून 'ड' जीवनसत्त्व घेण्याची गरज पडू नये. त्यामुळे सकाळी किंवा संध्याकाळी थोडा वेळ कोवळ्या उन्हात जायला हवं. यामुळे तुम्हाला नैसर्गिकरित्या 'ड' जीवनसत्त्व मिळेल आणि गोळ्या घ्याव्या लागणार नाही. तसंच हाडंही बळकट होतील.



# बदलतोय जी मेलचा लूक

दोस्तांनो, आता जी मेलचा लूक बदलून जाणार आहे. जी मेलमध्ये नव्या फीचर्सचा समावेश करण्यात आला असून यामुळे जी मेल वापरणं जास्त सोपं होणार आहे. जी मेल वापरणाऱ्यांची संख्या खूपच जास्त आहे. नव्या जी मेलमध्ये युजर्सना चॅट, मेल, स्पेस आणि मीट असे चार पर्याय एकत्र मिळणार आहेत. म्हणजेच युजर्स हे चारही पर्याय एकत्रितपणे वापरू शकतात. जी मेलमध्ये चॅटचा पर्याय असल्यामुळे आता वेगळं हँगआउट वापरण्याची गरज लागणार नाही. ग्रुप चॅटसाठीचा पर्यायही देण्यात येणार आहे. तसंच गूगल मीटचा वापर करून तुम्ही व्हिडिओ मीटिंगही करू शकता.



जी मेलच्या नव्या लूकमध्ये तुम्हाला सर्वात आधी मेलचा पर्याय मिळेल. इथे आलेल्या मेल्स वाचता येतील. तसंच कंपोजही करता येतील. चॅट या पर्यायाची निवड करून तुम्ही चॅटिंग सुरू करू शकता. इथे तुम्हाला तुमच्या कॉन्टॅक्ट्सची नावं दिसतील. नव्याने चॅटिंग सुरू करायचं असेल तर न्यू चॅट या पर्यायाची निवड करा. जी मेलमधून ग्रूप चॅट करायचं असेल तर स्पेस हा पर्याय निवडावा लागेल. नव्या ग्रूप चॅटला सुरूवात करायची असेल तर न्यू स्पेस हा पर्याय निवडावा लागेल. मीट या पर्यायाची निवड करून व्हिडिओ मीटिंग सुरू करता येईल. म्हणजे जी मेलच्या माध्यमातूनच तुम्ही ग्रूप व्हिडिओ मीटिंग करू शकता. अर्थात नव्या रंगरूपाचं जी मेल उपलब्ध व्हायला थोडा वेळ लागणार आहे. फोनमधलं जी मेल ॲप अपडेट करून या नव्या सेवांचा लाभ घेता येईल.

व्हॉट्स न्यू?



# ब्राउजिंगचा वेग वाढवण्यासाठी...

पीसी किंवा लॅपटॉपवर काम करताना वेब ब्राउजरचं कार्य अनेकदा मंदावतं. विविध कुकीज तसंच कॅशे फाईल्समुळे ब्राउजरचं काम संथ गतीने चालतं. अशा परिस्थितीत काही एक्सटेंशन्स वेब ब्राउजरचा वेग वाढवू शकतात. कोणत्याही ब्राउजरसाठी ही एक्सटेंशन्स उपयुक्त ठरतात.

✻ वेब ब्राउजरच्या स्क्रोलिंगचा वेग वाढवण्यासाठी 'डस्टमॅन' हे एक्सटेंशन वापरलं जातं. 'डस्टमॅन' इन्स्टॉल केल्यानंतर तुम्ही झटपट स्क्रॉलिंग करू शकाल. यामुळे बराच वेळ वाचेल. 'क्रोम' आणि 'फायरफॉक्स'मध्ये ते वापरता येईल.




✻ माउसचं डिझाइन आणि आकार कस्टमाइज करण्यासाठी 'सीआरएक्स माउस जेस्चर्स' हे एक्सटेंशन वापरायला हवं. यामुळे माउसचं जेस्चरही बदलता येईल.

✻ 'सुपर हिस्टरी अँड कॅचे क्लिनर' एक्सटेंशनमुळे ब्राउजरची हिस्ट्री, कॅचे आणि टेम्पररी फाईल्स क्लिन करता येतात. यामुळे ब्राउजरचं कार्य सुधारतं.


✻ नको असलेल्या वेबसाईट्समुळेही ब्राउजरच्या कार्यावर परिणाम होतो. त्यामुळे 'इम्पल्स ब्लॉकर' हे एक्सटेंशन डाउनलोड करून नको असलेल्या साईट्स ब्लॉक करता येतील.

✻ वेब ब्राउजिंग डाटा सेव्ह करण्यासाठी 'एव्हरनोट क्लिपर' डाउनलोड करा. डाटा ऑर्गनाइज करण्यासोबतच आधीचे सर्च शोधण्याच्या कामी हे एक्सटेंशन मदत करेल.

चला तर, ही एक्सटेंशन्स डाउनलोड करून ब्राउजिंगचा आनंद द्विगुणित करू या.

स्मार्ट टिप्स

ठिपके जुळवा



## ओळखा पाहू

जिज्ञासा

१) क्षमाणवाणी ही संकल्पना कोणत्या धर्मात आहे?
२) नवरोजला कोणत्या धर्माचं नवीन वर्ष सुरू होतं?
३) झाकीर हुसेन कोणतं वाद्य वाजवतात?
४) विक्रम साराभाई अंतरिक्ष केंद्र कुठल्या शहरात आहे?
५) बऱ्याच उत्पादनांच्या पाकिटांवर रेषा छापलेल्या असतात. त्यांना काय म्हणतात?
६) भारतातल्या कोणत्या राज्यात रबराचं सर्वात जास्त उत्पादन होतं?
७) 'जय जवान जय किसान' हे घोषवाक्य कोणाचं?
८) एटना ज्वालामुखी कोणत्या देशात आहे?
९) राष्ट्रकुल स्पर्धा किती वर्षांनी आयोजित केल्या जातात?
१०) २०२२ मध्ये क्रिकेटचा टी-२० विश्वचषक कोणत्या देशात होणार आहे?

उत्तरः १) जैन धर्म २) पारशी ३) तबला ४) तिरुअनंतपुरम ५) बारकोड ६) केरळ ७) लालबहादूर शास्त्री ८) इटली ९) चार वर्षांनी १०) ऑस्ट्रेलिया



महानगर गॅस लिमिटेड
नोंदणीकृत कार्यालय : एमजीएल हाऊस, जी-33 ब्लॉक, बांद्रा कुर्ला संकुल, बांद्रा (पू), मुंबई 400 051. CIN : L40200MH1995PLCO88133
Ph.+91-22-6678 5000 Email : info@mahanagargas.com website : www.mahanagargas.com

खुल्या प्लॉटची आवश्यकता

महानगर गॅस लिमिटेड यांना थेट विक्री आधारावर खालील तपशील अनुसार लोणेरे (रायगड जिल्हा, माणगाव तालूका) येथे NH 66 व SH 99 येथील जंक्शनजवळ खुल्या प्लॉटची आवश्यकता आहे.

| ठिकाण | प्लॉट आकार (अंदाजे) | रस्त्याचा पट्टा | अंतर मोजमाप | प्रस्ताव सादरीकरणाची अंतिम तारीख व पत्ता |
|---|---|---|---|---|
| NH 66 च्या बाजूने | 9000 ते 12000 चौ. मीटर | NH 66 च्या दोन्ही बाजूने माणगाव किंवा महाडच्या दिशेने अंदाजे 5 कि.मी. | लोणेरे (रायगड जिल्हा) येथे SH 99 व NH 66 चे जंक्शनच्या अंदाजे 2 किमी उत्तरेस उसारघर येथील गेलचे IP स्टेशन | दि.14.03.2022 रोजी सायं. 6.00 वा. पूर्वी खालील पत्त्यावरः महानगर गॅस लिमिटेड, 1 ला. मजला, वसुंधरा 2 सीएचएसएल, युगंधरा प्लॉट क्र. 13/14, सेक्टर 8, खारघर, नवी मुंबई 410 210 जवळचे ठिकाण : श्री मंकीज पॉईंट, खारघर फ्लायओव्हर |
| | | वा | | |
| SH 99 च्या बाजूने | 9000 ते 12000 चौ. मीटर | SH 99 च्या दोन्ही बाजूने गोरेगावच्या दिशेने अंदाजे 5 कि.मी. | लोणेरे (रायगड जिल्हा) येथे NH 66 व SH 99 चे जंक्शन | |

रोडच्या दिशेने 75 मीटरच्या किमान फ्रंटेज सह वरील निर्देशित आकारांच्या स्पष्ट आणि निर्विवाद शीर्षकासह खुल्या भूखंडासाठी इच्छुक पक्षांकडून (जमीन मालक - वैयक्तिक किंवा इतर व्यक्तींसह संयुक्तपणे / मुखत्यारपत्रधारक/ मालकांनी अधिकृत केलेले एजंट) प्रस्ताव मागवित आहेत. प्रस्तावित भूखंडामध्ये उच्च व्होल्टेज लाईन किंवा त्याच्या वर किंवा खाली जाणारी पाईपलाईन नसावी. प्रस्ताव (सादर करण्याच्या तारखेपासून 180 दिवसांसाठी वैध) सीलबंद लिफाफ्यांमध्ये दि. 14-03-2022 पर्यंत दोन बोली प्रणाली अंतर्गत पाठवावे. 1. **पहिला लिफाफा तांत्रिक लिफाफा म्हणून (NH 66 च्या बाजूने भूखंड किंवा SH 99 च्या बाजूने भूखंड)** जसा असेल तसा भूखंड असा उल्लेख असावा आणि त्यामध्ये जागेचा तपशील, मालकी हक्क तपशील, ड्राविंग्ज, भूखंडाच्या स्थानाचे तपशील दर्शविणारी मुख्य योजना असावी, विक्रीसाठी देऊ केलेले क्षेत्र, भूखंडाचे परिमाण, '7/12' उतारा किंवा तत्सम, मुखत्यारपत्र वा एजन्ट/मुखत्यार धारकांच्या बाबतीत पॉवर ऑफ ॲटर्नी, दर वगळता इतर सर्व अटी व शर्ती असाव्यात. 2. **दुसरा लिफाफा PRICE /किंमतीचा लिफाफा (NH 66 च्या बाजूने भूखंड किंवा SH 99 च्या बाजूने भूखंड)** जसा असेल तसा भूखंड असा उल्लेख असावा व त्यात प्रति चौरस मीटर अनुसार युनिट दर तसेच एकूण रक्कम असेल. हे दोन्ही लिफाफे एका मोठ्या लिफाफ्यामध्ये **'PLOT FOR MGL ( PLOT ALONG NATIONAL HIGHWAY 66 OR PLOT ALONG STATE HIGHWAY 99) -DO NOT OPEN'** असे लिहून दि. 14-03-2022 रोजी सायं. 6.00 वा. पूर्वी वरील निर्देशित पत्त्यावर उपाध्यक्ष (प्रोजेक्ट्स), महानगर गॅस लिमिटेड यांना सिलबंद करुन पाठवावे.
प्रस्ताव सादर करण्याच्या मार्गदर्शक तत्वांसह तपशीलवार अटी व शर्तींसाठी आणि ठिकाणांच्या सूचक योजनाबद्ध नकाशा कृपया आमच्या वेबसाईट **www.mahanagargas.com** येथे भेट द्यावी. कोणत्याही शंका असल्यास कृपया इमेल **info@mahanagargas.com** वर विषय **"REQUIREMENT OF OPEN PLOT"** असे निर्देशित करावे.
सदर जाहिरातीतील दुरुस्ती/शुद्धीपत्रक (असल्यास) आमच्या **www.mahanagargas.com** या वेबसाईटवर उपलब्ध असेल आणि अर्जदारांना विनंती करण्यात येते की त्यांनी त्यांचा प्रस्ताव सादर करण्यापूर्वी आमची वेबसाईट नियमितपणे पहावी.

कृषीवल हे पत्र नागेश पब्लिशर्स प्रा. लि.साठी मुद्रक, प्रकाशक **सौ. चित्रलेखा पाटील** यांनी नागेश पब्लिशर्स, वेश्वी, अलिबाग, जि. रायगड ४०२ २०९ येथे छापून येथेच प्रसिद्ध केले. आर. एन. आय. रजि. क्र. ४९९६३/७७ MH/MR/RGD/RNP-16/2018-21 (31-12-2022)
दूरध्वनी : ०२१४१-२२२२९०/२२२७६१, संपादकीय विभाग-email : krushivalnews@gmail.com / जाहिरात विभाग- email : raigadkrushival@gmail.com मुंबई कार्यालय : ए-५ आयओनिक १८, ऑर्थर बंदर रोड, कुलाबा, मुंबई ४०० ००५. दूरध्वनी : ०२२-२२८८४५३८.
■ **संस्थापक-संपादक : स्व. प्रभाकर पाटील ■ सल्लागार संचालक : सौ. सुप्रिया पाटील ■ व्यवस्थापकीय संचालक : सौ. चित्रलेखा पाटील ■ सल्लागार संपादक : प्रसाद वासुदेव केरकर ■ मुख्य संपादक : इब्राहीम अफगाण* ■ डिजिटल आवृत्ती संपादक : माधवी माणिक सावंत**
(✻ या पत्रातील मजकुराच्या निवडीसाठी पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची आहे.)